
म. ग्रं. सं. ठाणे
विषय जिवंत
सं. क्र. 3936



प्रबुद्ध भारतातील अग्रलेख

REFBK-0024807

संपादक
प्रा.आर.के. श्रीरसागर, प्रा.बी.जी. पवार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

ने. संग्रही निबंध
3932
२४८७
१२।८६



प्रबुद्ध भारतातील अग्रलेख

संपादक

प्रा. रामचंद्र क्षीरसागर

एम. ए. एल एल एम.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

प्रा. बी. जी. पवार

एम. ए बी. पी. एड.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

पुरस्कार

श्री घनश्याम तळवटकर

एम. ए. एल एल एम. एस. ई. एम.

(सदस्य / चिटणीस)

पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई - २३

REFBK-0024807

आनंद प्रकाशन जयसिंगपूरा,

औरंगाबाद

प्रकाशक :
शंकरराव हातोले B. Com. B. Lib. Science
आनंद प्रकाशन जयसिंगपुरा, औरंगाबाद

प्रथमावृत्ती : १४ एप्रिल १९८०

प्रकाशन क्रमांक ८

सर्व हक्क सुरक्षित

किंमत : रुपये अठरा पैसे पन्नास

मुखपृष्ठ : अनंत सालकर पुणे

प्रमुख विक्रेता :
बौद्ध व दलित साहित्य विक्रेता
आनंद बुक डेपो जयसिंगपुरा, औरंगाबाद

मुद्रक :
पी. एस. अतकरे
हिमालया प्रिंटर्स औरंगपुरा, औरंगाबाद



ज्यांनी निष्ठेने व एकजुटीने प्रबुद्ध भारताच्या
संपादनाचे कार्य केले.
अशा सर्व संपादकांना
आदरपूर्वक अर्पण.

प्रा. रामचंद्र क्षीरसागर

प्रा. बी. जी. पवार

अनुक्रमणिका

- पुरस्कार । पहिले
- प्रास्ताविक । ३
- दलिताचा भगवंत गेला ! । १
- युद्ध की बुद्ध? । ७
- सुस्वागतम् । १०
- आमच्या जबाबदाऱ्या । १२
- बाबासाहेबांचा दिल्ली येथील ग्रंथसंग्रह । १५
- बाबासाहेबांच्या स्मृतीस अभिवादन । १९
- " दिक्षा मैदानाचा लढा " । २२
- बौद्ध धर्म प्रसाराची वाटचाल । २६
- नवसमाज रचना । ३०
- नवी कार्यकारिणी–नवी जबाबदारी । ३६
- आपली झोपडी जिवंत ठेवा । ४१
- औरंगाबाद येथील रिपब्लिकन पक्षाचे ऐतिहासिक अधिवेशन । ४७
- शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा हा बौद्धांच्या सवलतीमागील मूलभूत हेतू ! । ५२
- स्वातंत्र्यातील अधोगती । ५९
- प्रजासत्ताक दिन । ६४
- बौद्ध धर्म हिंदू धर्माची शाखा नाही; बौद्ध धर्म स्वतंत्र धर्म आहे । ७०
- नव–महाराष्ट्रातील बौद्धांचा प्रश्न । ७५
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थोरपण सूर्यासारखे स्वयंभू आहे । ८०
- बौद्ध धर्माचा स्वीकार का? । ८५
- डॉ. बाबासाहेबांचे पुण्यस्मरण । ९३
- अमर स्मृति । ९७

पुरस्कार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील पददलित अस्पृश्य वर्गाच्या बंधमुक्ततेसाठी व मानवी हक्कासाठी उभारलेल्या क्रांतीकारक आंदोलनाच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता व प्रबुद्धभारत ही वृत्तपत्रे सुरू केली. भारतीय समाजव्यवस्थेत दैन्य, दारिद्र्य व विषमतेखाली दडपलेल्या कोटयावधी दलितात जागृती, स्वाभिमान व सामर्थ्य निर्माण करण्याच्या कार्यात ह्या वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी अतुलनीय आहे. १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रहापासून ते स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या चतुःसूत्रीवर आधारलेल्या भारतीय घटनेच्या निर्मितीपर्यंत आणि त्यानंतर भारताचा गौरवशाली वारसा असणाऱ्या बौद्ध धर्माच्या पुनरूज्जीवनाच्या ऐतिहासिक कार्यापर्यंत डॉ. बाबासाहेबांनी भारताच्या पुनर्रचनेसाठी जे जे विचार देशापुढे प्रभावीपणे मांडले ते विचार जनमानसात रूजविण्याचे कार्य ह्या वृत्तपत्रांनी केले आहे.

दलितांच्या बंधमुक्ततेच्या संग्रामाच्या ऐन धुमश्चक्रीच्या काळखंडातील डॉ. बाबासाहेबांनी स्वतः लिहिलेले बहिष्कृत भारतातील अग्रलेख हे तोफेच्या गोळ्या प्रमाणे आहेत. ते अग्रलेख एकत्रितपणे अगोदरच छापले गेले आहेत. ते अग्रलेख दलित वर्गाच्या चळवळीच्या आजच्या अभ्यासकांना, नेत्यांना, कार्यकर्त्यांना व विचारवंताना उपयुक्त व मार्गदर्शक ठरले आहे.

अशाच प्रकारेच डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनाच्या अखेरच्या पर्वात बौद्धधर्म प्रवर्तनाच्या महान चळवळीच्या प्रसारासाठी सुरू केलेल्या 'प्रबुद्ध भारत' ह्या साप्ताहिक पत्रातील अग्रलेख एकत्रित प्रसिद्ध करण्याचा 'आनंद प्रकाशन' या संस्थेनी केलेला हा उपक्रम आहे.तो केवळ स्तुत्य आहे. एवढेच नव्हे तर चळवळीच्या वाटचालीचे दर्शन घडवून देणारे अत्यावश्यक असे हे कार्य आहे.

'प्रबुद्ध भारत' साप्ताहिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत

त्यांनीच सुरू केले व ते त्यांच्या महानिर्वाणानंतर त्यांचे एकमेव सुपुत्र दिवंगत माननीय भय्यासाहेब आंबेडकर यांनी १९६१ पर्यंत चालविले. या कालखंडातील दलितवर्गाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक चळवळीचे व विचारांचे प्रभावी व वस्तुनिष्ठ दर्शन प्रबुद्ध भारताच्या अग्रलेखाद्वारे घडते. भारतीय राज्यघटनेद्वारे दलितांना प्राप्त झालेल्या मानवी हक्कानंतर दलित समाजाचे सांस्कृतिक व धार्मिक उत्थापन करण्यासाठी बाबासाहेबांनी उभारलेल्या बौद्धधर्म प्रवर्तनाच्या चळवळीच्या उद्दिष्टांचा व आकांक्षेचे जे दिग्दर्शन प्रबुद्ध भारताच्या अग्रलेखातून व अन्य लेखातून घडते, ते या चळवळीच्या प्रसाराच्या दृष्टीने फार मौलिक असेच आहे.

प्रबुद्ध भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रश्नावरील हे सर्व अग्रलेख अभ्यासकांना व आंबेडकरी आंदोलनातील कार्यकर्त्यांना व नेत्यांना सतत मार्गदर्शक ठरतील यात शंका नाही.

प्रबुद्ध भारतातील अग्रलेखांचा हा संग्रह ग्रंथ प्रकाशित करण्यात पुढे आलेली 'आनंद प्रकाशन' ही संस्था व तिचे प्रवर्तक श्री. शंकरराव हातोले, यांना धन्यवाद देऊन प्रा. क्षीरसागर व प्रा. पवार त्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. त्यांच्या प्रकाशन संस्थेमार्फत अशा प्रकारचे विविध ग्रंथ प्रकाशित होवोत ही शुभेच्छा.

घनःशाम तळवटकर
दि. २-२-१९८०

सिद्धार्थ कॉलेज
आनंद भवन,
मुंबई – ४०००२३

प्रास्ताविक

शतकानुशतकापासून दलित समाज वर्णवर्चस्व गुलामीमध्ये खितपत पडलेला होता. सत्ता, संपत्ती, शस्त्रे आणि ज्ञान या पासून त्यास जाणीवपूर्वक वंचीत केलेले होते. त्याने आपली शक्ती, चेतना, प्रज्ञा आणि गतिशिलता गमविलेली होती या देशामध्ये तथाकथीत संत, महात्मे निर्माण झाले. राजे महाराजे उदयास आले. आक्रमणानंतर आक्रमणे होत राहिली आणि अनेक धर्म सुधारणावादी पथोपपंथ उदयास आले. परंतु त्या कोणालाही दलितांची दया आली नाही.

अशा एका दलित समाजामध्ये बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. त्यांना एक अस्पृश्य म्हणून अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरीही त्यांनी ज्ञानाने व कर्तृत्वाने मोठे होण्याची जिद्द सोडली नाही. त्यांनी उच्चविद्या प्राप्त केली. तरीही जन्मावरून प्रतिष्ठेचे मोजमाप करणाऱ्या हिंदू समाजाने त्याची ही अवहेलना केली. परंतु पाश्चात्य विद्या, पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि पाश्चात्यांचा विश्वमानवतावाद याने प्रेरित झालेल्या या महामानवाने दलितांच्या, शोषितांच्या मुक्तीसाठी लढा देण्याचा निश्चय करून रूढीग्रस्त भारतीय मनाला हादरा दिला. त्यांनी जवळपास १९१९ पासून दलितांच्या हितासाठी लढा देण्यास सुरूवात केली.

त्यांनी १९१९ मध्ये ब्रिटिशांनी नियुक्त केलेल्या साऊथबरो फ्रांचाइज कमेटीसमोर साक्ष देताना स्पष्ट केले की, दलितांना त्यांच्या राजकीय हक्कांच्या संरक्षणासाठी विभक्त मतदार संघ दिले जावे. हिंदूधर्मीयांनी या मागणीस विरोध केला. शेवटी १९३२ मध्ये महात्मा गांधी आणि त्यांच्यामध्ये करार झाला. त्याद्वारे अस्पृश्यांना विभक्त मतदार संघाऐवजी काही राखीव मतदार संघ मिळाले. बाबासाहेब आंबेडकरांचे त्यामुळे समाधान झाले नाही. पुन्हा एकदा त्यांनी १९४७ मध्ये घटना समितीला सादर केलेल्या निवेदनामध्ये दलितासाठी विभक्त मतदार संघाची मागणी केली. त्याही वेळी ही मागणी मान्य झाली नाही. पुढे घटना समितीचा अध्यक्ष म्हणून त्यांनी जी घटना तयार केली त्यामध्ये दलितांना इतराप्रमाणे राजकीय हक्क देऊ केले.

बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी तहहयात प्रयत्न केले. १९२७ मध्ये त्यांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून सामाजिक समतेची जोरदार मागणी केली. परंतु हिंदू धर्मानी त्यांना विरोध केला. त्यामुळे ज्या हिंदू धर्माने जातीयता लादली त्या हिंदू धर्माचाच त्याग करण्याची घोषणा १९३५ साली केली. शेवटी हिंदू समाज सुधारणा विरोधी असल्याची खात्री पटल्या मूळेच १४ ऑक्टो. १९५६ ला विजया दशमीच्या दिवशी बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या असंख्य बांधवाना ती दिली.

दलितांची उन्नती शिक्षणा शिवाय होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी आपल्या बांधवाना शिक्षणासाठी प्रवृत केले. घटनेद्वारे दलितांना नाकारलेला शिक्षणाचा अधिकार त्यांनी पुन्हा दलितांना मिळवून दिला.

दलितांच्या व शोषितांच्या आर्थिक विकासासाठी समान संधी दिली पाहिजे असे त्यांचे मत होते. मोठमोठ्या उद्योग धंद्याचे व जमिनीचे राष्ट्रीकरण झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. दलितांना सरकारी नोकरीमध्ये राखीव जागा द्यावयास पाहिजे असे त्यांचे मत होते जमिनीचे राष्ट्रीयकरणाचा मुद्दा सोडल्यास बाकी सर्व मागण्या फलद्रुप झाल्या. अशा रीतीने बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलितांसाठीच प्रयत्न केले असे नव्हे. या देशाला त्यांनी सामाजिक समतेची विचारसरणी दिली. परिश्रमपूर्वक तयार केलेली लोकसत्ताक गणराज्याची घटना दिली आणि बौद्ध धम्माचे प्रवर्तन करून समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्वावर आधारीत शास्त्रशुद्ध असा समाजधर्म त्यांनी दिला. देशाची अखंडता आणि एकात्मता यामध्ये त्यांनी विश्वास व्यक्त केला. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांचे या देशावर अनंत उपकार आहेत. हे उपकार कोणीही नाकारू शकत नाही. त्यांनी या देशातील दलितावर आणि देशावरच उपकार केलेत असे नाही, तर त्यांनी अखिल मानवतेवर फार मोठे उपकार केले आहेत. जेथे जेथे मानवी समाज पिळला गेलेला आहे तेथे तेथे बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार उपयुक्त आहेत. जगातील सर्व शोषितांना त्यांनी आपल्या विचाराने आणि कृतीने प्रस्थापित शोषक वर्गाविरूद्ध बंड केले पाहिजे असा संदेश दिला. त्यांनी बौद्ध धम्माचे प्रवर्तन करून जगातील सर्व बौद्ध धम्मीयांशी आपली जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. बौद्ध धम्माच्या माध्यमाने त्यांनी अखिल मानवतेला

संघर्षाच्या सोडवणुकीसाठी शांतीचा, करूणेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण मानव समाजाला वंद्य आहेत.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आचारविचारांच्या प्रसारासाठी अनेक साधनांची निर्मिती केलेली होती. स्वतंत्र मजूर पक्ष, शेडयुल्ड कास्ट्स फेडरेशन आणि रिपब्लिकन पक्ष या राजकीय पक्षांची त्यानी स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभा, समाज समता संघ, समता सैनिक दल या सामाजिक संस्थांची आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची त्यांनी स्थापना केली. ह्या सर्व संस्था किंवा साधनांप्रमाणे त्यांनी काही वृत्तपत्रांची देखील निर्मिती केली. त्यांनी वृत्तपत्राच्याद्वारे दलितांना सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातून जागृत करण्याचे, त्यांचे प्रबोधन करण्याचे आणि अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा देण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कार्य केले.

त्यांनी सर्व प्रथम ३१ जानेवारी १९२० पासून मुंबई येथून ' मूकनायक ' नावाचे साप्ताहिक सुरू केले. जेव्हा जुलै १९२० मध्ये बाबासाहेबांनी बार ॲट लॉ च्या शिक्षणासाठी मुंबई सोडली तेव्हा पासून मूकनायक चालविण्याची जबाबदारी श्री ज्ञानदेव ध्रुवनाक घोलप (सातारा) यांनी स्वीकारली. हे वृत्तपत्र १९२३ पर्यंत चालू होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज जागृतीचे कार्य करण्यासाठी २० जुलै १९२४ला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. या सभेतर्फे १९ व २० मार्च १९२७ला कुलाबा येथे भरलेल्या पहिल्या अधिवेशनामध्ये महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यांना हिंदू धर्मियाकडून प्रखर विरोध झाला. अशा परिस्थितीत दलितांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी व त्यांना सत्याग्रह करण्यास प्रवृत्त करण्यासाठी एक योग्य अशी पार्श्वभूमी वर्तमान पत्राद्वारे करण्याचे त्याने ठरविले. ३ एप्रिल १९२७ पासून त्यांनी " बहिष्कृत भारत " नावाचे एक पाक्षिक सुरु केले. बहिष्कृत भारताने समाज जागृतीचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. वर्ण–वर्चस्वावर टीका करीत असतांना त्यांनी आपला तोल न सुटू देता वृत्तपत्राचा दर्जा कायम ठेवला. बहिष्कृत भारत १५ नोव्हेंबर १९२९ पर्यंत अस्तित्वात होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० नोव्हेंबर १९२९ पासून 'जनता' नावाचे पाक्षिक चालविण्यास सुरुवात केली. ३१ ऑक्टोबर १९३१ मध्ये 'जनता' साप्ताहिक बनले. ' जनता ' साप्ताहिक फेब्रुवारी १९५६ पर्यंत अस्तित्वात होते. श्री. देवराव नाईक हे जनताचे पहिले संपादक होते. त्यांच्या नंतर भा. र. कद्रेकर, ग. नि. सहस्त्रबुद्धे,

बी. सी. कांबळे आणि यशवंतराव आंबेडकर यांनी अनुक्रमे संपादकाचे कार्य केले. याच कालखंडामध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेमध्ये भारतीय दलितांची बाजू मांडली. १९३२ सालचा प्रसिद्ध असा 'पुणे करार' केला. १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. तसेच १९४२मध्ये शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. १९४६ मध्ये घटना समितीचे सदस्य व १९४७ मध्ये घटना मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. २६ नोव्हेंबर १९४९ ला देशाला घटना अर्पण केली.

बाबासाहेब आंबेडकरांनी 'जनता' चे नामांतर करून ४ फेब्रुवारी १९५६ पासून 'प्रबुद्ध भारत' नावाचे साप्ताहिक सुरू केले. १४ ऑक्टोबर १९५६ ला विजयादशमीच्या शुभदिनी बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ ला यवला येथे हिंदू धर्माचा त्याग करण्याची जी प्रतिज्ञा केलली होती, ती खरी करून दाखवली. बौद्ध धम्माचा स्वीकार केला. ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेब आंबेडकरांचे निर्वाण झाले. त्यांच्या निर्वाणा नंतर 'प्रबुद्ध भारत' चालविण्याची जबाबदारी एका संपादक मंडळावर येवून पडली. त्या संपादक मंडळामध्ये भाऊराव कृ. गायकवाड, आर. डी. भंडारे आणि बी. सी. कांबळे होते. संपादक होते मुकुंदराव आ आंबेडकर. बाबासाहेबाच्या परिनिर्वाणा नंतर प्रबुद्ध भारताचा पहिला अंक दिनांक २६ जाने. १९५७ ला निघाला. पुढे चालून संपादक मंडळामध्ये घन.श्याम तळवटकर यांना घेण्यात आले. १९५९ मध्ये जेव्हा बी सी. कांबळे यांनी रिपब्लिकन पक्षांतर्गत दुसरा गट स्थापना केला, तेव्हा त्यांना त्यांनी संपादक मंडळामधून कमी करण्यात आले आणि उत्तर प्रदेशाचे तत्कालीन रिपब्लिकन नेते श्री. बी. पी. मौर्य यांना तेथे घेण्यात आले. संपादक म्हणून काही काळ भय्यासाहेब आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, दा. ता. रुपवते, शंकरराव खरात आणि भा. र. कद्रेकर यांनी अनुक्रमे काम पाहिले. हे साप्ताहिक 'प्रबुद्ध भारत प्रिंटिंग प्रेस' गोकूळदास पास्ता रोड, दादर मुंबई, १४ येथे छापून प्रसिद्ध केले जाई.

प्रबुद्ध भारताचा उद्देश स्पष्ट करतांना पहिल्याच संपादकीय अग्रलेखात बी. सी. कांबळे यांनी असे नमूद केलेले होते की, " मूकनायक " ह्या नावापासून ते सध्याच्या ' प्रबुद्ध भारत' या नावापर्यंतचा अगदी ओझरता इतिहास पाहिल्यास असे दिसते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ हाती घेतल्यापासून त्या त्या वेळेचे जे ' सामाजिक ' जीवन त्यांना दिसले त्याचे अचूक निदान करून त्यांनी पत्रांना नावे दिली. आता भारतीय जनतेस केवळ जागृत करून भागणार नाही तर तिला प्रबुद्ध बनविण्याचे सर्व प्रयत्न केले पाहिजेत, तरच तरणोपाय आहे आणि

म्हणूनच 'जनता' साप्ताहिकाचे रुपांतर या क्रमानुसार ' प्रबुद्ध भारता ' मध्ये केले गेले. यावरून स्पष्ट होते की, लोकांना ' प्रबुद्ध ' करणे हा 'प्रबुद्ध भारताचा' मुख्य उद्देश होता.

रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येण्यापूर्वी 'प्रबुद्ध भारत' हे शेडचुल्ड कास्ट फेडरशनचे मुख्यपत्र होते. ३ ऑक्टो.१९५७ ला रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्या नंतर 'प्रबुद्ध भारत' हे रिपब्लिकन पक्षाचे मुख्यपत्र बनले. या शिवाय प्रबुद्ध भारतामध्ये दलितांच्या, बौद्धांच्या ज्या काही सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व साहित्यिक चळवळी त्या काळामध्ये अस्तित्वात आल्या. त्या सर्व चळवळीचे 'प्रबुद्ध भारत ' या साप्ताहिकामध्ये प्रतिबिंब पडलेले दिसते. प्रबुद्ध भारत म्हणजे तत्कालीन दलित-बौद्धांच्या विचारांची व चळवळीची एक नोंद होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी दलित-बौद्धांच्या चळवळीला कितपत वाढवले, कितपत बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार केला आणि कितपत कार्य केले याची माहिती प्रबुद्ध भारताच्या अंकाच्या अवलोकनावरून मिळू शकेल. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर त्यांच्या अनुयायांनी बरेचसे महत्त्वाचे कार्य केलेले आहे. आजची रिपब्लिकन पक्षाची अवस्था आणि एकंदर दलित चळवळीची असमर्थता पाहून दलित नेत्यांनी बाबासाहेबांच्या नंतर काय कार्य केले असे अनेकांना वाटण्याची शक्यता आहे. परंतु बाबासाहेबांच्या निर्वाणा नंतरही दलित चळवळ काही वर्षे अत्यंत जोमाने चालली; याची कल्पना प्रबुद्ध भारताच्या अंकावरून येऊ शकेल.

प्रबुद्ध भारत हे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्र होते. त्यामुळे साहजिकच पक्षाच्या उद्देशासंबंधी, कार्यासंबंधी आणि पक्षातील घडामोडीसंबंधी त्यामध्ये भरपूर विवेचन येत असे. शिवाय त्यामधून बौद्धांना व दलितांना देशाच्या एकंदर राजकीय परिस्थिती विषयी जागृत करण्याचे प्रयत्न केले जात असत. दलितांच्या व बौद्धांच्या दुःखाना आणि मागासलेल्या जातीच्या व मजुरांच्या दुःखांना वाचा फोडण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य या वृत्तपत्राने केले. त्यामधून बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक इ. मौलिक विचारांची माहिती देणारे लेख प्रसिद्ध करण्यात येत असत. या वृत्तपत्राने बाबासाहेबांच्यानंतर निर्माण झालेल्या विदारक परिस्थितीमध्ये दलितांना दिलासा देण्याचा व त्यांना मार्गदर्शन करण्याचा फार मोठा प्रयत्न केलेला आहे. या वृत्तपत्राने दलित व बौद्ध समाजातील अनेक कार्यकर्त्यांना, लेखकांना आणि कवींना निर्माण करण्याचे

चे कार्य केले आहे. हे कार्य करीत असतांना या वृत्तपत्राने सतत आपला उच्च दर्जा कायम ठेवला.

या वृत्तपत्राने बाबासाहेब आंबेडकरांच्या वृतपत्रीय कार्याला वाहून घेण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे.

'प्रबुद्ध भारता'चे एक संपादक व पीपल्स एज्युकेशन सोसायटी (मुंबई) चे सचिव मा. घनःशामजी तळवटकरसाहेब यांनी पुस्तकाच्या प्रारंभी दोन शब्द लिहून आम्हाला आशीर्वाद व प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

तसेच पुस्तकाचे प्रकाशक श्री. एस. यू. हातोले यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल आणि श्री. पी. एस. अतकरे यांनी पुस्तकाचे सुबक मुद्रण केल्याबद्दल आम्ही त्यांचे व त्यांच्या मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांचे आभारी आहोत.

संपादक

प्रा. रामचंद्र क्षीरसागर
प्रा. भाऊराव पवार

औरंगाबाद
दि. ४ फेब्रुवारी १९८०



9

दलितांचा भगवंत गेला!

(दिनांक २६ जानेवारी १९५७)

ता. ६ डिसेंबर १९५६ रोजी, दलितांचे 'भगवंत' बाबासाहेब आंबेडकर गेले. फक्त तीनच महिन्यापूर्वी, आम्ही त्यांचा 'आंबेडकर बौद्ध दीक्षा विशेषांक' प्रबुद्ध भारतच्या वाचकाच्या सेवेशी ठेवला त्यावेळी आम्हास काय कल्पना की, लगेच त्यांचा महानिर्वाण विशेषांक काढण्याचा प्रसंग आमच्या लेखणीवर येईल. निसर्गाचा संकेत की माणसांचा संकेत, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निर्वाणापूर्वी कोणाची भेट न घेता, व कोणाशीही न बोलता, बिलकुल अचानकपणे, आपल्या मधून नाहीसे झाले. बाबासाहेब हे अद्वितीय महापुरुष तर खरेच, पण त्यांचे महा-निर्वाण हे त्यांतूनही अद्वितीय म्हणजे जगात घडले नाही, घडणार नाही, असे झाले. त्या महानिर्वाणानिमित्त काढण्याचा विशेषांक त्या दर्जाचा निघावा अशीच सर्वांची मनिषा असणार! हा विशेषांक निघण्यास काहीसा उशीर झाला, असे सकृतदर्शनी वाटण्याचा संभव आहे. प्रबुद्ध भारताच्या वाचकांची मते मोठी व आमच्या जवळची यंत्रादि सामुग्री छोटी. अशा अडचणीत विशेषांकाचे काम करावे लागले. तथापि, दर आठवड्यास नेहमीचा निघणारा आठ पृष्ठांचा अंक लक्षात घेतला, तर एक पृष्ठास एक दिवस असा हिशोब पाहिल्यावर पृष्ठाचा हा अंक भरपूर व दुर्मिळ छायाचित्रांनिशी निघतो. यात तसा उशीर नाही असेच वाचकांना कळून येईल. हा अंक खास संग्रही ठेवण्याच्या दर्जाचा आहे, यात संशय नाही.

महानिर्वाणाचा विशेषांक सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी, प्रज्ञावंत, झुंजार व जगातील अखिल मानवतेस ललामभूत होईल, अशा त्यांच्या जीवनाच्या इतिहासाची आठवण होऊन आमच्या अंतःकरणात प्रचंड विचारांची गर्दी उसळून येते. त्यांचे सर्व दिग्दर्शन करणे अशक्य प्राप्त आहे. तथापि, संक्षेपाने ते नमूद करणे आमचे परम कर्तव्यच आहे.

बाबासाहेब दलित समाजाचे भगवंत होते. असे आम्ही वर म्हटले आहे. भगवंत म्हणजे देव नव्हे, अगर अवतारही नव्हे. भगवंत म्हणजे महापुरुष! दरेक समाजाला, एकेक भगवंत आजवर लाभलेला होता. ख्रिस्ती जनांना 'येशू' मध्ये, मुसलमानांना 'महमदा' मध्ये, हिंदू सवर्णांना 'कृष्णा' मध्ये, भगवंत लाभलेला होता. अडीच हजार वर्षात भारतातील दलितांना बुद्धानंतर कोणताही भगवंत प्राप्त झालेला नव्हता. चोखामेळा. रोहीदास, नंदनार हे दलितांना संत मिळाले खरे, पण त्यात 'भगवंत' नव्हता. त्यांना प्रज्ञेची, ज्ञान तेजाची जोड मिळाली नव्हती. बाबासाहेब आंबेडकरांमध्ये तो भगवंत त्यांना लाभला व ६ डिसेंबर १९५६ रोजी पार्थीव देह निघून गेला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्येने, चारित्र्याने, करारीपणाने व धैर्याने एवढे महान होते की, त्यांची गणना, सहजा सहजी, 'देव' अगर 'अवतार' म्हणून भारतातील सर्व लोकांनी विशेषत: वरिष्ठ सवर्ण हिंदूंनी अवश्य केली असती. पण नेमकी हीच गोष्ट बाबासाहेबांना नको होती. आयते चालून येत असलेले 'देव' पण त्यांनी मुद्दाम अव्हेरिले होते.

देव व अवतार यावर माझा विश्वास नाही अशी भीम-गर्जना त्यांनी केली होती. मी मनुष्य आहे हे त्यांना सांगावयाचे होते. त्यांनी अवताराच्या खुळचा कल्पनेवर प्रचंड प्रहार केले. त्यापुढे मुख्य प्रश्न होता तो असा की, काही मोठचा माणसांना देव अवतार मानावयाचे व सामान्य अनुयायांना बुद्धीवादापासून व त्यांनी ज्ञानी बनण्यापासून 'भ्रष्ट' करावयाचे की, कोणी 'अवतार' नाही, 'देव' नाही हे जगजाहीर करून मानवतेची विशेषत: भारतीय जनतेची, अप्रबुद्ध कल्पनामधून कायमची मुक्तता करावयाची? त्यांचे हिंदूधर्मातील, अवतारावरील हल्ले याच दृष्टीकोणातून समजावून घ्यावयास पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वरील फक्त दुसराच मार्ग मान्य होता व पहिल्याचा त्यांना तिरस्कार होता. आपल्या दलित वर्गीय अनुयायांना, हिंदूना, भारतीयांना, नव्हे जगातील अखिल मानव जातीला अप्रबुद्ध कल्पनामधून मुक्त करण्याच्या प्रेरणेने त्यांनी स्वत:कडे चालून येत असलेले 'देवपण' व 'अवतारपण' अव्हेरिले. सामान्य व्यक्तीना, खासदारपदाचा वा पंतप्रधानकीचा मोह देखील दूर करता येत नाही. मात्र बाबासाहेबांच्या मनाची 'उच्चता' त्याही पलीकडील होती. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय दलितांचेच अगर भारतीय जनतेचेच नव्हे, तर अखिल मानवतेचे आदर्श मार्गदर्शक होते असे कोण म्हणू शकणार नाही? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात त्यांना सतत बोचत राहणारी गोष्ट होती ती, हिंदू विषम समाज रचनेची.

हिंदूधर्म हा मनुष्याने केलेला नसून देवांनी केलेला आहे. अशा उच्चवर्णीय हिंदूंचा समज असल्याने व हिंदूधर्माची शास्त्रेही त्याचाच पुकार करीत असल्याने, हा धर्म मनुष्याने सुधारणेच्या पलीकडील आहे व त्यामुळे हिंदूधर्मातील, सामाजिक विषमता त्रिकालबाधित राहणार याची खात्री त्यांना पटल्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखेर बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हा बौद्ध धर्म केवळ मनुष्य मात्राच्या कल्याणासाठी म्हणजे मनुष्य मात्राची दुःख दूर करण्यासाठी असल्याने व तो धर्म देवाने स्थापलेला नसल्यामुळे, याच धर्माचा स्वीकार दलित बांधवांनी व हिंदूदि सर्व भारतीयांनी नव्हे जगातील लोकांनी स्वीकारावा असा त्यांचा आग्रह होता. इतर बौद्ध लोक धर्माच्या स्वीकाराबाबतचे धोरण, आज उद्या व दूरच्या भविष्यकाळात ठेवतील ते ठेवो. परंतु दलित बांधवांनी बौद्ध दीक्षेचा अर्थ समजावून घेतला पाहिजे; आणि तो हा की, अस्पृश्य समाज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या समाजाचे रूपांतर जाती विरहित व विषमविरहित 'बौद्ध समाजात' करावयाचे आहे. सरकार बदलणे सोपे आहे; पण समाज बदलणे हे फार कठीण कार्य आहे. निवडणुकामध्ये ५–१० वर्षात सरकारे बदलता येतात. पण समाज कोण बदलू शकतो? जे युग बदलणारे महापुरुष असतात तेच समाज बदलू शकतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे युग प्रवर्तक म्हणजे युग बदलणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, बौद्ध धर्म हा ज्ञान-धर्म आहे. 'बुद्धं सरणं गच्छमि' म्हणजे तरी काय? जो ज्ञान संपन्न आहे त्यास म्हणजे बुद्धास मी अनुसरतो, असा त्याचा अर्थ आहे. बुद्ध हे कोणा व्यक्तीचे नाव नव्हे. बुद्ध ही संज्ञा आहे. जो जो ज्ञानाने प्रकाशित होतो व अज्ञानाचा अंधार नष्ट करतो तो बुद्ध! मनुष्याला जगण्यासाठी जेवढे अन्न आवश्यक आहे, तेवढेच आवश्यक ज्ञानही आहे हे जगात फक्त प्रथम सिद्धार्थाने (बुद्धाने), अडीच हजार वर्षांपूर्वी सांगितले असा हा ज्ञानधर्म आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत भगवान बुद्ध हे सर्वांत मोठे समाजवादी होते. बुद्धाच्या धर्मात समाजवाद, साम्यवादहि आहे. 'संघ सरणं गच्छमि' म्हणजे तरी काय? संघाची मूळ कल्पना बुद्धाची. संघ म्हणजे सामाजिक जीवन? त्या जीवनास मी अनुसरतो असा त्याचा अर्थ आहे. भगवान बुद्धाने जो धर्म सांगितला तो देखील मानवाचे सामाजिक संबंध समतेचे असले पाहिजेत असा सामाजिक संदेश देणारा सांगितला. दलितांना जो धर्म हवा तो सामाजिक संदेशाचा हवा. कोणताही धर्म दलितांपुढे ठेवला तर त्या धर्माचा सामाजिक संदेश काय आहे असा खडा प्रश्न दरेक दलित बांधवांने विचारावयास सिद्ध झाले पाहिजे, बौद्ध धर्माची

दीक्षा घेतल्यामुळे अस्पृश्य मानलेल्या समाजांचे हक्क जातील, असे भय काही वृत्तपत्रकार व टीकाकार निर्माण करीत आहेत. टीकाकार अशा प्रकारे टीका करून जे सूचित करतात, त्यावरून धर्माचा व हक्काचा संबंध आहे, हे लोकांच्या मनात भरविण्यासारखच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर तरी आता भारत सरकारने व भारतीय जनतेने याबाबत 'योग्य' तो दृष्टीकोण ठेवावा अशी आमची आग्रहाची विनंती आहे. भारताचे पंतप्रधान म्हणतात, जगापुढे दोनच मार्ग आहेत. एक युद्धाचा, दुसरा बुद्धाचा! मग आता जर बुद्धाचाच मार्ग जर जगापुढे असेल व तोच मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या अनुयायांनी स्वीकारलेला असेल तर भारत सरकार व नेहरू यांनी बौद्ध धर्म स्वीकाराचे स्वागत केले पाहिजे.

बौद्ध दीक्षेच्या अनुरोधाने पार्लमेंट ॲसेम्बलीमधील ज्या राखीव जागा मानीव अस्पृश्य समाजाकरिता घटनेने ठेवण्यात आलेल्या आहेत व आगामी सार्वत्रिक निवणुकात राखीव जागा लढविल्या जाणार असल्याने त्याबद्दल उल्लेख करावासा वाटतो. यामध्ये घटनात्मक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो तो हा की, ज्या भागात, म्हणजे नागपूर, मुंबई, चांदा, नाशिक वगैरे ठिकाणी लक्षावधी अस्पृश्य मानलेल्या बांधवांनी बौद्ध दीक्षा घेतली आहे. तेथे आता ज्या शेडचुल्ड कास्टच्या नावाने राखीव जागा पार्लमेंट–ॲसेंब्लीमध्ये ठेवल्या आहेत. तेथे आता शेडचुल्ड कास्ट राहिलेले नसून बौद्धजन आहेत; तेव्हा या राखीव जागा ज्या मतदारसंघात मानीव अस्पृश्य समाजाला सहस्रावधीच्या संख्येने बौद्ध धर्मात पदार्पण केले आहे. तेथे निव्वळ अर्थशून्य ठरणार, एवढेच नव्हेतर घटनाबाहच ठरण्याचा संभव आहे. म्हणून भारत सरकार व पंतप्रधान नेहरू यांना आग्रहाने सांगावेत वाटते की त्यांनी याबाबतचे धोरण जाहीर करावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री जातीचे तर महान कैवारी होते. हिंदू धर्मातील व हिंदू समाज व्यवस्थेतील स्त्री-विटंबनेविरुद्ध त्यांचा अणुरेणू उसळून निघत असे. पोटच्या मुलींना अगर पाठच्या बहिणींना देखील हिंदू समाज रचनेत माणूसकीने वागविले नाही. स्त्रियांना शिक्षण नाही, वारसा हक्क नाही, पुनर्विवाह नाही, तसेच इतर समान हक्क नाही, ही स्त्री जातीची विटंबना पाहूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू–कोडबिल' लोकसभेपुढे आणले. स्त्री समाज या कार्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुढे धन्यवाद राहील. यात शंका नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजूरांचे तर फार मोठे उद्धारकर्ते होते. मंजूरांच्या मजुरीचा प्रश्न त्यांनी प्रथम हाती घेतला, मानीव अस्पृश्य म्हणजे कोण? मजूरांचे मजूर! मजुरांचा पक्ष मजूरांनी चालवून राज्यसत्ता घेण्यासाठी त्यानी 'स्वतंत्रपक्ष' काढला. आज दुर्दैवाने मजूरांचा म्हणून पक्ष नाही. मजूरांचे ऐक्य कसे निर्माण होईल याचा त्यांनी पूर्ण विचार केला होता. जो पर्यंत विषम अशी हिंदू धर्मीय दुष्ट जाती-व्यवस्था आहे, तो पर्यंत मजूरांचे ऐक्य व कल्याण साधणार नाही, असाही इशारा त्यांनी देऊन भारतीय राज्यघटनेचा व भारतीय कायद्यांचा पाया घालण्याचे अत्यंत बिकट कार्य पार पाडण्याचे फार मोठे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याकडे आहे. अमेरिकेच्या घटनेस जेफरसनने वळण लावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय जेफरसन असे संबोधीले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंगी असामान्य धैर्य होते. इंग्रजी भाषेतील एका म्हणी प्रमाणे ज्या ठिकाणी जाण्यास देवदूत देखील बिचकतील, त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्याय दिसताच निधडया छातीने पाय टाकला व त्या ठिकाणचे कार्य पूर्ण तडीस नेले. राजकारणामध्ये त्याचा कोंडमारा करण्याचे दुष्ट कृत्य काँग्रेसने केले.

गोलमेज परिषदेत त्याचा कोंडमारा केला. परंतु जेवढा जेवढा त्यांचा कोंडमारा करण्यात आला तेवढे तेवढे अधिक तेजस्वी अंगच्या धैर्यामुळे व ज्ञानामुळे बनले व दर प्रसंगातून पार पडण्यासाठी त्यांना कोणता मार्ग सापडला; शेवटी आता भगवान बुद्धाच्या धर्माचा जो मार्ग त्यांना सापडला व त्यानी सर्वांना विशद करून सांगीतला तो सर्व मार्गात श्रेष्ठ व उत्कृष्ठ असांच आहे. त्यापेक्षा अधिक उत्कृष्ठ मार्ग कोणालाही लाभणार नाही. भारतामध्ये पार्लमेंटरी राज्यपद्धती असल्याशिवाय राजकीय दृष्टचा भारतास तरणोपाय नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता. पार्लमेंटरी राज्यपद्धती रुज् करण्याकरिता, या देशात दोन राजकीय पक्ष असावेत असे त्यांना वाटे. काँग्रेस पक्षाने हुकुमशाहीचे रूप धारण केले असल्यामुळे काँग्रेसविरोधी असा एकच पक्ष असावा अशी त्यांची इच्छा होती. काँग्रेसविरुद्ध दुष्टभावाने ते असे म्हणत नव्हते. तर भारतात लोकशाही व पार्लमेंटरी राज्यपद्धती स्थापन करण्यासाठी त्यांची तळमळ होती.

डॉ, बाबासाहेब आंबेडकर व गांधीजी यांचे काही पूर्वीचे वैर नव्हते. वैयक्तीकरित्या दोघात भेद नव्हता परंतु निर्माण झाला तो सार्वजनिक कार्या-

बाबत हिंदू धर्मातील वर्णाश्रम व जातीपद्धती आपल्याला मान्य आहे काय? असा बाबासाहेब आंबेडकरांचा गांधीजींना सवाल होता. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही की गांधीजींनी सांगून टाकले की मला वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था मान्य आहे. गांधीजी म्हणत मी हिंदू आहे व जो जात व वर्ण पाळीत नाही तो हिंदू नव्हे. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरे गांधीजी कळले व त्यांचा भेद सुरू होऊन दोघांच्या आयुष्य अखेर राहीला. याबाबत आता पुढे इतिहासच बरा वाईट निर्वाळा देऊ शकेल.

असा हा दलितांचा भगवंत, युगप्रर्वतक, स्त्री जातीचा कैवारी, मजूरांचा प्रणेता, राज्यघटनेचा जनक, अचानक आपल्या मधून गेला आहे. त्यांचे महानिर्वाण म्हणजे आज तरी मोठे गूढ आहे. अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या वर्कींग कमिटीने त्याच्या मृत्यूबाबत चौकशीची मागणी केली आहे. भारत सरकार ही चौकशीची मागणी नाकारणार नाही. अशी आम्ही अपेक्षा करतो. सर्व बांधवांना नम्र विनंती की, आता आपण शोक आवरला पाहिजे आणि बाबासाहेब आंबेडकरांनी उभे केलेले कार्य तडीस नेण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. बाबासाहेबाच्या नंतर त्यांच्या संघटनेचा वोजवारा होईल असे ज्यांना वाटत असेल त्यांना आपण खोटे ठरविले पाहिजे. बाबासाहेब जसे कच्च्या गुरूचे चेले नव्हते, त्याचप्रमाणे त्यांचे कोटचावधी अनुयायी देखील कच्च्या गुरूचे चेले नाहीत. कोणत्याही संघटनेतील अगर पक्षातील कोणत्याही पुढाऱ्याच्या मांडीला मांडी, लेखणीला लेखणी व प्रसंग पडला तर मनगटाला मनगट घासून ही कार्य पुढे चालविण्याच्या तोडीचे बाबाचे अनुयायी आहेत यात तिळमात्र संशय नाही.

शेवटी बौद्ध युगाची प्रस्थापना करणाऱ्या महापुरुषास अत्यंत नम्रपणे श्रद्धांजली अर्पण करून हा लेख संपवितो.

(वी सीं कांबळे)
२६ जानेवारी १९५७

संपादक मंडळ
भाऊराव कृ गायकवाड
आर. डी. भंडारे
बीं. सी. कांबळे
सहसंपादक
मुकुंदराव आ. आंबेडकर

**

२

युद्ध की बुद्ध?

(दिनांक २५ मे १९५७)

भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी नुकतीच सिलोनला भेट दिली. लंकेच्या आपल्या दौऱ्यातील भाषणात त्यांनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे समर्थन करताना सांगितले की, 'जगापुढे दोनच मार्ग आहेत. एक युद्धाचा आणि दुसरा बुद्धाचा. आम्ही बुद्धाचा. मार्ग स्वीकारला असून परस्पराशी वागताना 'पंचशील' च्या अनुरोधाने चालत आहोत.' पंडित नेहरूंनी परराष्ट्रीय धोरणात पंचशील राष्ट्रांतील जनतेशी सत्ताधारी पक्षाने पाळावयाचे पंचशील काही ठरविलेले नाही. या प्रसंगी नेहरूंचे राष्ट्रीय अथवा परराष्ट्रीय धोरणाची छाननी आम्ही करीत नाही. परंतु याच सुमारास दिल्ली येथे झालेल्या व्याख्यानात बॅरिस्टर सावरकर यानी जगापुढे 'युद्ध की बुद्ध?' हा प्रश्न असल्याचे सांगितले.

बॅ. सावरकर हे १८५७ च्या शताब्दि समारंभात बोलत होते. त्यामुळे त्यांनी हा बुद्धाचा केलेला उल्लेख विचारात घेतलाच पाहिजे. बॅ. सावरकर यांना भगवान बुद्धाच्या विचारसरणीचे वावडे आहे. ही गोष्ट सर्वांना माहित आहेच. स्वतः सावरकर देखील त्याबाबतीत असलेली आपली नापसंती तीव्र शब्दात व्यक्त करीत असतात. त्यामुळेच आंबेडकर अनुयायांचे सावरकराशी मतभेद आहेत. बॅ. सावरकरांना असे वाटते की, भगवान तथागताचा बुद्धाचा मार्ग स्वीकारला तर देश रक्षणास, शस्त्र धारण करण्यास भारतीय तयार होणार नाहीत. कारण भगवंतानी आत्यंतिक अहिंसेचा प्रचार केला आहे. बॅ. सावरकराचा हा गैरसमज दूर करणे आम्हाला शक्य नाही. कारण एकदा एकांगी विचार करण्याची संवय माणसाला जडली तर दुसरी बाजू कितीही न्याय्य व योग्य असली तरी त्याची समजूत काढणे आणि पटविणे अशक्य होते तेव्हा बॅ. महाशयांची समजूत पटविण्याचा नाद सोडून देणेच चांगले.

आम्हा नवबौद्धाची या संबंधातील भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे आमची स्वदेश व स्वदेश रक्षणाची भूमिका बुद्धाच्या पंचशीलेवरच आधारलेली आहे तत्वज्ञानात पंचशीलेत पहिलेच शील 'प्राणातीपाता वेरमणी सिक्खोपद समादियामी' म्हणजेच मी जीवहत्या करणार नाही. गृहस्थ आणि भिरखू यासाठी वेगवेगळे आचार आहेत. गृहस्थाला 'आवश्यक हिंसा' करता येते. प. पू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागे एकदा याचे संपूर्ण विवेचन केलेले आहे.

मौजेखातर, करमणूक म्हणून मजेसाठी हिंसा करू नये हा दंडक आहे. देशावर परचक्र आले असता देश रक्षणासाठी शस्त्र हातात घेऊन शत्रूचा निःपात करावयाचा ही आवश्यक हिंसा असल्यामुळे तिला बौद्ध तत्वज्ञानात प्रतिबंध नाही. दुसरे आवश्यक हिंसेचे उदाहरण येथे देता येईल. समजा एखाद्या महिलेची प्रसूतीं संबंधी मूल पोटात आडवे आल्यामुळे आडवणूक झाली; मातेचा जीव वाचविण्यासाठी मूल कापून काढण्याचा प्रसंग डॉक्टरवर आला, तशा प्रसंगी ही आवश्यक हिंसा शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरला करावीच लागणार. बौद्ध तत्वज्ञानात तिला मान्यता दिलेली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी 'त्रिपिटक' ग्रंथाचे वाचन-मनन अभ्यास केल्यावर भगवान बुद्धाच्या शिकवणुकीचे सार सर्वस्व थोडक्यात सांगताना अहिंसेबाबत म्हटले आहे की युद्ध अयोग्य होय. परंतु जर ते सत्यासाठी आणि न्यायासाठी असेल तर योग्य होय. अशा प्रकारे अहिंसेबाबत खुलासा त्रिपिटकाच्या आधारे बाबासाहेबांनी योग्य युद्धाला संमती बौद्ध तत्वज्ञानात असल्याचे दाखवून दिले आहे. असे योग्य युद्ध झाले तर ते श्रीखंड, लाडू, बासुंदीची पंगत बसते, ते लहान मुलालाही सांगावे लागणार नाही. अशा युद्धात शत्रूच्या सैनिकांचा समाचार घ्यावा लागणारच; ही आवश्यक हिंसा झाल्याशिवाय राहणार नाही.

पण बुद्ध मार्ग स्वीकारला तर युध्दाला आपण निकामी ठरू; ही समजूत हेतू पुरस्सर मुद्दाम पसरविली जात आहे. बौध्दाविरुध्द गरळ ओकण्यासाठी व भारतात त्यांची नाचक्की करावी यासाठी हा प्रचार बॅरिस्टर सावरकरादि हिंदू महासभावादी मंडळी करीत आहेत असे आमचे प्रामाणिक मत आहे इतिहासातील सत्याकडे जाणून-बुजून डोळेझाक करण्यात येत आहे

जपानी साम्राज्यवाद्यांनी चीनवर हल्ले करताच चीनमधील बौध्द जनतेने प्राणपणाने लढून मायभूमीचे रक्षण केले हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यावेळी

जपानी बौद्ध आहेत. आपण चीनीही बौद्ध आहोत; आपल्याला परस्परांची हिंसा करावयाची नाही. हा मुद्दा त्या दोन्ही देशापैकी कोणत्याही बौद्धाने, बौद्धधर्म संस्थानी पुढे आणला नाही. जनरल चँग कै शेक याच्या कोमीटांग फौजांशी लढ–तानाही नवचीनच्या जनता फौजांनी असली शंका मनात आणली नाही. अशी एक शेकडो उदाहरणे देता येतील.

बौद्धांची अहिंसा ही नादानांची, भित्र्या भागुबाईची अहिंसा नव्हे. युद्धाला बौद्धाचा विरोध आहे. पण त्यांच्या आणि योग्य युद्धाचा प्रसंग आला तर एकही बौद्ध मागे राहणार नाही. प्रत्येक बौद्ध तळहातावर शीर घेऊन प्राणपणाने लढून देश रक्षणाचे पवित्र कर्तव्य बजाविण्यात रेसभरही मागे तर राहणार नाहीच पण उलट आघाडीवर राहील.

तेव्हा युद्ध की बुद्ध हा प्रश्न उपस्थित करून बुद्धाची शिकवण स्वीकारल्यास देश रक्षणाला जनता तयार होणार नाही ही गैर समजूत दूर करावी बुद्धाच्या मार्गानेच देशादेशात शांतता नांदेल व भयानक संहारक अस्त्राच्या वापराने होणारा विश्वनाशाचा प्रसंग टळेल.

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
एम्. ए. आंबेडकर

सहसंपादक

एम्. ए. आंबेडकर

**

३

सुस्वागतम्

शनिवार ता. १९ ऑक्टोबर १९५७.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नव्या पक्षाची निर्मिती अशोक विजयादशमीला (३ ऑक्टोबर १९५७ रोजी) नागपूर मुक्कामी झाली. भारताच्या राजकीय क्षितिजावर हा नवीन दैदिप्यमान तारा उगवला आहे. पीडितांच्या, दलितांच्या सामाजिक व्यवस्थेच्या नावाने दडपलेल्यांच्या, धर्माच्या नावाने जखडलेल्यांच्या, अर्थव्यवस्थेच्या जात्यात भरडलेल्यांच्या, जातीपातीच्या समरगाडग्यात रगडलेल्यांच्या अल्पसंख्यांक म्हणून डावलल्लेल्यांच्या, आदिवासी, टोळीवाले म्हणून गिरी कंदरात फेकलेल्यांच्या जीवनात आपल्या प्रकाशाने ती चिरस्थायी बनणार आहे. जिथे जिथे गुलामगिरी आहे तिथे तिथे तो आपल्या सर्व शक्तिनिशी धावून जाईल. गुलामांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव देऊन बंड करायला तो सिद्ध करील. जेथे जेथे ढोंगाची जठमटे असतील तेथे तेथे तो 'भीम गदा हानिल' विभूती पूजेच्या नावाने जिथे हुकूमशाही निर्माण झालेली असेल तिचा चक्काचूर करण्यासाठी तो जीवाचे रान करील. झोटिंगशाहीची बीजे पेरणाऱ्या मंडळीच्या प्रयत्नावर तो नांगर फिरवील. कोणत्याही 'वादाचा' तो गुलाम बनणार नाही. बुद्धीला शरण जाण्याचा बुद्धिप्रामण्याचाच तो सदैव पुजारी राहील. कोणत्याही प्रश्नाचा साधकबाधक विचार करून बुद्धिप्रामण्याची कसोटी लाबूनच तर्कशुद्ध निर्णय तो घेईल, पटेल तरच करील, न पटल्यास सारे जग आडवे आले तरी डगमगणार नाही. ही परमपूज्य बाबासाहेबांची शिकवण तो सदैव ध्यानात ठेविल "I am a cold blooded logician" (मी थंड डोक्याने तर्कशुद्ध विचार करतो) हा बाबासाहेबांचा वारसा राजकीय क्षेत्रात चालविण्याचा आपल्यापरीने हा पक्ष प्रयत्न करील. वस्तुनिष्ठ राजकारण तो करील, लोकांचे लोकांसाठी लोकांनी चालविलेले राज्य निर्माण करण्यासाठी तो तन मन धन वाहील. संसदीय लोकशाहीच्या मार्गाचा तो काटेकोर अवलंब करील, 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा त्याचा जीवन मार्ग राहिल.

या पक्षाच्या दालनात सर्व लोकांना प्रवेश मिळेल. अर्थात ते काही 'आव जाव घर तुम्हारा' असे प्रकरण नाही. ज्यांचा आमच्या पक्षाच्या ध्येय धोरणावर व मूलभूत तत्त्वज्ञानावर विश्वास आहे त्यांनी यावे. आमची उद्दिष्टे आहेत भारतीय घटनेचा उपोद्घातात (Preamble) हे कागदी घोडे न राहता जनतेच्या स्थानाला प्रत्यक्षतः जुंपलेला 'अश्व' बनवावा ही आमची इच्छा आहे. या तत्त्वज्ञानाच्याविरुद्ध जे आहे ते टाकाऊ आहे अशी आमची श्रद्धा आहे. भारतीय घटनाविरुद्ध भारतीय समाज रचना हे रण माजले आहे. त्यात भारतीय घटनेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, भाषण, मत आणि धार्मिक स्वातंत्र्य संधी व सामाजिक प्रतिष्ठा या बाबत समता; व्यक्तिस्वातंत्र्य व राष्ट्र ऐक्य साधणारा बंधुभाव या तत्वाचा विजय झाल्याशिवाय राहणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

या पक्षाचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. यशोमंदिराकडे होणाऱ्या वाटचालीत हा पक्ष संघटितपणे, दुर्दम्य आशावादाने मार्ग आक्रमण करील याबद्दल आमची खात्री आहे. या पक्षाचे भवितव्य उज्ज्वल आहे, या नवीन पक्षाचे मुखपत्र म्हणून 'प्रबुद्ध भारत' सदैव काम करीन, पक्ष शिस्तीला सदैव बांधलेला राहील याची हमी आम्ही देतो.

कार्यकारी संपादक
दा. ता. रूपवते

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे

सहसंपादक मंडळ
एम. ए. आंबेडकर

४

आमच्या जबाबदाऱ्या

(दिनांक २२ मार्च १९५८)

परमपूज्य बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण होऊन सव्वा वर्ष पूर्ण झाले. ६ डिसेंबर १९५७ रोजी महापुरुष आपल्यातून निघून गेला. दलितांच्या चळवळीची होडी जीवन समुद्रातून यशस्वीरित्या हाकणारा नावाडी आम्हांला सोडून गेला. त्याच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनास आम्ही मुकलो. घरातील महान कर्तबगार पुरुष निघून गेल्यावर कुटुंबाची जी दशा होते ती दलित जनतेची झाली. पुढे काय होणार? आमचे कसे होणार? चळवळ पुढे चालविता येईल किंवा नाही? संघटना टिकेल किंवा नाही? महापुरुषाने उभारलेल्या महान कामाची पूर्तता करायला आम्ही समर्थ होणार की नाही? बाबासाहेबांनी जे राजकीय व जीवन-विषयक तत्त्वज्ञान, नुसत्या आमच्याच नव्हे तर अखिल मानव जातीच्या उध्दारासाठी आम्हाला दिले. त्याची जपवणूक, प्रचार, प्रसार आणि अंमलबजावणी आम्हांला करता येईल की नाही? सामाजिक व वैयक्तिक जीवनाचा जो अभूतपूर्व आदर्श त्यांनी जगापुढे ठेवला. त्याचा वारसा घेऊनच आम्ही जीवन व्यतीत करणार की नाही? असे अनेकविध प्रश्न, यक्ष-प्रश्न आमच्यापुढे उभे राहिले. समाज मन संभ्रमित झाले. आमच्या हित शत्रूंनी डोळे टवकारले! काही अपमतलबी कयास बांधले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ म्हणजे एक खांबी तंबू, तो खांब संपाला कोसळला की तंबू संपलाय म्हणून समजा' अशा कल्पना उराशी बाळगून काही मंडळी होती ती आता जप धरून बसली.

बाबासाहेबांच्या नंतर आपणावर महान जबाबदाऱ्या येऊन पडल्या. एका युग पुरुषाने उभी केलेली कामे आपल्याला आपल्या कुवतीप्रमाणे पुरी करायची आहेत. काम अवघड आहे. जबाबदाऱ्या प्रचंड आहेत.

बाबासाहेबा नंतर आमच्या जवळ महापुरुष नाहीत. एक महापुरुष गेल्यानंतर त्यांचे काम पुढे चालविण्यासाठी दुसरा महापुरुष पाठोपाठ लगेच जन्मल्याचा दाखविला मानवी इतिहासात नाही. बाबासाहेबांच्या नंतर त्यांच्यासारखा नेता आमच्यात निर्माण होणे शक्य नाही. बाबासाहेबांनी जीवनातील साऱ्या मूलभूत गोष्टीनाच हात घातला त्यांनी जे जे सांगितले ते सारे मूलगामी! त्यात कोणी भर घालू शकणार नाही. त्यांनी दिलेले तत्त्वज्ञान मग ते जीवनविषयक असो, राजकीय असो, धार्मिक वा सामाजिक असो, हेच आमचे जीवन ध्येय राहिल. बाबासाहेबांच्या ठिकाणी तेच आमचे मार्गदर्शक राहील. त्यांची शिकवण हीच आमच्यापुढे दीपस्तंभ म्हणून अढळपणे तेवत राहील. आमच्या चळवळीच्या तंबूचा मध्यवर्ती खांब म्हणून त्यांची शिकवणच उभी ठाकणार आहे.

यापुढील आमच्या सर्व कामाची कसोटी बाबासाहेबांनी सांगितलेल्या तत्वज्ञानाच्या निकषावर घासूनच ठरेल. या कसोटीला ज्या गोष्टीं उतरणार नाहीत त्या आमच्या नव्हेत, त्यांना आमची जनता थारा देणार नाही

या दृष्टीने पहाता आपल्या जबाबदाऱ्यांची कल्पना सर्वांना येईल. या बाबतीत बाबासाहेबांचे उद्‌गार आपण लक्षात ठेवले पाहिजेत. बाबासाहेब म्हणाले होते. 'मी हा जो समाज-रथ पुढे ओढीत आणला आहे. तो कोणास पुढे ओढता आला तर ठीकच; पण तो कोणत्याही परिस्थितीत मागे जाऊ देऊ नका.'

समाजाचा हा रथ बाबासाहेबांनी चळवळ सुरू करण्यापूर्वी 'रथ' तरी होता काय? नाही, तो संपूर्णपणे विस्कळीत होता. तो एक संघ होऊ नये अशी व्यवस्थाच या देशात केलेली होती या देशातील हिंदूधर्माने तर धर्मग्रंथातच 'ग्यानबाची मेख, मारुन, ठेवली होती. जनसमूहाच्या एका भागाला अखंडपणे गुलाम व विस्कळीत ठेवण्याचे तत्त्वज्ञान आपल्या धर्मग्रंथातून सांगणारा धर्म जगाच्या पाठीवर हिंदूधर्मा-व्यतिरिक्त सापडणार नाही. दलितांच्या वस्त्या अलग, गावाच्या बाहेर, त्यांच्या उदार निर्वाहाचे साधन सर्वांची गुलामगिरी, त्यांच्यावर घातलेली बंधने धर्मग्रंथांनी चिरंतन केलेली, त्यांचे जीवन रूढीच्या अजस्त्र साखळ्यांनी बांधलेले; त्यांची वस्ती विखरून ठेवलेली, गावोगावी पसरवलेली, ते कोठेही बहुसंख्य होणार नाहीत असा डाव रचलेला. असा विस्कळीत आणि जखडबंद केलेला समाज (Community) या संस्थेला लायक करण्याचे काम देखील बाबासाहेबांना करावे लागले. म्हणजे हा 'समाज रथच' मुळी त्यांनी प्रथम उभा केला.

संघटनेची 'साटी' या रथाला त्यांनी दिली; चळवळींची चाके उभी केली. नीतीचे, शीलाचे, शांतीचे वंगन सतत या चाकात ओतले. आपल्या कर्तबगारीचे दोर लावले. आपल्यातील सर्व शक्तिनिशी त्यांनी तो ओढला संसदीय लोकशाहीचा निळा झेंडा व भगवानबुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा पंचशिलेचा झेंडा या रथावर त्यांनी फडकविला. नुसता रथच नव्हे तर त्याला ज्यावरून न्यावयाचे तो राजमार्गही त्यांनी तयार केला. संसदीय लोकशाही व बौद्ध-तत्त्वज्ञान यांनीच तो राजमार्ग बनलेला आहे. मानवाच्या संपूर्ण मुक्तिच्या ध्येयस्थळापर्यन्त हा रथ न्यावयाचा आहे. या रस्त्यावर आडव्या येणाऱ्या सर्व विचित्र शक्तींचा मुकाबला त्यांनी सारसर्वस्वाने केला. त्यासाठी त्यांच्या धारदार वक्तृत्वाची तलवार, ज्ञानाची भीमगदा, चारित्र्याची ढाल या सर्व आयुधांचा त्यांनी मनमुक्तपणे उपयोग केला.

असा हा समाज रथ असा या राजमार्गावरून संभाव्य धोके टाळीत नेण्याचा प्रयत्न करायचा आहे. तो जर आपल्याला पुढे नेता आला नाही तर कमीत कमी तो मागे तरी जाऊ देता कामानये. बाबासाहेबांची ही इच्छा आज्ञावत आनून आपण हे काम प्राणपणाने केले पाहिजे.

आजची समस्या

हे काम साधे नाही. आम्ही मागे एकदा म्हटल्याप्रमाणे मोठी कामे व छोटी माणसे ही एक आजची आमची समस्या आहे. आम्ही मागे राहिलेले सारे लोक फार छाटे आहोत. त्या आम्ही आमच्या आलेल्या जबाबदाऱ्यांचे परीशीलन केले पाहिजे, याचा विचार करून, बाबासाहेबांनी सांगितलेल्या ध्येयसिद्धीसाठी त्यांनी पुरविलेल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मार्ग आक्रमिला पाहिजे!

सपादक मंडळ
बी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
सहसंपादक
एम्. ए. आंबेडकर

कार्यकारी संपादक
दा. ता. रूपवते

**

५

बाबासाहेबांचा दिल्ली येथील ग्रंथ संग्रह

दि. ३० ऑगस्ट १९५८

'ग्रंथ हे माझे मित्र आहेत म्हणून हा संग्रह देताना माझ्या जीवावर येते' हे सुप्रसिद्ध उद्‌गार परमपूज्य बाबासाहेबांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीला आपला राजगृह दादर येथील ग्रंथ संग्रह देताना काढले होते, ते प्रत्येकाच्या आठवणीत असतीलच.

बाबासाहेबांच्या जीवनातील दीड तपाचे निवासस्थान

बाबासाहेबांनी भारत सरकारचे मजुर मंत्रीपद स्वीकारल्यापासुन त्याचे शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजे जवळ जवळ दीड तप वास्तव्य दिल्लीला होते. जरी मुंबई, औरंगाबाद येथील त्यांनी स्थापन केलेल्या विद्यालयीन संस्थाना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या कार्याची देखरेख ठेवण्यासाठी ते बराच काळ दिल्ली बाहेर राहत तरी देखील या काळातील मुख्य निवासस्थान दिल्लीतच होते.

त्यांच्या विधात्यासंगी जीवला राजगृहातला हा मित्र परिवार (ग्रंथ संग्रह) सोडून दिल्लीला बरे कसे वाटावे ? तेथे हि त्यांनी आपल्या वेगळा ग्रंथ संग्रह केला त्यात राजनिती, धर्म अर्थशास्त्र, इतिहास, इत्याजि वेगवेगळ्या शाखांचे हजारो ग्रंथ आहेत. बाबासाहेबांची ग्रंथ निवड चोखंदळ होती, हे सांगणे नलगे या 'मित्रा' बाबतची त्याची निवड अचुक होती, हे मात्र आभिमानाने आणि निश्चितपणे सांगता येईल.

अरेरे! बाबासाहेबांचे 'मित्र' उघडे पडले

आता हा दिल्लीचा बाबासाहेबाचा ग्रंथ संग्रह त्याचा पोशीदा गेल्यामुळे पोरका झाला असुन सरकारतर्फे तो विक्रीला काढला असल्याचे बातमी आली आहे जे ग्रंथ बाबासाहेबांच्या कर-कमलानी उघडे असतीलच, ज्यातील शब्दभांडार आपल्या पवित्र नेत्रानी पाहून वाचले असेल, ज्या ग्रंथाचे लेखक कल्पनेत बाबा-साहेबासमोर उभें राहुन आपापल्या विचारांच्या कैफियती मांडत असतील ज्या ग्रंथावर स्वहस्ताने बाबासाहेबांनी महत्वपूर्ण वाटणारे उतारे रेखांकित केले असतील ज्या ग्रंथातील पानावर काही ठिकाणी स्वतःच्या अक्षरांत बाबासाहेबाची लहान सहान टीपणेही असतील असे ग्रंथ आज इतस्ततः आल्याचा प्रसंग आला आहे.

युग पुरूषांबाबत सरकारचे कर्तव्य

इतर पुढारलेल्या देशांत अशा विचारवंत, ज्ञानी युग पुरूषांचा ग्रंथ संग्रह असा बाजारात विक्रीसाठी निघाला नसता ह्या देशातील सरकारने तो ग्रंथ संग्रह त्याची कपाटे, त्यांचे अभ्यासन, त्यांच्या सान्निध्यातील पदार्थ-वस्तू तसेच वातावरण कायम राखून त्या युगपुरुषाचे योग्य स्मारक केले असते.

पण आमच्या या देशातील तऱ्हाच वेगळी आहे. येथील सरकार-कॉंग्रेस पुढारी म्हणजे राष्ट्रीय पुढारी अशा मापाने व्यक्तिमत्व मोजणे याची काही ठळक उदाहरणे आहेत स्वर्गवासी रफी अहमद किडवाई याचे जन्म गावी स्मारक उभा-रण्यात आले तशी आणखीही उदाहरणे दिली तर हा पूर्ण पेपरही पुरणार नाही

महान राष्ट्रीय स्मारक करा

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ज्यांचा गौरव होतो त्याचे एक राष्ट्रीय स्मारक भारताच्या राजधानीत झालेच पाहिजे अलिपूर रोड-वरील बाबासाहेबांचे निवासस्थान, हे ग्रंथालय आणि त्यांच्या संपर्कातील महत्त्वाच्या वस्तुरहित बाबासाहेबांच्या जीवनातील ठळक घटना दर्शविणारा एकतबता येथे ठेवण्यात यावा. दिल्लीला येणाऱ्या देशी-परदेशी पाहुण्यात त्यची माहिती देण्या-साठी 'गाईड' ठेवण्यात यावे.

भावी पिढीसाठी आदर्श जीवन

असे स्मारक शतकानुशतके सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी कोणतीही

एक व्यक्ती अथवा खाजगी संस्था योग्यरीतीने पार पाडू शकत नसते. त्यामुळे इंग्लंडादि देशात अशी प्रसिद्ध पुरुषांची स्मारके निर्माण करताना त्यांच्या वारसांना योग्य मोबदला देऊन सरकार संबंधित वस्तु आणि वास्तु आपल्याकडे घेते तसेच जर सरकारने बाबासाहेब स्मारक बाबतीत केले तर या देशातील भावी पिढीला या डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचा उच्चत्तम आदर्श सतत ठेवता येईल.

स्मारक समित्यांना काही ठळक सूचना

बाबासाहेबाचे स्मारक व्हावे यासाठी अनेक समित्या देशभर कार्य करीत आहेत. त्यातली एक प्रमुख समिती मुंबईतील राज्यपाल श्री प्रकाश यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झालेली सर्वांना माहित आहे. या आणि इतर स्मारक समित्यांनी बाबासाहेबांच्या संपर्कातील प्रमुख वस्तु एकत्र करण्याच्या मार्गावर लागावे अशी सूचना करावीशी वाटते.

ग्रंथ, भाषणे, लेख, वस्तु व वास्तु संग्रह करा

शिवाय वेगवेळ्या स्मारक समित्यांनी आपल्या कामाची विभागणी करून घेतली तर चांगले होईल. बाबासाहेबांनी लिहिलेले लेख, पुस्तिका, ग्रंथ, याचे पुनर्मुद्रण करून भारताच्या विविध भाषात–भाषांतरे करून स्वस्त किंमतीत देण्याचे कार्य कोणातरी एका स्मारक समितीने करावे. बाबासाहेबांच्या भाषणाचा संग्रह करून ती प्रसिद्ध करण्याचे कार्य दुसऱ्या स्मारक मंडळाने करावे. बाबासाहेबांच्या जीवनावर लिहिलेले लेख, पुस्तके, ग्रंथ, कविता इत्यादि संकलीत करून त्यांचा संग्रह प्रकाशित करण्याचे काम एखाद्या स्मारक संस्थेने आपल्याकडे घ्यावे. बाबासाहेबाची छायाचित्रे, चित्रे, पुतळे इत्यादिंचा संग्रह करण्याची जबाबदारी चौथ्या समितीने आपल्या शीरावर घ्यावी. बाबासाहेबांनी लिहिलेली खाजगी पत्रे, त्यांच्या हस्ताक्षरातील टीपणे इत्यादिचा संग्रह करण्याची कामगिरी एखाद्या संस्थेने आपल्याकडे घ्यावी.

जाईल ही उदासीनता, उगवेल तो सुदिन

अशा रीतीने कामाची वाटणी झाली तरच बाबासाहेबाच्या जीवनावरील उपलब्ध सामग्रीचा उपयोग भावी पिढीला करून घेता येईल कालांतराने अशा वस्तु नाहीशा होतात आणि मग युगपुरुषाच्या चारित्रांतला दुवा आढळत नसतो. भावी पिढ्यांच्या हाती ही अमोल देणगी ची कामगिरी किती महत्त्वाची आहे हे आज अनेकांना पटणार नाही पण एक दिवस असा उजाडेल की त्या दिवशी या देशात प्रातःस्मरणीय भगवान आंबेडकराचे स्मरण प्रत्येकाला होईल त्यांच्या विचाराचे

मनन होईल.

"नद्या, पर्वत, धरणे, वृक्ष, यामुळे देशाची ओळख पटत नसते. देशाची महानता त्यातील सुज्ञ महापुरूषांच्या विचारावरून ठरविली जाते" अशा अर्थाच्या एकापाळी सुभाषिताची या प्रसंगी आठवण होते.

३० ऑगस्ट १९५८

**

६

बाबासाहेबांच्या स्मृतीस अभिवादन

(दिनांक ६ डिसेंबर १९५८ – बौद्ध वर्ष २५०२)

आज प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा द्वितीय स्मृतिदिन आज आम्ही 'प्रबुद्ध भारता'च्या तर्फे त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहून भागणार नाही. त्यांच्या अंतिम ध्येयांची सिद्धी साधण्याचा प्राणपणाने कार्य करूनच मार्ग आक्रमणायचा आहे. त्यांनी आपणा सर्वांना एकीचा आणि अभेद्य आणि संघटनेचा दिलेला आदेश कृतीने पार पाडायचा आहे. शुल्लक तकलूपी फायद्याला न भाळता गजगतीने पुढे जा. हे डॉ. बाबासाहेब यांचे शब्द अजुनहि आमच्या कानात घुमत आहेत. दुबळे मन, स्वाभिमान शून्य वृत्ती यांची संगत धरू नका; आपल्या दृढ निश्चयाला कळकळीच्या कार्याचे अष्टपैलू पाडा त्यामुळे आपले कार्य प्रकाशित होईल, सर्वांना अंधारातून मार्ग करणारे ठरेल अशीच उज्ज्वल कामगिरी बजाविण्याचा संकल्प करणे हाच आमचा त्यांच्या पवित्र स्मृतिदिनाचा सर्वांना संदेश आहे.

महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक कार्याचे कार्यक्षेत्र एकाच वेळी सुरू होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढविला, अस्पृश्योद्धाराचा डांगोरा पिटला. पण आपल्या प. पू. बाबासाहेबांनी त्याचवेळी भारतातील खऱ्या गांजलेल्या अशा पददलित बांधवांना खरा स्वातंत्र्याचा मार्ग दाखवून दिला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात अप्रत्यक्षपणे हातभार लावून ते तेथेच थांबले नाही, त्यांनी भारताची राज्यघटना बनविली आणि भारताच्या सुपुत्रांच्या यादीत त्यांचे नाव अजरामर होऊन राहिले. त्याच्याच पावलावर पाऊल टाकून आपणही भारताच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्यात हातभार लावून आपल्या व इतराचा सर्वांगीण उन्नतीचा मार्ग आक्रमण्याचा

प्रयत्न केला पाहिजे. डॉ बाबासाहेबांच्या ध्येयनिष्ठेचा प्रचार करणाऱ्या 'प्रबुद्ध भारता'ची वाटचाल त्यांच्या शुभ आशीर्वादाने झपाटयाने चालू आहे.

त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून त्यांच्या अपुऱ्या कार्याला पूर्तता आणण्याचा प्रयत्न आपणा सर्वांच्या सहकार्याने आम्ही करीत आहोत. योग्य ते मार्गदर्शन करून असहाय्य बांधवांना धैर्याने मदत करणे, आम्ही आमचे पवित्र तसेच आद्य कर्तव्य समजतो. 'वर्तमान पत्र' हे एखाद्या पक्षाचे, समाजाचे, राष्ट्राचे प्रभावी शस्त्र असते. आपले ध्येय साध्य करण्याचे मार्गदर्शन तेच करू शकते. आपल्या शंकाकुशंकांना वाव न देता वर्तमान पत्राने होणारे मार्गदर्शन जनतेला नेहमीच हिताचे असते आणि डॉ. बाबासाहेबांनी याच हेतूने आपल्या 'प्रबुद्ध भारता'ला जन्म दिला आणि जनहितासाठी सदैव झटण्याचा आदेश दिला आहे तो पूर्ण करण्याचा आमचा संकल्पच नव्हे तर तेच एक मोठे कर्तव्यकर्म आहे असे आम्ही समजतो. सर्वसाधारण वर्तमान पत्राच्या कार्याची जाणीव करून देताना महाराष्ट्राचे एक कर्तृत्वान वृत्तपत्र पंडित श्री. ज. स. करंदीकर यांनी वर्तमान पत्रकारांना पावसाची उपमा दिली आहे. ते म्हणतात की, 'पावसाचे कार्य जसे दुहेरी असते तसेच आपणा वृत्तपत्रकाराचे कार्यही दुहेरी आहे. पावसाचे सद्यफल म्हणजे उन्हामुळे होणारा ताप शांत करणे, रस्त्यावरील, घरातील, झाडाझुडपावरून धरोळपार घालवून टाकून त्यांना स्वच्छ व टवटवीत करणे आणि आरोग्याला पोषक अशी घाण पार वाहून नेऊन नाहीशी करणे हे कार्य तर पावसाने केलेच पाहिजे. परंतु एवढेच कार्य करून उपयोगी नाही, पावसाचे खरे चिरकालदायी कार्य म्हणजे भूमीच्या पोटात पाणी पुरवून त्याचा उपयोग वर्षभर जनतेला होईल असे करणे होय. आम्हा वृत्तपत्रकारांनीही अशीच लोकोपयोगी कामगिरी करावयाची असते.

आजकाल वृत्तपत्रांना राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सर्वच ठिकाणी अग्रस्थान प्राप्त झालेले आहे. जेथे कोठे तत्कालीन जुलूम, दडपशाही, अन्याय, उत्क्रांत इत्यादी घटना घडतील त्याची समाजाला जाणीव प्रसिद्धी करण्याचे महत्त्वाचे कार्य करावयाचे असते. इतकेच नव्हे अशावेळी जनतेने कोणता मार्ग स्वीकारावा, कोणते धोरण अमलात आणावे याचेही योग्य असे मार्गदर्शन करायचे असते. आमचा 'प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र प. पू. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने प्रसिद्ध होत आहे. त्यांनी आपणाला दिलेला दिव्य उपदेश आम्हाला जनतेपुढे ठेवावयाचा आहे त्यांच्या ध्येयमार्गाने सर्वांना मार्गदर्शन करणे हे या वृत्तपत्राचे अधिकृत कार्य आहे. आज आपल्या परम-पूज्य पुढाऱ्यांच्या पवित्र स्मृतीत अभि-

वादन करून त्याच्या कार्याची धूरा आम्ही आपणा सर्वांच्या सहकार्याने स्वीकारीत आहोत.

—मुकुंदराव आ. आंबेडकर

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड

चेअरमन

आर. डी. भंडारे

बी. सी. कांबळे

घनःशाम तळवटकर

**



७

"दिक्षा मैदानाचा लढा"

(दि. १० जानेवारी १९५९)

ता. १४–१०–५६ रोजी ज्या मैदानावर नागपूर येथे प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो अनुयायांना बौद्धधर्माची दीक्षा दिली आणि भारतामध्ये २५०० वर्षांनंतर धर्मचक्र परिवर्तन घडवून आणले त्या पवित्र तसेच ऐतिहासिक जागेचा चिरकाल स्मारकासाठी उपयोग व्हावा अशी आमची इच्छा आहे. त्या जागेचे पावित्र्य, महत्व आणि कर्तव्यनिष्ठे संबंधाची जागृती इ. भावनांनी महत्त्व आलेले आहे. त्यासंबंधी एखादे स्मृती स्मारक त्या मैदानावर व्हावे अशी सदिच्छा प्रत्येक बौद्ध बंधु-भगिनींना वाटणे आवश्यक आहे.

मुंबईच्या मुख्यमंत्र्यांशी मुलाखत

या जागेसंबंधी स्मारक कमिटीने मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची भेट घेऊन, सार्वजनिकरित्या जागेच्या व स्मारकाच्या योजनेचा प्रश्न त्यांना समजावून सांगण्यात आला. या मैदानाच्या जागेच्या आवश्यकतेची खात्रीही पटवून दिली. परंतु आमचे लोकांचे, जनतेचे म्हणविणारे सरकार अशा न्याय्य व सनदशीर मागणीला कधीतरी 'होय' म्हणेल का? आडवळणे, अडचणी आणि आडमार्ग याचाच अवलंब करून काही तरी विरोधी भूमिका पुढे करायची. स्पष्ट नकार न देता अन्य मार्गानेच वाटण्याच्या अशा देण्याचा जाणून बूजून प्रयत्न करायचा. या शिवाय आपले सरकार दुसरी कसली सौजन्याची गोष्ट करील का ?

भारतीय बौद्ध महासभेने नेमलेल्या स्मारक कमिटीने अर्ज, विनंत्या रीतसर अनेक प्रयत्न केले आहेत. त्यात हमखास यश मिळेलच याची खात्री वाटत

नाही. अशा प्रसंगी आपणाला या बाबतीत उठाव किंवा आपला हक्काचा 'आवाज' उठवल्याशिवाय गत्यंतर नाही म्हणून कमिटीने नागपूर येथे भरविलेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी पं. जवाहरलाल नेहरू यांच्यापुढे प्रचंड मोर्चा काढून निदर्शने करायचा निर्णय घेतला आणि तसा आदेश स्मारक कमिटीने जनतेला दिला आहे. प्रत्येक स्वाभिमानी बौद्ध बंधु व भगिनींना या लढ्यात जातीने भाग घेण्यास तयारी दाखवून आपली न्याय्य मागणी भारताच्या पंतप्रधानांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करील. आमची खात्री आहे की, या निदर्शनाच्या कार्याने बौद्ध जनाच्या भावना, आकांक्षा, संघशक्ति नि कर्तबगारी पं. नेहरू आदि काँग्रेस सरकारवादी पुढाऱ्यांच्या दृष्टीस पडल्याशिवाय राहणार नाही.

स्मारकाचे ऐतिहासिक स्वरूप

काँग्रेस श्रेष्ठी नेहमी मोठ्या अभिमानाने आणि तितक्याच आढ्यतेने म्हणत असतात की, आम्ही सनदशीर विचारसरणीचे आणि लढ्याचे भोक्ते आहोत. पण ही त्याची मानभावीपणाची घोषणा किती फोल आणि आपमतलबी आहे याची खात्री आपणास वेळोवेळी येतेच. या दीक्षा मैदानाच्या सनदशीर मागणीच्या बाबतीत तोच कटू अनुभव यावा ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे. भारताच्या राज्यघटनेचे ते आद्य शिल्पकार आणि महान राष्ट्रीय पुरुषांत त्यांची गणना होते. अशा विभूतींच्या ऐतिहासिक स्वरुपाच्या कार्यासाठी नागपूरच्या दीक्षा मैदानाची मागणी केली आहे. त्याला मुंबई सरकारने अनुदारवृत्ती स्वीकारावी ही राष्ट्रीय सरकारच्या दृष्टीने अनुचित घटना होय.

भारत सरकारने आजपर्यंतच्या स्वतःच्या अधिकारात कित्येक राष्ट्रीय पुरुषाच्या स्मारका संबंधी स्वतंत्रपणे निर्णय घेतले व स्मारकाने सरकारी तिजोरीतील पैशाने हातभार लावलेला आहे हया सर्व सरकारी धोरणाचा विचार केला असता, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान राष्ट्रीय पुरुषाच्या स्मारकाच्या दृष्टीने आम्ही आमच्या हिमतीने नागपूरच्या ही धर्म दीक्षेची पवित्र अशी चौदा एकराची जागा मागतो, हया बाबत सरकारने वेदरकारवृत्तीने वागावे ही नवलाची गोष्ट नाही का? या पवित्र स्मारकासाठी जगातील बौद्धधर्मीय राष्ट्रांचा सक्रिय पाठिंबा असल्याचीही सरकारला खात्री पटवून दिली आहे आणि या बाबतीत भारत सरकारकडे विनंती अर्ज केले; पण मोठ्या खेदाची गोष्ट आहे की, आम्हाला सरकारकडून कोणत्याही प्रकारचे आश्वासन मिळालेले नाही.

दार ठोठावल्याशिवाय उघडत नाही

नागपूरचे दीक्षा मैदान बौद्ध धर्मीयांचे आशास्थान आहे. ती पवित्र तशीच

पुण्यभूमी आहे. ती चीरकाल स्मारकासाठी मिळावी, हीच आमची न्याय्य व सनदशीर मागणी आहे. तारीख १४–१०–१९५६ रोजी प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतामध्ये जे ऐतिहासिक महत्वाचे धर्मचक्र परिवर्तन घडून आले, त्याचे स्मारक होणे हे सर्व दृष्टीने विचार करता आवश्यक अशी घटना आहे. आमच्या जीवाभावाचा तसाच कर्तव्य परायणतेचा प्रश्न आहे. ही भूमी म्हणजे आमचा मानबिंदू आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करूनच आम्हांस मुंबई सरकारच्या अडेल तट्टू धोरणावर प्रकाश पाडण्यासाठीच ही निदर्शने करणे भाग आहे काँग्रेस नेत्यांसमोरची निदर्शने ही आमच्या भावी लढ्याची पहिली पायरी आहे.

भारताच्या पंतप्रधानांनी या विनंतीकडे जाणून बुजून कानाडोळा केला तर आम्ही हा लढा तीव्र स्वरूपात लढविण्याचा संकल्प केलेला आहे. लोकशाहीच्या राज्यात आमच्या न्याय्य मागणीच्या लढ्याचा प्रश्न हाताळणे हा आमचा नैतिक स्वरूपाचा हक्क आहे. लोकशाहीच्या तत्त्वांची जोपासना करणाऱ्या सरकारने या गोष्टींची वेगळीच दखल घ्यावी व आमच्या या मागणीचा सहानुभूतीने तसेच सनदशीररित्या विचार करून मान्यता द्यावी हेच उचित ठरेल. या ऐतिहासिक स्मारकाच्या बाबतीत बौद्ध जनता जागृत झाली आहे. ती आपल्या प्रभावी व संघटित शक्तिचा उपयोग शांततेच्या मार्गाने केल्याशिवाय राहाणार नाही. 'दार ठोठावल्याशिवाय उघडले जात नाही' आणि त्याच तत्त्वानुसार आम्ही आमचा दीक्षा मैदानाचा लढा लढविण्याचे ठरविले आहे.

विशाल वृक्षाची छाया

अखिल भारतीय बौद्ध महासभा हा प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली एक संघटित संस्था आहे. बोधिवृक्षाच्या विशाल नी शांत छायेत या संस्थेच्या कार्याची रूपरेखा आखली गेली आहे. त्या संस्थेला नागपूरची दीक्षा मैदानाची जागा खरी कर्मभूमी वाटली त्यात अतिशयोक्ति नाही. दीक्षा मैदानासंबंधीचा लढा जर सारासार विचारसरणीने तसेच सनदशीर मार्गाने यशस्वी झाला नाही तर कार्यात यश येईपर्यंत चळवळ करणे, लढा लढविणे हे प्रत्येक बौद्ध धर्मीय बंधु भगिनीचे कर्तव्य कर्म आहे. बौद्ध महासभेचा विशाल वृक्ष वाढीला लागलेला आहे, त्याची छाया शांती व कर्तव्य-कर्माचा मार्ग दर्शविणारी आहे. तिला जागृत असणारी बौद्ध धर्मीय जनता आपला स्वाभिमानाचा लढा यशस्वी केल्या शिवाय राहाणार नाही. नागपूर येथे या निमित्ताने एक प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती स्थापन झालेली आहे. तिच्या आदेशानुसार 'दीक्षा मैदानाचा लढा लढविण्याचे ठरविले आहे या लढ्याचे धोरण किंवा

प्रत्यक्ष कार्य कोणत्या स्वरूपाचे होईल ते आजच सांगता येणार नाही. भारत सरकारने आमच्या स्मारकाच्या प्रश्नाकडे न्याय्य दृष्टीने पाहून मुंबई राज्य सरकारला योग्य आणि वेळीच मार्गदर्शन करावे. विशाल वृक्षाच्या छायेत स्थापन झालेल्या बौद्ध महासभेचे कार्य नेहमी कर्तव्य निष्ठेने चालणारे आहे याची जाणीव भारत व मुंबई सरकारने वेळीच घ्यावी.

लोकशाही तत्त्वाने लढा लढवा

होच लोकशाही तत्त्वावर स्थापन झालेल्या भारत सरकारची शिकवण हृदयाशी बाळगून आम्ही नागपूर दीक्षा मैदानाच्या लढ्याची रूपरेखा आखली आहे. खरे पाहिले असता ही मोकळी जागा सरकारने उपयोगात आणावयाची ठरवलेली असली तरी अग्रमान आमचा आहे. लोकशाहीच्या तत्त्वाचे पालन करणे हेच आता आमच्या सरकारचे कर्तव्य आहे. आमच्या अल्पमतीप्रमाणे त्या बद्दल जाणीव करून देणे आमचे कर्तव्य कर्म आम्ही समजतो. काँग्रेस सरकारने बौद्ध जनांच्या स्वाभिमानाला धक्का लावून निष्कारण असंतोष पसरविणाऱ्या हट्टाग्रहास बळी पडू नये हीच विनंती.

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
घनश्याम तळवटकर

मुकुंदराव आ आंबेडकर
१५ जाने. १९५९

**

८

बौद्ध धर्म प्रसाराची वाटचाल

(दिनांक २१ फेब्रुवारी १९५९)

आज जग एका महान संक्रमणातून जात आहे. नवीन विचारसरणी सर्वत्र संचार करीत असून, लोकशाहीच्या प्रणालीची ते झपाटयाने वाटचाल करीत आहे. पाश्चिमात्य राष्ट्रे व रशियादि आशिया खंडातील राष्ट्रे आपापल्या परीने उत्क्रांतीचा मार्ग आक्रमण करून जगात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सर्व जागतिक घटनांचा सारासार विचार केला तर आपल्या भारत देशाच्या प्रगतीची, उत्कर्षाची वाटचाल जितक्या झपाटयाने व्हावयास पाहिजे तितकी होत नाही असे खेदाने म्हणावे लागते. नवीन जगातील सुधारणांच्या अवलोकनाने आपण प्रगतीच्या दृष्टीने थोडीफार वाटचाल करीत आहोत. प्रत्यक्ष कृतीपेक्षा आपले पुढारी सुधारणांच्या शाब्दिक लंब्याचवड्या गप्पा मारण्यात मात्र पटाईत आहेत.

प्राचीन बुद्धाचा काल

भारत एकेकाळी सर्वांगीण उन्नतीच्या आणि उत्कर्षाच्या शिखरास पोहचला होता. हा प्राचीन इतिहास वेळीअवेळी घोकण्या पलीकडे आपली प्रत्यक्ष प्रगती मंदगतीने होत आहे. २५०० वर्षापूर्वी भगवान बुद्धाच्या काळात भारत देश जगातील सर्व राष्ट्रांत अग्रमान असा देश मानला जात होता. त्या भगवान बुद्धाच्या तत्त्वप्रणालीमध्ये मानव धर्माचे खरे उद्दिष्ट होते. विषमतेचे विषारी वारे त्या काळी बहूजनांच्या अंगात विशेष करून शिरत नव्हते. बुद्धकालीन समाजरचना आणि आजच्या परिस्थितीत, मनुष्याच्या विचारसरणीत जमीन अस्मानाचे अंतर असलेले दिसून येईल. बुद्धकाळात समाजात खरी समता, स्वातंत्र्य, सौख्य

मनुष्यमात्राला मिळत होते. तसेच जीवन विकासाकडे पाहण्याचा दृष्टीकोण व्यापक स्वरूपाचा होता. व्यापक विश्वबंधूत्वाची भावनाच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीचा समावेश त्यात होता. त्या वैभवशाली काळाचे स्मरण करीतच आपण आजपर्यंत आपले जीवन जगवित होतो पण त्या काळाच्या स्मृतीभ्रमातूनच खरा मुक्तीचा मार्ग दाखविणारा महापुरुष याच भारत देशात निर्माण झाला. तोपर्यंत आपण ब्राम्हणी समाजाच्या आहारी जाऊन, परमेश्वर निर्विकार आहे, त्याच्या लीला अगाध आहेत, मनुष्याला तपश्चर्येच्या बळावर आपल्या अंगी देवपण निर्माण करण्याची अचाट शक्ती प्राप्त करून घेता येते, वगैरे कल्पनांमध्ये आपण भ्रमण करीत होतो. तो भ्रम, त्या भ्रमाचे बेढीच निरसन करण्याचे बहुमोल कार्य आपले परमपूज्य नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'धर्मचक्र परिवर्तनाने' घडवून आणले.

जगात अनेक क्रांत्या घडून आल्या. पण एका पददलित समाजात जन्म घेऊन जगाला दिपवून टाकणारी घटना घडविणारा नेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच अग्रमान्य क्रांतीपुरुष ठरले यात शंका नाही. त्यांनी आपणास क्रांतीचा, मानवतावादी धर्माचा मार्ग दाखविला आहे सुदैवाने डॉ बाबासाहेब आज आपणामध्ये नाहीत. त्यांनी दिलेल्या नवजीवनाचा महामंत्रच आपल्या अंतःकरणात आहे. त्याची आपण जीवापलीकडे जोपासना करून त्यांच्या अपुऱ्या कार्याची तळमळीने पूर्तता करण्याचा कसून प्रयत्न करणे हाच खरा ध्येयशील मार्ग आहे. आपल्या समाजात विचारवंत पुढारी आहेत. त्यांनी याच ध्येयानुसार आपल्या कार्याची दिशा दाखविण्याचा निश्चय निर्भयपणे करावयास पाहिजे. आजपर्यंत आपण हिंदू धर्माच्या ओंजळीने पाणी पित होतो. त्यांच्या चातुर्वर्णाच्या चौकटीतच आपण अडकून पडलो होतो. त्या चौकटीतच आपल्या समाजाचा दर्जा हीन मानला जात होता. जन्माने मनुष्य असूनही उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या हिंदूच्या पायदळी खिचपत पडलो होतो. त्या असहाय्य अवस्थेतून आपणास मुक्त करण्याचे कार्य ज्या महापुरुषाने केले आहे, त्याचा आदेश शिरसावंद्य मानून सर्व अडी-अडचणीतून आपले ध्येय गाठण्याचे बौद्धधर्माची पताका विजयश्रीने सतत फडकविण्याचे महान कर्तव्यकर्म बजाविण्यातच खरी ध्येयसिद्धी आहे, ही गोष्ट दृष्टीआड करून चालता येणार नाही.

'मतभेद' हे कोणत्याही ध्येयशील कार्याच्या परीक्षेचे टप्पे आहेत. मतभेद हे अडथळे असतात. एखाद्या महान कार्याचा मार्ग आक्रमण करणे काही साधीसुधी गोष्ट नसते. गुलाब पुष्पाच्या पाकळ्यांची पसरलेल्या रस्त्याने ऐषारामात कोणीही जाऊ शकेल. परंतु काटचाकुटचातून आपल्या उज्ज्वल ध्येयाकडे जाण्याची, ते गाठ-

ण्याची मनीषा मनी बाळगून त्या खडतर मार्गाने जाण्यातच खरा पुरुषार्थ आहे. तेच आणि असला खडतर मार्गच आक्रमण करण्यात आपल्या प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली सारी हयात घालविली आहे.

परिस्थिती नी ध्येयनिष्ठा

खऱ्या बिकट परिस्थितीतून आपण बाहेर पडलो आहोत. या अग्निदिव्यातून आपली सुटका झाली आहे. आजच्या परिस्थितीत पुष्कळच आशावादी स्वरूपाचा बदल झाला आहे. अशा परिस्थितीत आपण आळशासारखे स्वस्थ न बसता, आपल्या बौद्ध धर्म प्रसाराच्या कार्याला जोरदार चालना दिली पाहिजे. यासाठी आपली बळकट संघटना अभेद्य ठेवणे हे पहिले कर्तव्य समजले पाहिजे. स्वार्थासाठी जीवन जगविण्याचा आपला धर्म नाही. ध्येयनिष्ठेने कार्य करणे, हाच आपला महामंत्र आहे, ही जाणीव लक्षात ठेवल्यावर, आपणास कोणत्याही परिस्थितीचा बागुलबुवा बाळगण्याचे कारण नाही. मानापमानाच्या आहारी जाणाऱ्या पुढाऱ्यांच्या आहारी न जाता आपणच आपले मार्गदर्शक बनले पाहिजे. जे सत्य आहे ते दीर्घकाल टिकणारे असते. आमच्या एका बाल कवीची यावेळी आठवण होते. अल्पायुष्यातच ते निधन पावले होते. पण त्यांनी मानवाला जो दिव्य संदेश दिला तो मात्र प्रखर होता यात शंका नाही. ते आपल्या संदेशात म्हणतात–

'सत्याची समशेर धरा ।
असत्य सारे पार चिरा' ॥

आणि आपण याच भावनेने आपल्या ध्येयनिष्ठ कार्याची धुरा हाती धरली पाहिजे. धर्म कार्याची गेली दोन वर्षे संपली, बौद्ध धर्म प्रसाराची प्रगती सारखी होत आहे. हिंदूधर्मीयांना त्याची धास्ती वाटू लागली आहे. त्यांना वाटत होते की, डॉ. आंबेडकर होते तोपर्यंत या अस्पृश्यांच्या गमजा चालत होत्या. त्यांच्यात नवचैतन्य आता कोण निर्माण करणार? त्यांनी उभारलेला डोलारा आता सहज कोसळून पडेल वगैरे!' पण ही त्यांची समजूत, कल्पना आज खोटी ठरली आहे. आपण आपल्या बौद्धधर्म पुनरूज्जीवनाचा मार्ग झपाट्याने आक्रमण करीत आहोत. ही अशावादी परिस्थिती पाहूनच आशिया खंडातील बौद्ध धर्मीय जनता आपल्याकडे आतुरतेने, आपुलकीने आणि आत्मविश्वासाने पहात आहेत. हीच जागतिक परिस्थिती आपणास अधिक उत्साह वाटण्यास कारणीभूत आहे.

बौद्ध धर्म प्रसाराचे प्रभावी कार्य

आपण अधिक प्रखर आणि प्रगतीमान करण्याचा संकल्प करावयास पाहिजे. संकल्प करून हे सर्व साधणार नाही, तर त्या संकल्पाची पूर्तता करण्या-साठी संघशक्तिनेच आपली बौद्ध धर्म प्रचाराची वाटचाल धैर्याने चालली पाहिजे. कोणत्याही कार्यात शिथिलता निर्माण न करता ते कार्य उमेदीने नि उत्साहाने करीत राहिल्यास त्यात यश प्राप्ती मिळाल्याशिवाय रहात नाही. आपण आपल्या प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतीस स्मरून, मतभेदाचे खडक फोडून आपला बौद्ध धर्म प्रसाराचा मार्ग प्रभावी करणे हेच आजच्या परिस्थितीत आपले आद्यकर्तव्य आहे.

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड
चेअरमन
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
घनःशाम तळवटकर

संपादक
बी. के. गायकवाड

**

९

नवसमाज रचना

शनिवार दि. ७ मार्च १९५९

खेड्यापाड्यातील बांधवांची दुःखी कहाणी आपणाला माहित आहे. आपण ती भोगलीही आहे आणि ऐकलीही आहे. आजही खेडोपाडी आपल्या बांधवावर सामाजिक अन्याय व जुलूम होतो. काही तरी कुरापत काढून सवर्ण हिंदू बौद्धांना व दलितांना छळतात. त्यांच्या जीवनाची मुस्कटदाबी करून, त्यांना संकटाच्या कोंडीत कोंडून टाकतात; त्यांना 'तोंड दाबून बुक्क्याचा मार' सहन करावा लागतो. असल्याही परिस्थितीत ते अन्यायाला धैर्याने तोंड देतात. त्याचे कारण आपल्या बांधवाच्या अंतःकरणात ओतप्रोत स्वाभीमान आहे. त्यांच्यात प्रबळ आशावाद आहे. उच्च धैर्याने प्रेरित झालेली नितांत श्रद्धा आहे; ते निष्ठावंत व विश्वासू असे शूर सैनिक आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संदेशाकडे त्यांचे कान आहेत. डॉ. बाबासाहेबांनी दाखविलेल्या ध्येय शिखराकडे त्यांची दृष्टी आहे. डॉ. बाबा-साहेबांच्या विचारावर त्यांची श्रद्धा व विश्वास आहे. त्यांना मनोभावे वाटते व पटते की, 'आपण गुलामगिरीतून – – – – – मुक्तीच्या मार्गाप्रत चालतो आहोत, माणूसकीच्या वाटेने वाटचाल करीत आहोत, भगवान बुद्धाच्या समता, बंधुता, शांतीच्या मंगलमय वातावरणात चाललो आहोत. तेथे आपल्याला प्रज्ञा, शील, करुणा, प्रेम अशी उदात्त तत्त्वे मिळतील. त्यानेच आपला जीवन संचार सुखाचा, प्रगतीचा व उत्कर्षाचा होईल.

याच उदात्त हेतूने व आशेने आपले बांधव खेडोपाडी अन्याय, जुलूम सहन करतात; व आपल्या शक्तीप्रमाणे अन्यायाला तोंड देतात. तरीपण त्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावरील श्रद्धा तसू भर देखील ढळली

नाही. ढळणार नाही कारण खेड्यातील समाजरचनेचे समाजघातकी खंड फोडण्याशिवाय गुलामगिरीतून मुक्ती मिळणार नाही. अशी परिस्थिती आहे.

आजची खेडी

आपल्या देशातील खेडी ही प्राचीन काळच्या रोमन साम्राज्यात असलेल्या ग्रामराज्याच्या (City States) धर्तीवर आहेत. गावातील कारभार, अर्थनियंत्रणा साम्राज्यशास्त्र, राजकारण हे स्वतंत्रपणे चालले असते. या बाबत एका खेड्याचा दुसऱ्या खेड्यापाशी कमी संबंध येतो. प्रत्येक खेडे एक स्वतंत्र घटक या दृष्टीने तेथील व्यवहार चालतात. त्यातच दळणवळणाची अपुरी सोय यामुळे तर भारतीय खेडीही स्वतंत्र ग्रामराज्य म्हणून त्यांचे अस्तित्व आहे.

रोमन साम्राज्याच्या काळात ग्रामराज्ये (City States) प्रत्येक शहराचा राज्यकारभारच तेथील नागरीकच प्रतिनिधी म्हणूनच करतात. खेड्यातील आर्थिक व सामाजिक प्रश्न तेच पाहतात. रोमन ग्रामराज्यात खेड्यातील समाजरचनेत दोन वर्ग होत, एक गुलामाचा व दुसरा धनिकांचा. सर्व हक्क व अधिकार धनी–मालक वर्गाला असत. गुलामी वर्ग, सेवा, चाकरी व कामाचा बोजा वहात असे. खेड्याच्या राज्यकारभारात व कसल्याच क्षेत्रात गुलामांना भाग घेता येत नव्हता व त्यांना तसा अधिकार नव्हता. या वरून पहाता रोमन साम्राज्यकालीन लोकशाही पद्धतीच्या ग्रामराज्यात जसे धनी व गुलाम वर्ग होते तसे आपल्या देशातील खेड्यातील अवस्था आहे. खेड्यातील दलित वर्ग, बलुते-आलुत्याचा वर्ग, राजकीय, आर्थिक, सामाजिक व इतर बाबतीत प्रत्यक्षात गुलामगिरीचे जीवन जगतो व वरिष्ठ सवर्ण वर्ग हा मालकाचे जीवन जगतो. या विशिष्ट परिस्थितीमुळे खेड्यातील खेडूतांची मने मानसिक गुलामगिरीत गुंतून पडली आहेत. त्यामुळे व्यक्तीचा विकास, समाजाची प्रगती याला खिळ बसलेली आहे.

खेड्यातील जातीय प्रचार

या देशातील वर्ग पद्धतीची समाजरचना नाही. ती जातीय पद्धतीवर आधारलेली आहे. जात व जातीय पद्धती ही सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवते. हा एकच आपला देश असा आहे की, या देशात असंख्य जाती, मित्र, संस्कृति, भीन्न आचार विचार आहेत. गुण किंवा कृति या ऐवजी जन्मावर जातीचे श्रेष्ठत्व अवलंबून आहे. जाती व पद्धतीमुळे कामाचो विभागणी न होता माणसा-माणसातच भेद पडले आहेत. म्हणजे प्रत्येक जातीचा

धंदा वेगळा झाला. जातीवरून धंदा व धंद्या वरून जात असा नवीन विचार रुढ झाला. जाती जातीचे लहान लहान असे खंबीर तटबंदी किल्ले निर्माण झाले. एकेक जात म्हणजे एक स्वतंत्र समाज घटक, दुसऱ्या जातीपासून सर्वस्वी वेगळा झाला. त्या जातीचे समाजधारणे संबंधी नियम, रूढी व आचार विचार हे विशिष्ट प्रकारचे ठरले. एका जातीच्या विचारांचे व संस्कृतीचे संकर (मिश्रण) दुसऱ्या जातीच्या विचारांशी होऊ शकले नाही. एका जातीची दुसऱ्या जातीबद्दल आपुलकी, बंधुभावनेची भावना, सहानुभूती नष्ट झाली. उच्च जातींनी परंपरेने अधिकार व हक्क गाजवावे आणि दुसऱ्या हीन कनिष्ठ जातींनी कायमचा कामाचा बोजा उचलावयाचा व सेवा, कर्तव्य करावयाचे हे कायम स्वरूप ठरलेले असे. आपल्या पायरीने वागले पाहिजे हे व्यवहार तत्व पक्के झाले. जात व जातीचा धंदा पक्का झाला; त्यामुळे जात बदलता येईना व धंदाही बदलता येईना.

खेड्यातील जातवार वस्तीची रचना

खेड्यात जातवार पद्धतीने जाती वस्तीची स्थापना केलेली आहे. शुद्र व अतिशुद्र (दलित वर्ग) यांची वस्ती खेड्याच्या पूर्वांगास प्रामुख्याने असते व ती बहुतेक गावी गावचे वेशीच्या किंवा गावाच्या तटाच्या बाहेर असते. गावाच्या ओढ्यावर किंवा नदीवर जे पाणवठे असतात ते देखील चातुर्वर्ण्य प्रणित श्रेष्ठ, कनिष्ठपणाच्या पातळीप्रमाणे असतात. उंच वर्गीयांचे पाणवठे वरचे अंगाला, तर दलित वर्गाचे पाणवठे खालच्या बाजूस असतात. उच्च वर्गीयांचे पाणवठ दलित वर्गाना ओलांडता येत नाहीत व पाणवठ्याची स्थळेही बदलता येत नाहीत. हा धर्म दंडकाप्रमाणे, रूढी प्रमाणे पाणवठे आहेत तेथेच जपले पाहिजे असा दंडक होऊन बसला आहे.

खेड्यातील या विशिष्ट अलग वस्ती रचनेमुळे खेड्यातील प्रत्येक जात स्वतंत्र अशा चौकटीत वागते व जगते. ही जातीय चौकट फोडून काढणे धर्म कायद्या प्रमाणे बंद असल्याने सर्व समाजा अधोगतीला चालला आहे.

खेड्यांतील अर्थशास्त्र

खेड्यातील अर्थशास्त्र हे करार पद्धतीचे नसून ते बलुता किंवा तत्त्वत: रूढीच्या पद्धतीवर आधारलेले आहे. खेड्यातील बलुता पद्धतीत वेतन किंवा पगार पद्धती नाही. पद्धतीच्या अर्थयंत्रणेत एक करावयाचे, व त्याचा मोबदला म्हणून त्याला सुगीच्या हंगामात धान्य द्यावयाचे किंवा काम झाल्यावर अन्न वाढावयाचे. काम करण्याचे नियम, कामाचे तास (वेळ) रजा, आजारीपणा, संप वगैरे

कोणतेहि व आधुनिक मजूर शास्त्रातील नियम बलुता पद्धतीला लागू पडत नाहीत. एका जातीने दुसऱ्या जातीची कामे करणे ही परंपरागत कायम स्वरूपी गोष्ट झाली आहे. त्याचा लोकांचे मनावर परिणाम होवून मनाची घडणही विशिष्ट होऊन बसते.

एका जातीचा धंदा दुसऱ्या जातीला करता येत नाही. त्यामुळे व्यक्तीला त्याचे इच्छेप्रमाणे धंदा करता न आल्याने त्याच्या उत्पादन शक्तिचा उपयोग होत नाही अर्थात उत्पादन शक्ति विनाकारण खर्च होते. आपल्या देशातील लोकसंख्येची वाढ व उत्पादनाची वाढ याचे प्रमाण व्यस्त आहे. लोकसंख्या झपाटचाने वाढत असतानाच बलुताशास्त्रा प्रमाणे व रूढीपद्धती प्रमाणे लोकानी खेडचात कामधंदा करावयाचा म्हटल्यास गरजेपुरते ठराविक लोकांनाच काम मिळते व बाकीच्या लोकानाच बेकारीत जमा व्हावे लागते.

खेडचांतील हो 'बलुता रूढी व्यवसाय तंत्रच' बेकारी वाढीला मूलतः कारणीभूत होत आहे.

तसेच खेडचातील आर्थिक यंत्रनामुळे लोकाची मानसिक गुलामगिरी अधिकच घट्ट होत जात आहे. असली विषमतेची आर्थिक यंत्रणा बंद करून त्याजागी माणसाच्या गुणाप्रमाणे व इच्छेप्रमाणे धंदा करण्याचे व मिळवण्याचे तत्व समाजात रूढ केले पाहिजे. म्हणजे वाया जाणारी उत्पादन शक्ति योग्य कारणी पडेल व तसेच व्यक्तिला त्याचे गुण व इच्छा प्रमाणे काम मिळाल्यास त्याचा विकास व प्रगती होईल. यासाठी खेडचातील जन्मावरून व जातीवरून धंदा व धंद्यावरून जात रूढीविचारसरणी नष्ट केली पाहिजे.

खेडचातील राजकारण शास्त्र

खेडचातील राजकारण त्या गावच्या ग्रामपचायतीमार्फत खेळले जाते. ग्रामपंचायत सभासदाचे हाती जी मिळवयाची ती सत्ता मिळते खेडचात जाती जातीचा भरणा असल्याने बहुसंख्य जातींचें प्रतिनिधी निवडून येतात व अल्पसंख्याक जातींचें प्रतिनिधी निवडणुकीत पराभूत होतात त्यामुळे ग्रामपंचायती राजकारणात खेडचातील मागास दलित वर्गाचे हाती ग्रामराज्याची सत्ता कधीच येणे शक्य नसते. त्यामुळे या पद्धतीने धनी धनीच होतो व गुलाम गुलामच राहतो.

या जातीय भावनेच्या राजकारणामुळे लोकशाही राजवटीची पवित्र तत्वे

खेड्यातील राजकारणात मूळ धरत नाहीत व खेड्यातील राजकीय वातावरण लोकशाहीस मारक ठरते.

खेड्यांचा धर्म

खेड्याचा हिंदू–धर्म चातुर्वर्ण्यावर आधारलेला असल्याने प्रत्येक ग्राम–वासियाचे रक्तांत चातुर्वर्ण्य मुरलेला आहे. माणसाचे श्रेष्ठत्व जातीवर ठरते, जात जन्मावर ठरते जातीवरून धंदा व धंद्यावरून जात ठरते. अधिकार व हक्क सवर्णांच्या हाती व गुलामगिरी दलित वर्गाचें गळी. जातीजातीच्या उच्च निचतेव र म्हणजेच विषमतेच्या पायावर आधारलेला हिंदू-धर्म चातुर्वर्ण्य समाजपद्धती मोडली पाहिजे व त्या ठिकाणी समता, बधुता, स्वतंत्र व न्याय या पद्धतीवर आधारलेली जाती विहीत, व वर्गविहीत वर्णाविहीत अशी समाजपद्धती म्हणजेच बौद्धजन समाज पद्धती निर्माण केली पाहिजे. या वरील विवेचनावरुन भारतीय खेड्यांची समाजरचना किती समाज घातकी आहे. याचे स्पष्ट चित्र दिसते.

आशा या लोखंडी चौकटीच्या समाज रचनेतील गुलामी जीवनातून मुक्त होण्यासाठी आपल्या बांधवाचे अंतिम ध्येय आहे. या मानव घातकी समाज रचनेचा चक्रव्यूह फोडून बाहेर पडण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आपले अखंड जीवनभर लढले आणि आपल्याला मुक्तीचा मार्ग दाखविला.

आज आपल्यात डॉ. बाबासाहेब नाहीत पण त्यांनी अमूल्य विचाराचा खाजना आपल्या हावाली केला आहे. त्याच त्यांच्या विचाराच्या आधारे आपल्याला नव समाज रचना निर्माण केली पाहिजे, तरच खेड्यातील आपले बांधव खेड्यातील गुलामगिरीतून मुक्त होतील व त्यांची दुःखी काहाणी संपेल.

"माझ्या खेड्यातील बांधवांचे कडे होईल – – – ? ही डॉ. बाबासा–हेबाची चिंता दूर होईल.

याच करिता डॉ. बाबासाहेब यांच्या पवित्र संदेशा प्रमाणे, आपण एकजुट राखली पाहिजे. एकाच आईच्या लेकरासारखे, एक दिलाने, निःस्वार्थीपणाने आपल्या ध्येयाच्या वाटेने पुढचे पाऊल टाकले पाहिजे.

त्या दृष्टीने प्रबुद्ध भारत आपल्या बांधवांच्या दुःखाचा आवाज उठवतील व डॉ. बाबासाहेब प्रणित नवसमाज रचना निर्माण करण्यासाठी सतत आघाडीवर

राहील हीच प्रतिज्ञा करतो आणि आपल्या सर्वांच्या हार्दिक सहकार्याची प्रबळ आशा मनात धरून पुढचे पाऊल टाकतो.

शंकरराव खरात
७ मार्च १९५९

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड

चेअरमन

आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
घनश्याम तळवटकर

**

१०

नवी कार्यकारीणी - नवी जबाबदारी

(दिनांक २८ मार्च १९५९)

जुलै १९५३ मध्ये मराठवाडा शेडचुल्ड कास्ट फेडरेशनच्यावतीने मराठवाडा भागातील कार्यकर्त्यांची बैठक झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी बैठकीला हजर असलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शनपर केलेल्या भाषणात मोलाचे विचार मांडले ते असे –

'आपल्या समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने राजकीय, धार्मिक आणि आर्थिक या सर्व प्रश्नांचा चांगला बारकाईने अभ्यास केला पाहिजे. ज्यांना पुढारी व्हायचे असेल त्यांनी पुढाऱ्याची कर्तव्य-कर्मे, पुढाऱ्याची जबाबदारी काय आहे याची जाणीव ठेवावयास पाहिजे. कारण आपल्या समाजातील पुढाऱ्यांवर मोठी जबाबदारी आहे. इतर समाजाच्या पुढाऱ्यासारखी आपल्या समाजातील पुढाऱ्यांची स्थिती नाही. इतर पुढाऱ्यांचे काय? सभेत जाणे, लांबलचक भाषण करणे, टाळ्या मिळविणे आणि शेवटी हार गळ्यात घालून येणे एवढेच काम इतर पुढाऱ्याकडे असते. आपल्या समाजातील पुढाऱ्यांना हे करून भागणार नाही. चांगला अभ्यास करणे, विचार करणे, समाजाच्या उन्नतीसाठी स्वत: रात्रंदिवस सतत अंगमेहनत करणे हे आपल्या तरी पुढाऱ्यांना करावे लागेल तरच तो लोकांचे थोडेफार भले करू शकेल. तुम्हाला वाटते पुढारी होणे फार सोपे आहे. पण माझ्या मते पुढारी होणे फारच अवघड काम आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष खासदार एन्. शिवराज यांनी या कसोटीचा लावूनच भारतीय रिपब्लिकन पक्षाची नवी कार्यकारीणीची नेमणूक पक्षाच्या घटनेप्रमाणे संक्रमणावस्थेतील पक्ष अध्यक्षास दिलेल्या विशिष्ट अधिकाराप्रमाणे केलेली ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

नेमणूक केलेल्या नव्या कार्यकारीणीत प्रामुख्याने मुंबई, मद्रास, पंजाब, आंध्र, मराठवाडा, दिल्ली, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यातील पक्ष नेते आहेत. शिवाय भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष व समता सैनिक दलाचे अध्यक्ष यांनाही प्रामुख्याने कार्यकारीणीत प्रतिनिधीत्व दिलेले आहेत. कार्यकारीणीत एकूण सतरा नेते आहेत. आणखी चार नेत्यांची नेमणूक लवकरच जाहीर होईल. एकूण २१ प्रतिनिधींची ही कार्यकारीणी होईल

बाकी राज्यांना प्रतिनिधीत्व द्या

या नव्या कार्यकारीणीत केरळ, बंगाल, हिमाचल, बिहार, ओरिसा व मध्य भारत या राज्यातील प्रतिनिधींची नेमणूक अजून तरी झालेली दिसत नाही. आणखीन चार प्रतिनिधींची नेमणूक व्हायची आहे. त्यावेळी या प्रांताना प्रतिनिधीत्व मिळण्याची शक्यता दिसते.

बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम व मध्य भारत इत्यादी प्रांतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावंत अनुयायी आहेत. पण ते खेडोपाडी विखुरलेल्या अवस्थेत असणार. त्यांना आपल्या पक्षाच्या झेंड्याखाली जमवून त्या त्या राज्यात पक्षाची मजबूत, बलवान अशी प्रभावी संघटना पक्क्या पायावर बांधली पाहिजे. त्या दृष्टीने आपल्या पक्ष नेत्यांनी पुढचे पाऊल टाकले आहे. लवकरच या राज्यात रिपब्लिकन पक्षाच्या शाखा सुरू होतील आणि औरंगाबाद येथे १९५९ मे तारिख १४ व १५ रोजी होणाऱ्या रिपब्लिकन पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनाला या राज्यातील प्रतिनिधी अधिक प्रमाणात येतील अशी खात्री वाटते.

दलित वर्गांना प्रतिनिधीत्व द्या

हिंदू समाजरचनेत चार वर्ग गुलामगिरीत राहातात.

१) अस्पृश्य
२) आदिवाशी किंवा वन्यजाती
३) गुन्हेगार जाती
४) इतर मागासलेल्या जाती

या वर्गाची लोकसंख्या सुमारे १२ कोटी भरेल. हा वर्ग हिंदू समाजाचा खालचा थर आहे. या चारही वर्गाचा सामाजिक दर्जा हीन प्रतिचा आहे. ते आर्थिक दृष्टया

गरीब आहोत. सांस्कृतिक दृष्टचा मागास आहेत. यावरून पाहता चारही वर्गाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दर्जा एकच आहे. या वर्गाचे कमी अधिक प्रमाणात एकच मोठे दुःख आहे. ते दुःख म्हणजेच सामाजिक विषमता व आर्थिक विषमता हे होय. याकरीता सामाजिक समता व आर्थिक समता निर्माण करून सांस्कृतिक दर्जा उंचावणे ही एकच या वर्गाची मागणी आहे.

या दृष्टीने आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या जनतेशी सामाजिक व आर्थिक दृष्टचा जे समदुःखी बंधू वर्ग आहेत. त्यांनाही रिपब्लिकन पक्षात प्रतिनिधीत्व मिळणे अत्यावश्यक अशी महत्त्वाची बाब आहे. व त्यादृष्टीने आपले नेते प्रयत्न करीत आहेत. ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

आदिवाशी, गुन्हेगार, इतर मागासलेले वर्ग व भूमीहीन, गरीब शेतकरी कामकरी या वर्गात आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या ध्येय धोरणाचा चिकाटीने प्रचार झाला पाहिजे. आम्हाला खात्री वाटते की खालचा थर आहे. थरांतील पीडीत व पिळला गेलेला मोठा समाज आपल्या पक्ष ध्वजाच्या सावलीत येईल आणि त्याची व्यक्तिगत उन्नती व सामुदायिक विकास व प्रगती होईल. या चारही वर्गाचा सामाजिक दर्जा हीन प्रतिचा आहे. ते आर्थिक दृष्टचा गरीब आहेत. सांस्कृतिक दृष्टचा मागास आहेत. यावरून पाहाता या चारही वर्गाचा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक दर्जा एकच आहे. या वर्गाचे कमी अधिक प्रमाणात एकच मोठे दुःख आहे ते दुःख म्हणजेच सामाजिक विषमता व आर्थिक विषमता हे होय. याकरीता सामाजिक व आर्थिक समता निर्माण करून सांस्कृतिक दर्जा उचावणे ही एकच या वर्गाची मागणी आहे

या वर्गातील जनतेला, आपल्या रिपब्लिकन पक्षाबद्दल आपुलकी व विश्वास वाटण्यासाठी, जे आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या ध्येय धोरणाशी समरस होतील व डॉ. बाबासाहेब यांनी म्हटल्याप्रणाणे रात्रंदिवस पुढे पक्षकार्यास वाहून घेतील. त्यांना पक्ष पदाधिकाऱ्याचे स्थानावर निवडून द्यावे व त्यातूनच पक्षाच्या कार्यकारीणीवर त्यांना प्रतिनिधीत्व द्यावे. यामुळे आपल्या पक्षात हे नवे वर्ग येतील व आपला पक्ष खऱ्या अर्थाने प्रचंड असा भारतव्यापी होईल.

रिपब्लिकन पक्षाच्या नव्या कार्यकारीणीवरील जबाबदाऱ्या

आपला पक्ष गोरगरीबांचा आहे आपल्या पक्षाची जनता खेडोपाडी

दारिद्र्यात व सामाजिक विषमतेत जीवन कंठते. अन्न, वस्त्र, निवारा या त्यांच्या मूलभूत गरजा आहेत. सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा त्यांचा अंतिम हेतू आहे. आपला व्यक्तिगत विकास व उन्नती आणि समाजाचा सामुदायिक प्रगती व उत्कर्ष झाला पाहिजे हे आपले ध्येय आहे. या सर्व गोष्टींचा ध्यानस्त वृत्तीने विचार केला तर आपल्या पक्षापुढे 'जनतेचे प्रश्न' म्हणजे डोंगरासारखी कामे आहेत. काम भरपूर आहे पण डॉ. बाबासाहेब यांनी म्हटलेल्या खऱ्या कार्यकर्त्यांची उणीव आहे जनतेचे प्रश्न सोडवून, त्यांना दिलासा दिला पाहिजे. त्यांचा आज आलेला विश्वास आपल्या कार्याने अधिक दृढ केला पाहिजे. याच करिता जनतेचे प्रश्न पक्षापुढे अधिक विधायक स्वरूपाचा कार्यक्रम ठेवून सोडविले पाहिजेत. व या दृष्कीकोणातून आपले शहर, जिल्हा, तालुका, गाव, पक्ष कार्यकर्ते विधायक कार्याला लावले पाहिजेत. आता अधिक बोलण्यापेक्षा कृतीची अधिक कामे करण्याची जरूरी आहे. तरच आपला रिपब्लिकन पक्ष भारतातील इतर काँग्रेस, कम्युनिस्ट, प्र. समाजवादी या पक्षाच्या स्पर्धेत टिकेल आणि यशाप्रत जाईल.

या दृष्टीने विचार केला असता नव्या कार्यकारीणीवर अत्यंत मोठी जबाबदारी आहे. आम्हाला खात्री वाटते व विश्वास आहे की, ही नवी कार्यकारीणी आपल्या प्रभावी नेतृत्वातून जनतेला मार्गदर्शन करील व जनतेचे मूलभूत प्रश्न सोडविल.

देशातील गोरगरीबांचा मूलभूत प्रश्न सुटणे म्हणजेच खरीखुरी लोकशाही या देशात निर्माण होणे होय. या विचारामुळेच आपल्या पक्षावर मोठी जबाबदारी आहे व त्यादृष्टीने पुढचे पाऊल टाकले पाहिजे.

चळवळीचा वृक्ष वाढवा

सुरूवातीला दिलेल्या भाषणातच डॉ. बाबासाहेब पुढे म्हणतात, 'अद्याप पुष्कळ करावयाचे आहे. शिल्लक आहे. रस्ता पुष्कळ चालून जावयाचा आहे. आता पर्यंत जे झाले आहे, ते फक्त मी रोपटे लावले आहे. चळवळीचा अद्याप वृक्ष वाढावयाचा आहे सांगावयाचा उद्देश हाच की, आपल्यातील पुढाऱ्यावर पुढारीपणाची फारच मोठी जबाबदारी आहे.'

डॉ, बाबासाहेबांचा हा दिव्य संदेश आपण प्रत्येक पक्ष अनुयायांनी व नेत्यांनी आपल्या चळवळीचा वृक्ष वाढविला पाहिजे. डॉ. बाबासाहेब यांनी लाव–

लेल्या रोपट्याला आपण आपल्या एकजुटीच्या, एकीच्या बळाचे पाणी रात्रंदिवस चिकाटीने घातले पाहिजे. तरच चळवळीच्या रोपट्याचा विशाल वृक्ष होईल. त्या वृक्षाला फुले-फळे येतील. त्या फळाचा अमृतरस आपल्या पीडीत, दुःखी, कष्टकरी जनतेला मिळेल, तो अमृतरस प्राशन करून आपल्या जनतेचा संसार सुखाचा होईल व सगळी जनता सुखाने या झाडाच्या छायेत विश्रांती घेईल.

या अंतरीच्या ध्येयवादी तळमळीने आपण सर्व पक्ष कार्यकर्त्यांनी पक्षाच्या नव्या कार्यकारीणीस आपल्या कृतीने हार्दिक सहकार्य दिले पाहिजे.

शंकरराव खरात

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड


चेअरमन

आर. डी. भंडारे

बी. सी. कांबळे

घनःशाम तळवटकर

**



99

आपली झोपडी जिवंत ठेवा

(दि. ९ मे १९५९)

डॉ. बाबासाहेबांचा संदेश

आम्ही जीव तोडून अंतरीच्या तळमळीने पुढाऱ्यांना, कार्यकर्त्यांना डॉ. बाबासाहेबांचा संदेश आमच्या संपादकीयात सांगतो. डॉ. बाबासाहेबांच्या संदेशाच्या प्रकाशातच आपल्याला पुढची वाट दिसणार आहे

डॉ. बाबासाहेब आपल्या संदेशात सांगतात, " राजकारणात भांडणे होतात. ती विसरून जाण्याची सवय ठेवली पाहिजे. त्या भांडणाचे झाड मनात वाढते. हा स्वभाव बरा नाही. माझे हृदय निर्मळ आहे, माझे सुद्धा इतराशी मत भेद असतात. परंतु मी ते लवकर विसरतो. माणसाचे मन फुलासारखे स्वच्छ असावे."

हा अमूल्य संदेश आम्ही पुन्हा जनते पुढे ठेवला आहे. हा संदेश आपल्याला प्रत्येक नेत्याने व कार्यकर्त्याने, आपल्या हृदयावर कोरून ठेवला पाहिजे जोपर्यंत आपण राजकीय क्षेत्रात काम करीत आहोत तोपर्यंत या संदेशाचे मनन केले पाहिजे व त्या प्रमाणे वागले पाहिजे असे जर होईल तर पक्षांतर्गत आज गरम झालेले वातावरण होणारच नाही. या संदेशाच्या उलट वागले तर केवळ वादासाठी शुष्क वाद करण्यासारखे होईल. त्यातून आपल्या पक्षाचे तर हीत होणार नाहीच., पण आपल्या गोरगरीब जनतेचे तरी मुळीच हीत होणार नाही. केवळ मी का–तू असेच या वादाचे स्वरूप राहील. प्रत्येक पुढाऱ्याने व कर्यकर्त्याने एकच गोष्ट शिका व करा ती म्हणजे तू का मी ? या दोन अक्षरांत 'च' फक्त मिळवा म्हणजे त्यातून

तुम्हाला 'तूच मी' किंवा 'मीच तू' असे 'तू का मी' चे एकरूप झालेले दिसेल. व त्यातूनच एकदिल, एकजूट निर्माण होईल, असे वागणे कृतित आणण्यानेच आपले हृदय निर्मळ दिसणार आहे व मन फुलासारखे स्वच्छ होणार आहे.

मतभेद तरी कां ?

रिपब्लिकन पक्षाच्या प्रेसिडियमची व जनरल कौन्सिलची बैठक ता २६ व २८ ऑक्टोबर १९५८ रोजी मुंबई पक्षाच्या कार्यालयात झाली. रिपब्लिकन पक्षाच्या प्रो. जनरल कौन्सिलची मुदत ३१ मार्च १९५९ पर्यंत प्रेसिडियमचे अध्यक्ष बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी जी वाढविली त्याला या बैठकीत मान्यता दिली.

खा. बी. सी. कांबळे व त्यांचे सहकारी यांचे म्हणणे असे आहे की नागपूर ठरावाप्रमाणे ३-१०-१९५८ नंतर प्रो. जनरल कौन्सिल नष्ट झाले. इथे आपण एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे ती म्हणजे पक्षाचे प्रेसिडियम ही. -- व सर्वाधिकारी संस्था आहे. संस्थेच्या अध्यक्षानेच जर प्रो. जनरल कौन्सिलची मुदत पुढे वाढविली तर पक्ष हिताचे दृष्टीने ती योग्यच केली आहे.

प्रो. जनरल कौन्सिलची मुदत वाढविल्याने कोणावर तरी काय असा डोंगर कोसळला ! पक्षाच्या प्रो. ज. कौन्सिलचे अस्तित्व आहे म्हणून त्याची मुदत वाढविल्याने कोणतीच गोष्ट पक्षविरोधी किंवा पक्षाच्या तत्त्वा विरोधी होत नाही. पक्षाचा हा रथ चालविला पाहिजे. अखंडपणे चालविला पाहिजे. याच उच्च हेतूने ही गोष्ट केली आहे. त्यात कोणा व्यक्तिचा कसलाच फायदा नाही. या कार्यपद्धतील किरकोळ मुद्द्याला एवढे मोठे महत्व देऊन ही ओढाताण करून गरम वातावरण करणे ठिक नाही. पक्ष हीताला, जनता हीताला तरी ते मुळीच पोषक नाही.

श्री यशवंतराव आंबेडकर यांची अभिनंदनीय कामगिरी

शेवटी प्रो. जनरल कौन्सिलचे अस्तित्व आहे का नाही ? त्यामुळे तीने घेतलेले निर्णय कायदेशीर आहेत का नाहीत ? हाच कोरडा वाद पुढे चालला.

हा वाद फक्त नागपूर, मुंबईत फक्त पुढाऱ्यात सुरू झाला. ही गोष्ट नागपूर, मुंबईतील पक्षाच्या दृष्टीने बरी नाही म्हणून श्री यशवंतराव आंबेडकर यांनी पुढाकार घेऊन ता. १४ नोव्हेंबर १९५८ ला मतभेद मिटवण्यासाठी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची बैठक मुंबई येथे घेतली व बैठकीत एक ठराव पास झाला.

तो ठराव "पक्षात निर्माण झालेल्या परिस्थितीचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणे आपल्या संघटनेचे कार्य चालले आहे किंवा नाही, आणि आपले ऐक्य व बंधुभाव अबाधित रहावा या सर्व गोष्टीचा विचार करून एक मताने व एका दिलाने सहा सदस्यांची कमेटीने निर्णय घ्यावेत.

त्यांनी ते जनतेस जाहीर करावे. ते निर्णय सर्व संघटनांना बंधनकारक राहतील.

तो पर्यंत प्रेसिडियम व जनरल कौन्सिलने शिस्तभंगाबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाची तजबिज स्थगित करावी व प्रतिक्रिया म्हणून जो जनतेत चाल आहे तो बंद करण्यात यावा.

सहा जणांच्या सदस्यांनी आपला निर्णय ३१ डिसेंबर १९५८ च्या आत घ्यावा.

महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या ह्या बैठकीत झालेल्या ठरावाप्रमाणे खालील गोष्टींचाच अर्थ उघड निघतो.

अ) महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची बैठक महाराष्ट्रापुरतीच फक्त आहे. ती अखिल भारताची मुळीच नाही.

ब) या बैठकीत पास झालेला ठराव फक्त महाराष्ट्राला विशेषतः मुंबई नागपुरलाच बंधनकारक असून महाराष्ट्र विशेषतः मुंबई, नागपूर मधील संघटनाना बंधनकारक आहे.

क) पक्षाचे प्रोव्हिजनल जनरल कौन्सिल व प्रेसिडियम यांचे अस्तित्व पूर्ण मान्य आहे.

ड) मुंबई, नागपूरमधील जनतेत जो (वादाचा) प्रचार चालू आहे तो ताबडतोब बंद ठेवावा.

वरील ठरावाचा हाच फक्त अर्थ निघू शकतो.

ठरावा प्रमाणे ता. ३० डिसेंबर १९५८ ला सहा सदस्याची बैठक मुंबई येथे झाली. त्यात काही निर्णय घेण्यात आले. पण प्रोव्हिजनल जनरल कौन्सिलच्या अस्तित्वासंबंधी कोणी कधीच शंका उपस्थित केली नाही. याचा अर्थच हा की, या सहा सदस्यांच्या कमेटीलाहि प्रो. जनरल कौन्सिलचे अस्तित्व मान्य होते.

त्यानंतर ता. ९ व १० मार्च १९५९ रोजी न्यू दिल्ली येथे प्रोव्हिजनल

जनरल कौन्सिलची बैठक घेतली. त्यात घटना समितीने केलेली घटना सम्मत केली. औरंगाबाद येथे मे महिन्यात ता. १४ व १५ ला अ. भा. रिप. पक्षाचे २ रे अधिवेशन घेण्याचे ठरले. त्याच बरोबर पक्ष हिताला हानिकारक आणि घातक असलेल्या कारस्थानी आणि फूटपाडचा कारवाया केल्या म्हणून श्री. आवळे आदिना पक्षातून काढून टाकले. या प्रमाणे पक्षाच्या हालचाली झाल्या.

निःपक्षपातीपणाने व समतोल बुद्धीने पहा

या सर्व गोष्टी निःपक्षपातीपणाने व समतोल बुद्धीने पाहिल्यास खा. बी. सी. कांबळे व त्यांचे सहकारी यानी एवढे काटेकोरपणे व कलमावर बोट ठेवून, शब्दांचा कीस का काढावा हे आम्हास तरी कळत नाही.

असंख्य लोकांच्या जीवाशी खेळताना आपल्याला जपून पाऊल टाकले पाहिजे. आता खा. बी. सी. कांबळे व त्याच्या सहकाऱ्यांचे असे मुख्य म्हणणे आहे.

अ) ता. १४–११–१९५८ च्या महाराष्ट्र कार्यकर्त्यांच्या बैठकीत नेमलेली सहा लोकांची कमेटी ही अखिल भारतासाठी आहे.

ब) ही सहा लोकांची कमेटी हीच पक्षाची सर्वाधिकारी कमेटी असल्याने प्रो. जनरल कौन्सिलचे अस्तित्व नाही. हाच त्यांचा मूलभूत मुद्दा आहे.

वास्तविक आमच्या मता प्रमाणे हे म्हणणे मुळीच बरोबर नाही. कारण महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना अखिल भारतासाठी कमेटी नेमण्याचा हा अधिकार कोणत्या घटनेने वा कोणत्या कायद्याने मिळाला? महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना अखिल भारतासाठी सहा लोकांची कमेटी नेमण्याचा मुळीच अधिकार नाही व हे म्हणणे भारतीय जनतेला मुळीच मान्य होणार नाही. त्यामुळे ती सहा लोकांची कमेटी प्रो. जनरल कौन्सिलच्या जागी मुळीच कायद्याने व व्यवहाराने काम करू शकत नाही. व हे म्हणणेही जनतेला मान्य होणार नाही अखिल भारतासाठी कमेटी निर्माण करावयाची असेल तर ती कमेटी अखिल भारताचे प्रतिनिधीच करू शकतील व अशी कमेटीच अ. भा रिप. जनतेला मान्य होईल.

नवी कार्यकारिणी

पक्षाच्या संमत केलेल्या घटनेप्रमाणे संक्रमणावस्थेतील तरतुदीनुसार पक्षाच्या अध्यक्षास दिलेल्या विशिष्ट आधिकाराप्रमाणे भारतीय रिप. पक्षाचे खा.

एन. शिवराज यांनी पक्षाची नवी कार्यकारिणी नेमून जाहीर केलेली आहे. हीच नवी कार्यकारिणी आता प्रो. जनरल कौन्सिलच्या जागी आली असून, नव्या कार्यकारिणीच्या जाहीर घोषणेनंतर प्रो. जनरल कौन्सिलचे अस्तित्व संपले. आता यापुढे ही नवी कार्यकारिणी हीच पक्षाची मध्यवर्ती अधिकारी संस्था आहे. ही आता जनता मान्य गोष्ट झालेली आहे. ह्याच कार्यकारिणीचे आता जनतेप्रमाणे आमच्या मित्रांनीही अस्तित्व मानून पक्षाच्या पुढील कार्यास लागावे.

आता वाद कोठे आहे ?

वरील विवेचन पाहिल्यावर जो मतभेद निर्माण झालेला आहे ; तो पक्षाच्या कार्यपद्धतीवर आहे. तत्त्वावर मुळीच नाही. पक्षाच्या कार्यपद्धतीत काही दोष असेल किंवा तसा निर्माण झाला तर तो दोष नष्ट करण्यासाठी एवढा वाद व मतभेद जनतेत चव्हाट्यावर आणण्याची मुळीच आवश्यकता नाही. कार्यपद्धती तील दोष आपण एकत्रीत बसून, खेळीमेळीने, चर्चा करून दूर करू शकतो. ही गोष्ट काही अवघड नाही. केवळ नको त्या किरकोळ गोष्टीला भलते महत्त्व देऊन उगीचच काटेकोरपणे शब्दांचा किस काढीत बसून, एकमेकांचा खाजगी उणेपणाही रस्त्यावर आणू नका व 'मी का तू' याचा वाद माजवू नका.

सनदशीर मार्ग

घटना समितीने केलेली घटना मान्य केली. त्या प्रमाणे प्रो. जनरल कौन्सिलच्या जागी आता पक्षाची नवी कार्यकारिणी आली. पक्षाची सभासद नोंदणी सुरू झाली. पक्षाच्या घटनेप्रमाणे लोकशाही पद्धतीने पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका होणार आहेत. या गोष्टीमुळे पक्षाचे कार्य सनदशीर चाललेले आहे हे कोणीही म्हणेल व मानील. त्यामुळे यातच आता वाद संपला व मतभेदही संपले असे कोणत्याही विचारी माणसाला पटेल.

आमची कळकळीची विनंती

खा. बी. सी. कांबळे व त्यांचे सहकारी हे आम्हा सर्वांचेच मित्र आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराची व तत्वांची सर्वांनीच दिक्षा घेतली आहे. त्या पवित्र तत्वांनाच व श्रेष्ठ विचारांना श्रद्धेने उराशी बाळगून आपण सर्वच पुढच्या भवितव्याची वाटचाल करीत आहोत. आपल्या जनतेचे डोंगरासारखे मोठे प्रश्न आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या प्रजेचे दुःख फार मोठे आहे. आपल्या जनतेचे अनेक प्रश्न आहेत. पुढारी जनतेला त्यांच्या दुःखापासून मुक्त करतील, त्यांचे प्रश्न सोडवतील त्यांना सुखासमाधानाचे जीवन निर्माण करून देतील, याच मोठ्या आशेने, श्रद्धेने व विश्वासाने आपली जनता पुढाऱ्यांकडे पाहते. डॉ. बाबासाहेबांचे तत्त्व अतिभक्ति-भावाने उराशी बाळगून जनता ती अमूल्य ठेव आपल्या त्यागमय जीवनाने जपून ठेवण्यासाठी रात्रंदिवस कष्ट भोगते, वेळ प्रसंगी अन्याय, अत्याचार सहन करते. जनता हे दुःख भोगते व त्याग करते हे कोणासाठी ?

अशा श्रद्धावान व निष्ठावंत जनतेला आपण आपल्या किरकोळ मतभेदाचे प्रदर्शन करून दाखविणार काय ? या तुमच्या सभा ऐकून, पत्रक वाचून आपल्याच पक्षाने त्यावरील टीका ऐकून आज महाराष्ट्रातील आपल्या जनतेचे काळीज फाटून जात आहे. त्यांना आपल्या भवितव्याची चिंता निर्माण झालेली आहे. माडीमाडीत, घराघरात, झोपडी झोपडीत डॉ. बाबासाहेबांची प्रजा आज विचार करीत चिंतेत आहे. आता जनतेच्या भावनेची, आशेची ताणाताण कोणीच करू नका. सर्व पुढाऱ्यांनी **हे कार्यपद्धतीच्या किरकोळ** मुद्द्यावरील सौम्य मतभेदाला स्फोटक स्वरूप न देता ते पुन्हा एकत्रित बसून बंधू भावनेच्या नात्याने मिटवा व याचसाठी औरंगाबाद येथील अधिवेशनाला ता. १४ व १५ मे ला हजर राहून एकदिलाने, एकमुखी, एकजुटीचा निर्णय घ्या. हा निर्णय ऐकून आपल्या जनतेचे काळीज सुपाएवढे मोठे होईल व तुम्हाला डॉ. बाबासाहेबाची प्रजा धन्यवाद देईल. हीच जनतेतर्फे कळकळीची विनंती आम्ही करतो. आमच्या विनंतीला मान द्या. शेवटी डॉ. बाबा-साहेबांनी संदेशात पुढाऱ्यांना उपदेश केला आहे.

"बाकीच्यांची (इतर पक्षांची) घरे मोडली तरी आपली झोपडी तशीच ठेवा. लोक तुमच्या झोपडीच्या आश्रयाला येतील. तुमची झोपडी जिवंत राहिली तरच तुमचा जय आहे."

याचाच विचार आपण सतत केला पाहिजे व या विचाराला पोषक अशीच वाणी व कृती ठेवली पाहिजे.

९ मे १९५९

कार्यकारी संपादक
शंकरराव खरात

१२

औरंगाबाद येथील रिपब्लिकन पक्षाचे ऐतिहासिक अधिवेशन

(दिनांक १६ मे १९५९)

भारतातील रिपब्लिकन व बौद्ध बांधवांचे उज्ज्वल भवितव्य घडविणारे, अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे दुसरे अधिवेशन औरंगाबाद येथे होणार आहे. आपल्या भवितव्याची घडण घडविण्याचे मार्गदर्शन आपले पूज्यनीय नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. त्याच मार्गदर्शनानुसार आपल्याला ध्येय–सिद्धीप्रत जावयाचे आहे. आपले भवितव्य घडविणारी ऐतिहासिक घटना औरंगाबाद येथे घडणार आहे, म्हणून औरंगाबाद येथील अधिवेशनाला महत्त्व आहे.

तारिख १६ १९४९ जानेवारी रोजी मनमाड येथे डॉ. बाबासाहेबांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी सत्कार सभेत डॉ. बाबासाहेब यांनी अति महत्त्वाचे विचार मांडले ते असे – "आपणच खरा समाजवाद प्रस्थापित करू शकू. शेतकरी कामकरी राज्य आपणच स्थापणार. कारण आपल्यात श्रीमंत, मध्यम वर्ग नाहीतच. आपण सर्वच कामगार, आपण सर्वच गरीब. आम्ही लोकशाही निर्माण करू – – – खरी लोकशाही निर्माण करावयाची असल्यास आज हजारो वर्ष डोक्यावर नाचत असलेला वरचा वर्ग खाली व समाजातील खालचा वर्ग वर गेल्याशिवाय खरी क्रांती होणार नाही. क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले. ते चक्र आंसा–सह पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांतीच होऊ शकत नाही. ते चाक आम्हीच फिरवू."

डॉ. बाबासाहेब यांच्या मार्गदर्शक संदेशात्मक विचारात राजकीय

मार्गदर्शन आहे. त्या दृष्टीने आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपल्या रिपब्लिकन पक्षावर फारच जबाबदारी आहे. औरंगाबाद येथील अधिवेशनात या दिशेने आपल्याला पुढचे पाऊल टाकले पाहिजे.

तारिख २० एप्रिल १९५९ रोजी नागपूर येथे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन फॉर फॉरीन एज्युकेशन या संस्थेच्या विद्यामाने समाजवाद व रिपब्लिकन पक्षाचा दृष्टीकोन' यावर आपले विचार मांडताना भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष खासदार र. ब. एन्. शिवराज आपल्या भाषणात म्हणाले की, 'देशातील उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करताना त्यातील श्रम करणाऱ्यांना योग्य वाटा मिळाला पाहिजे. या देशात समाजवाद प्रस्थापित करण्याच्या मार्गात मनुस्मृति-प्रणित समाज व्यवस्था हा फार मोठा अडसर आहे. प्रचलित समाज व्यवस्था बदलविण्याने समाजवाद निर्माण करण्यासाठी एक योग्य वातावरण निर्माण होईल.

शेतीवर राबणाऱ्या, गिरणीत काम करणाऱ्या व निढळाचा घाम गाळणाऱ्या शेतकरी कामकऱ्यांच्या हातात सत्ता आल्यानेच खराखुरा समाजवाद प्रस्थापित होईल व रिपब्लिकन पक्ष हा समाजवाद बौद्धधर्मानुसार निर्माण करण्याची पराकाष्ठा करील. . . . . निढळाचा घाम गाळणाऱ्या, श्रम करणाऱ्या शेतकरी, कामकरी व दलित, पीडीत जनतेच्या कल्याणासाठी व त्यांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष बांधला गेला आहे.'

खासदार एन्. शिवराज यांचेही विचार पहाता आपल्या पक्षावर किती महान जबाबदारी आहे याचे स्पष्ट चित्र दिसते.

रिपब्लिकन पक्ष हा भारतातील मागासलेला वर्ग, बौद्धजन समाज, दलित वर्ग, आदिवासी व शेतकरी; कामकरी, भूमीहीन मजूर यांचा आशास्थान आहे.

समान सामाजिक दर्जा

विशेषतः मागासलेला वर्ग, दलित आदिवासी, बौद्धजन व भूमीहीन मजूर, शेतकरी या वर्गाचे संबंध जवळचे आहेत. या वर्गातील सर्व जनता या देशातील समाजाचा खालचा थर आहे. या वर्गाला प्रथमतः 'सामाजिक समता' पाहिजे. समदुःखी, एकाच सामाजिक दर्जाचे, खालच्या थरातील दडपले गेलेले हे वर्ग एकजुटीने रिपब्लिकन पक्षाच्या ध्वजाखाली आहेत.

समान आर्थिक दर्जा

वर नोंद केलेल्या वर्गाचा आर्थिक दर्जा अगदी खालच्या पातळीतला आहे. सर्वच दरिद्री. सर्वच कामकरी, कष्टकरी यांनी श्रमशक्तिची विक्री बाजारात करावी. पोटपाण्याला मिळवून आणावे. या वर्गाच्या हाती उत्पादनाची साधने मिळाली नाहीत. संपत्तीचे उत्पादन करून, संपत्तीचा साठा या वर्गांना करता येत नव्हता. त्यांच्या श्रम शक्तिचा उपयोग स्वतःचा जीवन संसार सुखी करण्यासाठी केला जाऊ देत नव्हता. गुलामी जीवन जगणे हेच या वर्गाच्या नशिबी, म्हणूनच या वर्गाचा आर्थिक दर्जा अत्यंत गरिबीचा असा झाला. सर्वच धनाने गरीब झाले व या वर्गाचा आर्थिक दर्जा एकच झाला.

यावरून आपल्या रिपब्लिकन पक्षातील असलेल्या वगाचे दुःख एकच आहे. या सर्व वर्गांना स्वतःच्या उन्नतीची व विकासाची संधी रिपब्लिकन पक्षात मिळणार आहे. हीच मोठी आशा या वर्गाची व त्यातील प्रत्येक व्यक्तिची आहे. ही आशा प्रत्यक्षात सफल करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्ग–दर्शनानुसार पक्षाचे पाऊल पुढे पडले पाहिजे.

पक्षाची संघटना अभेद्य करा

याच करिता भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या संघटनेची बांधणी अधिक पक्की, मजबूत व भारतव्यापी केली पाहिजे. त्या दृष्टीने आपल्या पक्षाच्या नेत्यावर फारच मोठी जबाबदारी आहे. भारतासारख्या अवाढव्य देशात भिन्न चालीरीती, भिन्न संस्कृती, वेगवेगळ्या भाषात व्यवहार करणारे लोक पाहून अखिल भारतीय स्वरूपाचा प्रभावी, प्रचंड असा पक्ष वाढवावयाचा म्हणजे ही नेते कार्यकर्ते व जनता यांच्या शिरावरील मोठी जबाबदारी आहे. या करिता प्रत्येक प्रांतात, प्रत्येक प्रांतातील प्रत्येक शहरात, जिल्हचांत व तालुक्यात पक्ष शाखा निर्माण करून त्या कार्य प्रवण केल्या पाहिजेत. हे करण्यासाठी साधनांची आवश्यकता आहे. त्या साधनांपैकी पैसा व त्यागी, ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची अधिक आवश्यकता आहे. आपला समाज मूळचाच दरिद्री आहे. त्यामुळे पैशाच्या साधनावाचून आपल्या पक्षाची वाढ थाबणार की काय? असा प्रश्न आपल्यापुढे आहे परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिव्य संदेशाने श्रेष्ठ विचाराने व प्रत्यक्ष कृतीने आपल्या समा–जात दिव्य शक्ती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आजही पक्षाचा गाडा पैशावाचून आडला नाही. उलट आपले कार्यकर्ते उच्च ध्येयाने प्रेरित होऊन सतत निष्ठेने

काम करतात अशा त्यागी, ध्येयवादी निष्ठावान कार्यकर्त्यांना पक्षाने काम करण्याची आजच्या पेक्षा अधिक संधी देऊन पुढे आणले पाहिजे म्हणजे पक्षाचे काम अधिक उत्साहाने चालून पक्षात अधिक जिवंतपणा राहील.

विधायक कार्याची आवश्यकता

कोणताही पक्ष विधायक कार्याशिवाय अधिक प्रभावी होणार नाही. विधायक कार्य म्हणजे पक्ष बांधणीचा व पक्ष विकासाची पहिली पायरी आहे. विधायक कार्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांचे मन व वेळ गुंतला जातो. त्याच कसोटीतून खरा कार्यकर्ता निर्माण होतो. विधायक कार्यामुळे पक्षाच्या निष्ठावंत जनतेचा फायदा होऊन पक्षाचे दैनंदिन कार्य जिवंत आहे असे वाटते. यासाठी पक्षापुढे विधायक कार्यक्रम ठेवा.

पक्ष-पोषक संघटना निर्माण करा

कोणताही पक्ष, पक्ष पोषक अशा दुसऱ्या संघटना असल्याशिवाय तो वाढू शकत नाही. तशा पोषक संघटना प्रत्येक दुसऱ्या पक्षाच्या आहेत. तशाच पक्ष पोषक संघटना आपल्या ही पक्ष वाढीसाठी आवश्यक आहेत. पुढीलप्रमाणे पक्ष पोषक संघटना आपल्याला निर्माण कराव्या लागतील.

१) कामगार संघटना
२) भूमीहीन मजूर संघटना
३) गरीब शेतकरी संघटना
४) विद्यार्थी संघटना
५) महिला संघटना

पक्ष पोषक संघटनात यांचा प्रामुख्याने समावेश होईल अशा उपसंघटना निर्माण करून त्याला डॉ. बाबासाहेबांच्या विचारानुसार तत्त्वज्ञानाचा पाया ठेऊन त्या त्या पायावर निर्माण केल्या पाहिजे. या पोषक संघटनातून पक्ष बाढीचे जनतेत दैनंदिन कार्य चालू राहावे व त्यातूनच पक्ष व जनता यांचा अधिकच जिव्हाळ्याचा संबंध येतो व पक्षाचा वृक्ष अधिकच फोफावतो. या दृष्टीतून अशा पोषक संघटना निर्माण करून त्या कार्य प्रवण केल्या पाहिजेत.

पक्षाचे धोरण

डॉ. बाबासाहेब यांनी आपल्या पक्षाचे धोरण अनेक विचार मांडून आपल्यापुढे ठेवले आहे. त्या धोरणानुसार आपल्या पक्षाचे आर्थिक, परराष्ट्रीय व कामगार इत्यादी बाबतचे धोरण ठरविले पाहिजे. त्याच बरोबर पंचवार्षिक योजना बाबतही आपल्या पक्षाची भूमिका ठरविली पाहिजे. म्हणजे आपले पक्ष कार्यकर्ते व जनता यांना त्या दृष्टीने राजकारणाच्या दैनंदिन जीवनात वागावयास बरे पडेल.

औरंगाबाद येथील ऐतिहासिक पूर्ण अधिवेशनात या सर्व महत्त्वाच्या मुद्द्यावर विचार होऊन आपले पक्षनेते जनतेला योग्य ते मार्गदर्शन करतील अशी मोठी आशा आहे.

शंकरराव खरात

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड
चेअरमन
आर. डी. भंडारे
बी. सी. कांबळे
घनश्याम तळवटकर

**



१३

शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा हा बौद्धांच्या सवलती मागील मूलभूत हेतू !

(दि. १ ऑगस्ट १९५९)

भारतीय चातुर्वर्ण्य समाज पद्धतीत धंद्याची कायम स्वरूपी परंपरागत विभागणी केली. त्यामुळे चातुर्वर्ण्य समाजातला वरिष्ठ वर्ग श्रेष्ठ स्थानाप्रत गेला आणि कनिष्ठ वर्ग अधोगतीच्या दिशेला लागला चातुर्वर्ण्य पद्धतीमुळे समाजातील खालचा थर शुद्र व अतिशुद्र, दुसऱ्याची गुलामी, सेवा, कर्तव्य करण्यात डांबल्या-मुळे त्यांच्या प्रगतीच्या वाटा खुंटल्या. रूढी, शास्त्रे, पुराणे, श्रुति व स्मृति यांना-ही शुद्र-अतिशुद्राच्या दैनंदिन जीवनावर इतकी बंधने ठेवली की, त्यामुळे जीवनात आपली प्रगती करणे शुद्रा अतिशुद्रांना अशक्य झाले. याच बंधनामुळे शुद्र व अति-शुद्रांना विद्या संपादन करणे अशक्य झालेले होते. एका समाज-जातीने दुसऱ्या जातीला कायम बंधनात ठेवण्याची समाजरचना पद्धती भारतात चालू होती.

पाश्चिमात्य राष्ट्रांत नवसमाजरचनेची नवी मूल्ये निर्माण झाली आणि भारतातही पाश्चिमात्य देशातील नवविचारांचे, नवतत्त्वांचे वारे भारतात आले. व त्याच बरोबर व्यक्ति स्वातंत्र्य, समता, बंधुता अशी तत्त्वे भारतात आली व त्याचा परिणाम भारतीय समाज पद्धतीवर थोडा थोडा होऊ लागला आणि भार-तीय जुन्या ग्रामीण संस्थेबरोबर, भारतात औद्योगिक केंद्राच्या परिसरात नवी समाजरचना व्यापक स्वरूपात नसली तरी थोडचा थोडचा स्वरूपात आपली पाऊले पक्की करू लागली आणि त्या मुळे नव्यासमाजरचनेच्या परिसरात व्यक्ति

स्वातंत्र्याचे तत्त्व मान्य होऊ लागले व त्यातूनच विद्यामंदिराचे द्वार सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात खुले झाले. ब्राह्मणाबरोबर शुद्र अतिशुद्रांची मुलेही विद्या संपादन करू लागली.

याच बदलत्या काळात दलित वर्गात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या महापुरुषाचा जन्म झाला आणि ते पुढे सर्व विद्या ज्ञानाने विभूषीत झाले. ज्ञान हे प्रचंड सामर्थ्य असू शकते हे डॉ. बाबासाहेबांना त्याच्या सुरुवातीच्या जीवनात प्रचिती आल्याने, त्यांनी त्यांच्या जीवनातील सामाजिक लढ्याच्या पहिल्या विचार प्रणालीतच विद्या संपादन करा! ज्ञानी बना! विद्येच्या सामर्थ्यावर सरकारी राज्ययंत्रणेतील मानाच्या जागा काबीज करा. विद्येच्या ज्ञानाच्या सामर्थ्यावर शासन कर्ती जमात बना ! या प्रमाणे दलित समाजास स्फूर्तीदायक संदेश दिला, आणि त्या संदेशाच्या आधारेच भारतातील दलित वर्गाची मुले विद्यामंदिरात प्रवेश मिळू लागली व विद्येचे अध्ययनही करू लागली व आपल्या प्रगतिची वाट-चाल डॉ. बाबासाहेब यांच्या संदेशाप्रमाणे करू लागली. दलित वर्गीय मुलांनी विद्यामंदिरात प्रवेश केला त्या काळी विद्याही महाग होती. ती मिळविण्यासाठी तिला फी व इतर खर्चांचे मोठे मोल द्यावे लागे. त्यामुळे श्रीमंताच्या मुलाबरोबर दारिद्र्याने गांजलेल्या दलित वर्गीय विद्यार्थ्यांला विद्या संपादन करणे अवघड होऊ लागले. फक्त ऐपतदारच विद्या शिकू लागले. गरीब विद्येला पारखे होऊ लागले. त्या मुळे परिस्थितीने मागासलेल्या दरिद्री समाजाच्या मुलांना विद्यादान मोफत मिळावे व तसे सरकारने द्यावे असा विचार समाजात निर्माण झाला व त्यातून स्टार्ट कमिटीचा जन्म झाला. मुंबई सरकारने १९२८ साली स्टार्ट कमिटी नेमली. त्या कमिटीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरही होते. त्या कमिटीने मागासलेला वर्ग कसा ठरवायाचा याच्या काही कसोटचा ठरवलेल्या आहेत.

डॉ. बाबासाहेबांनाही त्यांच्या राजकीय जीवनाच्या प्रारंभापासून दलितांची शैक्षणिक बाजू मांडलेली आहेच. १९३२ साली पुणे करारावर सहया करतांना दलित वर्गात शैक्षणिक सवलतीच्या मागणीस भारतातील सर्व थोर नेत्यांनी मान्यता दिली आहेच. पुणे करारातील शेवटच्या नवव्या कलमात त्याची लेखी तरतूद केली आहे. ती अशी, "भारतीय दलित वर्गांना शैक्षणिक सवलती देण्या-साठी, प्रत्येक प्रांतांतील शिक्षण खात्याच्या वार्षिक रकमेतून योग्य अशी भरपूर रक्कम ठेवण्यात यावी." त्याच प्रमाणे डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या दलितांच्या लढ्यात वारंवार सभा, परिषदा, अधिवेशनात मागासलेल्या

व दलित वर्गांना शैक्षणिक सवलती द्या. अशा ठराव रूपाने मागण्या केल्या आहेत.

अखिल भारतीय शेडचुल्ड कास्टस फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक ता. २३ सप्टेंबर १९४४ रोजी मद्रास येथे रावबहादूर एन. शिवराज एम. एल. ए. (सेंट्रल) यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. त्या बैठकीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरही मार्गदर्शन करण्यासाठी हजर होते. या बैठकीत दलित वर्गांच्या मागण्या म्हणून ठरावाद्वारे जाहीर केल्या आहेत. त्या मागण्यातील ठराव नं १० (दहा) अन्वये शैक्षणिक मागणी केली आहे. तो ठराव असा आहे. "जो पर्यंत भारतातील दलित वर्गीय यांना सत्तेवरील मानाच्या जागा (वरिष्ठ अधिकाऱ्याच्या जागा) मिळणार नाही तो पर्यंत सरकार व सवर्ण जनता यांच्या कडून दलितांना जी पिढ्यान्पिढ्या अन्यायाची व हिनतेची वागणूक मिळाली ती तशीच पुढे चालेल, असे शे. का. फे. च्या कार्यकारिणीला वाटते. या करिता विद्यालयीन व विश्वविद्यालयीन (उच्च) शिक्षणाचा प्रचार अतिमहत्त्वाची बाब म्हणून दलित वर्गात झाला पाहिजे असे शे. का. फे. कार्यकारिणीचे मत आहे. परंतु अशाप्रकारचे उच्च शिक्षण घेणे ही गोष्ट दलित वर्गाच्या साधन–शक्तिच्या पलीकडची आहे; ही गोष्ट कोणासही नाकारता येणार नाही. या करीता कार्यकारिणीचे असे मत आहे की, दलित वर्गाच्या शैक्षणिक प्रश्नाचे बाबतीत भारतातील प्रत्येक प्रांतिक सरकारवर निश्चित स्वरूपाची या बाबत जबाबदारी टाकावी. त्याच प्रमाणे आगामी भारतीय घटनेनेही प्रांतिक सरकारवर व मध्यवर्ती सरकार यांनी दलितांच्या शिक्षण कार्यासाठी स्वतंत्र असा भरपूर फंड ठेवण्याची, दोन्हीही सरकारच्या वार्षिक बजेटमध्येच स्वतंत्रपणे दलितांच्या शैक्षणिक कार्यासाठी तरतूद करण्याची जबाबदारी असावी.'

या प्रमाणे थोडक्यात हा महत्त्वाचा शैक्षणिक मागण्याबाबतचा ठराव आहे. याच ठरावाप्रमाणे अनेक ठराव शे. का. फे. च्या प्रांतिक व मध्यवर्ती कार्यकारिणीने वेळोवेळी केलेले आहेत

भारतीय घटनेत, दलित वर्गाच्या लढ्यात निर्माण झालेल्या पूर्ण मागण्या मान्य झाल्या नसल्या तरी यापैकी बऱ्याच मान्य झाल्या असून, त्या घटनेत दलित मागासलेल्या वर्गांना संरक्षण म्हणून नोंद आहेत.

त्या पैकी घटनेचे कलम ३३४, ३३५, ३३८, ही महत्त्वाची कलमे आहेत. त्याच बरोबर घटनेच्या कलम ३४० मध्येही महत्त्वाची तरतूद आहे ती अशी

"भारताच्या राष्ट्राध्यक्षांनी मागासलेल्या लोकांसाठी कमिशन नेमून, ते कमिशन सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागासलेल्या वर्गाच्या परिस्थितीची चौकशी करून मागासलेल्या वर्गास कोणत्या अडीअडचणीच्या मार्गातून जावे लागते. यासाठी यातून मुक्तीचा मार्ग काय ? या करीता राज्यसरकार व मध्यवर्ती सरकारने कशा त्यांच्या अडचणी दूर कराव्यात ? या बाबत हे कमिशन शिफारशी करू शकते", अशा स्वरूपाचे घटनेच्या कलम ३४० मध्ये तरतूद आहे.

त्याच बरोबर घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतही कलम ५६ महत्त्वाचे असून त्यातही स्पष्ट अशी तरतूद आहे ती अशी ". The State Shall Promote with Special Care the Educational and economic interest of the 'Weaker Sections' of the People, and in Particular of Scheduld Castes and Scheduled Tribes and shall Protect them from social injustice and all forms of exploitation".

(राज्य सरकार हे समाजातील कमकुवत लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी विशेषत: शेडयुल्ड कास्टस् व शेडयुल्ड ट्राईब्ज जरूर ती अधिक काळजी घेईल; व त्यांना सामाजिक अन्याय व इतर प्रकारच्या पिळवणुकीपासून संपूर्ण संरक्षण देईल.)

वरीलप्रमाणे थोडक्यात दलितांच्या शैक्षणिक प्रश्नाची वाटचाल झालेली आहे.

मुंबई राज्याचे नवे धोरण

मंबई सरकारने मागासलेल्या वर्गाच्या शैक्षणिक सवलतीच्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारांत न घेता एकदम आपले धोरण जाहीर केले व नव्या धोरणाने बौद्धांच्या शैक्षणिक प्रगतीत एकदम अडथळा निर्माण झाला आहे.

"या वर्षापासून मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सवलती, विद्यार्थी मागासलेल्या वर्गाचा आहे किंवा नाही, हे ठरविण्याची कसोटी ती बदलली आहे. सरकारच्या नवीन धोरणा प्रमाणे ज्यांचे वार्षिक उत्पन्न ९०० रुपयांच्या वर आहे (रु. नऊशे) अशा व्यक्तिला मागासलेल्या वर्गाचा मानता येणार नाही. त्यामुळे जरी त्यांचा समाज पिढ्यानपिढ्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक दृष्टया मागासलेला असला तरीही त्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती व फायदे मिळणार नाहीत.

या धोरणाचा बौद्धावर परिणाम

सरकारच्या या नव्या धोरणाचा बौद्धजनांवर घातकी परिणाम झाला आहे. कारण पूर्वी मागासलेल्या वर्गांना ज्या सवलती मिळत त्या बौद्धांनाही मिळत असत. मग त्याला वार्षिक उत्पन्नाची अट नव्हती. परंतु नव्या धोरणामुळे ज्या बौद्धजनाचे उत्पन्न ९०० रुपयापेक्षा अधिक असेल त्यांना सवलती मिळणार नाहीत. त्यामुळे नोकरी करीत असलेल्या बौद्धांच्या मुलांना नव्या योजनेचा फायदा न मिळता त्यांच्यावर उलट घातकी परिणाम होणार आहे त्यामुळे त्यांच्या प्रगतीत अडथळा निर्माण होईल.

बौद्धही आर्थिक दृष्टीने मागासलेले आहेत

पूर्वाश्रमींचे अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला तरी ते आजही सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने मागासलेले आहेत. घटनेच्या कलम ४६ प्रमाणेच बौद्ध हा समाजातील शैक्षणिक, आर्थिक दृष्टीने विकर सेक्शन आहे. बौद्धांची अजूनही शैक्षणिक व आर्थिक प्रगती झालेली नाही. केवळ पूर्वाश्रमींच्या अस्पृश्यांनी बौद्ध धर्म दीक्षा घेतल्याबरोबर त्यांच्या परिस्थितीत रातोरात फरक पडत नाहीत. त्यामुळे सरकारच्या नव्या धोरणाच्या अमंलबजावणीमुळे बौद्धांच्या शैक्षणिक प्रगतिवर घाला येईल.

बौद्ध धर्माचा स्वीकार करून समाज संस्कृतीवरील डाग नष्ट केला

वास्तविक खऱ्या अर्थाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून या देशातील समाज संस्कृतीवरील अस्पृश्यतेचा डाग नष्ट करून आज बौद्धांनी या देशावर मोठे उपकार करून, मोठे राष्ट्रीय कार्य केले आहे; ही महत्त्वाची गोष्ट विशेषतः आमच्या सरकारने ध्यानात घेतली पाहिजे; व त्या दृष्टीने आजच्या बौद्धास त्यांच्या या राष्ट्रीय कार्याबद्दल त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक सवलती काढून न घेता त्या अधिक स्वरूपात द्यावयास पाहिजे होत्या. त्यात वार्षिक उत्पन्नाची अट वगैरे काहीही त्यांच्या मार्गात आणावयास नको होते. या दृष्टीने विचार केला तर बौद्धांच्या सवलती चालू ठेवणे सरकारच्या ही एक अवश्य कर्तव्याचीच गोष्ट आहे.

सवलती मिळवण्यामागील मूलभूत हेतू

शैक्षणिक, आर्थिक सवलती मिळविण्याच्या मागील मूलभूत हेतू काय याची आपल्याला दिलेल्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवरून कल्पना येईल. स्टार्ट कमिटी, पुणे करारातील मागणी, शे. का. फे. चे ठराव, घटनेतील सवलती व मार्गदर्शक तत्त्वे यातील मूलभूत गोष्टी पाहिल्यानंतर त्यातून एकच तत्त्व दृष्टीस पडेल की, शैक्षणिक व आर्थिक सवलतीची मागणी करण्यामागील हेतू व या मागणीस मान्यता देण्यामागील हेतू हा अस्पृश्याचा नसून, हा वर्ग समाजातील शैक्षणिक व आर्थिक दृष्टीने अतिशय मागासलेला असून, त्याला त्याची प्रगती इतर जमाती बरोबर करून घेण्यासाठी, या सवलती देऊन संधी दिली पाहिजे व इतर वर्गाबरोबर समान पातळीत आणले पाहिजे, याच मूलभूत विचारसरणीतून सवलती दिल्या आहेत. व त्या दृष्टीनेच घटनेच्या कलम ४६ व कलम ३४० मध्ये डॉ. बाबासाहेबांनी त्याची नोंदही करून ठेवली आहे. सवलती मागण्याच्या व त्या मिळविण्याच्यामागील हा विचाराचा मूलभूत दृष्टीकोण ठेवूनच सरकारने या मागासलेल्या समाजास इतर समाजाबरोबर समपातळीत आणण्यासाठी त्यांना शैक्षणिक व आर्थिक सवलती ज्या मिळत होत्या त्या चाल ठेवल्या पाहिजेत.

योजनांचे युग

आजचे युग योजनांचे आहे. आपल्याही देशात सरकारने दोन पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करून तिसरी योजना जाहीर केली आहे. या योजनेचाही मूलभूत हेतू हाच आहे की सर्व समाजाची सर्व दृष्टीने प्रगती घडवून आणून त्याच बरोबर देशाची प्रगती करणे, या योजनेमुळे समाजातील आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने जे कमजोर वर्ग असतात, अशांना या योजनेमुळे एक प्रकारची आपली प्रगती करून घेण्याची संधी मिळते व त्यातूनच ते वर्ग आपली प्रगती करून घेतात. या दृष्टीकोणातून जरी विचार केला तरी बौद्ध समाजास त्याच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा घालविण्यासाठी पंचवार्षिक योजनांत संधी पाहिजे. म्हणजे हा वर्ग त्या संधीचा फायदा घेऊन इतर वर्गांची बरोबरी हा वर्ग शैक्षणिक व आर्थिक बाबतीत करील. जो पर्यंत या बाबतीत या वर्गाची प्रगती होणार नाही. तो पर्यंत या योजनांचा मूलभूत हेतू साध्य झाला असा होणार नाही. याही कारणाचा विचार केला असता बौद्धांच्या सवलती चालू ठेवणे भाग आहे.

तरी सरकारने सवलती मिळविण्याच्या मागील मूलभूत दृष्टीकोण विचारप्रणाली विचारात घेऊन बौद्धांच्या शैक्षणिक व आर्थिक सवलती चालू ठेवाव्यात

जर सरकार या मूलभूत दृष्टीकोणाचा विचार न करता आपले आजचे धोरण तसेच चालू करून बौद्धांच्या चालू मागणीत खीळ घालील, तर मात्र या बौद्धवर्गाला सवलती मिळविण्याच्या मागील मूलभूत हेतू काय आहे, जाहीरपणे सांगण्यासाठी; व ते तत्त्व सरकारने मान्य करावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष श्री. यशवंतराव आंबेडकर यांनी दि. १७-७-५९ रोजी पुणे येथील जाहीर सभेत जाहीरकेल्या प्रमाणे शांततामय घटनाबद्ध लोकशाहीच्या मार्गाने लढा द्यावा लागेल. सरकारने हा प्रसंग आणू देऊ नये हेच आम्ही सुचवितो.

शंकरराव खरात
१ ऑगस्ट १९५९

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड
चेअरमन
आर. डी. भंडारे
बी. पी. मौर्य
घनश्याम तळवटकर

**

१४

स्वातंत्र्यांतील अधोगती

(दिनांक १५ ऑगस्ट १९५९)

स्वातंत्र्य कालांतील एक तप

भारताला स्वातंत्र्य मिळून १५ ऑगस्ट १९५९ ला एक तप पुरे झाले. पण गेल्या बारा वर्षांत जनता कल्याणाच्या दृष्टीने आढावा घेतला तर परिस्थिती निराशाजनक दिसते. स्वातंत्र्याच्या एक तपाच्या काळातही या देशातील सर्व सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न सुटले नाही. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा आजही भागल्या नाहीत. या देशातील शेकडा सत्तर टक्के जनतेला आजही पुरेसे पोटभर अन्न खावयास मिळत नाही, अंगाला अंगभर वस्त्र मिळत नाही व राहवयास नीट निवारा नाही. अजून सर्व सामान्य जनांच्या या मूलभूत गरजा पुऱ्या झाल्या नाहीत, या उलट आर्थिक समस्या अधिकच वाढत असून सर्व सामान्य जनतेचे आर्थिक प्रश्न वाढत आहेत. त्यामुळे जनतेचे सर्व जीवनच अस्थिर होत चालले आहे.

त्याच बरोबर सामाजिक समस्याही वाढत आहेत. या देशातील जातीय पद्धतीच्या पायावर आधारलेली समाजरचना नष्ट करून त्या ठिकाणी समता, बंधुता, स्वतंत्रता व न्याय या तत्त्वावर आधारलेली नवी समाजरचना अजूनही होत नाही. आपल्या देशातील या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने अधिकार रूढ सरकारची पावले योग्य दिशेने पडलेली नाहीत. त्याच बरोबर सरकारच्या कार्याची गती ही मंद आहे. त्यामुळे सर्व सामान्य जनतेचे जीवन दिवसानुदिवस अतिशय अवघड होत चालले आहे.

गोरे गेले आणि काळे आले

आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य काळात देशात फरक यावयास पाहिजे होता पारतंत्र्यात देशाची सत्ता जी मूठभर लोकांच्या हाती होती, ती सत्ता स्वातंत्र्याच्या काळात जनतेच्या हातात यावयास पाहिजे होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. फक्त गोरे राज्यकर्ते गेले आणि सत्ते-साठी हापापलेले त्यांच्या जागी मूठभर काळे राज्यकर्ते आले. याशिवाय दुसरा फरक झालेला दिसत नाही. अशी मात्र अपेक्षा असते की, स्वातंत्र्यात सर्व सामान्य जनतेला सुखासमाधानाचे दिवस येतात. जनतेच्या मूलभूत गरजा भागून, त्यांचे राहणी, जीवनमान वाढते व उत्तरोत्तर व्यक्तीची उन्नती व विकास होतो. त्याबरोबर समाजाची सामुदायिक प्रगती होते. व्यक्ति व समाजाचा विकास व प्रगती होणे. परंतु आज कोणत्याच व्यक्तीची व्यक्तीगत कसलीच प्रगती झालेली नाही. उलट त्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक आर्थिक आपत्त्या येऊन त्यांचे जीवन अधोगतीप्रत चालले आहे. त्याच बरोबर समाजाची प्रगती व राष्ट्राचा उत्कर्ष न होता परिस्थिती मात्र उलटीच झालेली दिसते की, या देशातील मूठ-भर दहा टक्के श्रीमंत लोक अधिकच श्रीमंत झाले. सत्तेसाठी हापापल्या वरिष्ठांच्या हातात सत्ता आली. बहुसंख्य पोटावर पाय देऊन आपले पोट भरण्यासाठी, मोठे भांडवलदार, धनिकांनी काळा बाजार, सट्टा बाजार सुरू केला. धनिक भांडवलदा-च्या सावलीत जगणारे त्याचे हस्तक, सत्ताधिकारी यांच्या दारी-दरबारी लाच-लुचपत, वशीलेबाजी बोकाळली आहे. या सर्वांचा परिणाम असा झाला व होत आहे की, श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. गरीब अधिकच गरीब होत आहेत. पैशाच्या, वशिल्याच्या बळावर पैशावाल्यांची कामे होऊ लागली. मात्र गोरगरीब सामान्य गरजवंत जनतेची कसलीच कामे न होता, त्यांना वनवासाचे दिवस येऊ लागले. स्वातंत्र्याच्या काळातही जनतेचे जीवन अधिकच बिकट होऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला धोक्याचा इशारा

घटनेच्या समारोपाचे भाषण करताना डॉ. बाबासाहेबांनी या देशाला विशेषत: या देशातील विचारवंत राजकारणी व सत्ताधिशांना स्पष्टपणे धोक्याचा इशारा दिलेला आहे की, "घटनेने या देशात राजकीय समानता निर्माण झाली आहे परंतु जो पर्यंत या देशात आर्थिक विषमता व सामाजिक विषमता आहे, तो पर्यंत घटनेप्रमाणे उभा केलेला हा लोकशाहीचा डोलारा कोसळून कधी धूळीस

मिळेल हे सांगता येणार नाही. '

डॉ. बाबासाहेबांनी देशातील समाजरचना पाहून पुढे येणाऱ्या संभाव्य धोक्याचा इशारा स्पष्टपणे आपल्या भाषणात दिलेला आहे. यावरून या देशात आर्थिक समता व सामाजिक समता निर्माण झाली नाही, तर या देशातील घटनाबद्ध लोकशाहीचे अस्तित्व नष्ट पावेल. वास्तविक स्वतंत्र्यानंतरच्या काळात राज्यकर्त्या सत्ताधिकाऱ्यांनी आपल्या ध्यानीमनी सतत डोळ्यापुढे हा डॉ. बाबासाहेबांनी दिलेला धोक्याच्या इशारा ठेवूनच आपली पाऊले टाकावयास पाहिजे. परंतु त्या प्रमाणे राज्यकर्त्याच्याकडून प्रत्यक्षपणेच काहीच घडत नाही. या उलट गेल्या बारा वर्षाच्या काळात आर्थिक समानता निर्माण न होता आर्थिक विषमता अधिकच वाढली आहे. आपल्या देशात वर्षानुवर्षे बेकारी झपाट्याने वाढत आहे त्याचबरोबर लोकसंख्येची भरमसाठ वाढ होत आहे. बेकारीला आळा घालण्याच्या दृष्टीने सरकारने योग्य असे कोणतेच उपाय केलेले नाहीत. त्यांचाच परिणाम बेकारीचा राक्षस अधिकच बलवत्तर होत चालला आहे.

लोकसंख्येची वाढ ज्या प्रमाणात झपाट्याने होत आहे, त्या प्रमाणात अन्नधान्याचें उत्पादन होत नाही. या उलट अन्नधान्याचा प्रश्न अधिकच बिकट होत चालला आहे. कोट्यावधी रूपयांचे धान्य आजही परदेशातून आयात केले जाते. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण न होता हा प्रश्न अधिकच अवघड होत चालला आहे. बेकारी, लोकसंख्येची वाढ, अन्नधान्याचा प्रश्न यातच दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचीही भरमसाठ भाववाढ होत आहे. या भाववाढीच्या महागाईत आज गोरगरीब व सामान्य जनतेने मरावे का जगावे असाच प्रश्न त्यांच्या पुढे दत्त म्हणून उभा आहे. अशातच भांडवलदारांनी त्याच्या थैल्या बचावासाठी ठिकठिकाणी केलेली गिरण्या, कारखान्यांची टाळेबंदी यामुळे कामगाराच्या जीवनावर नवेच संकट आलेले आहे

या सर्व गोष्टीचा परिणाम नव्वद टक्के गोरगरीब व सामान्य जनतेवर भयंकर स्वरूपाचा होऊन त्यांचे जीवन दारिद्र्याने विस्कटून कायमचे अस्थिर होईल. त्यामुळे या देशातील घटनेने निर्माण झालेल्या नव -लोकशाहीला धोका निर्माण झालेला आहे. खरीखुरी सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने अजूनही सत्ताधिश सरकारची पाऊले योग्य दिशेने पडलेली नाहीत. विषम जाती-जातीची समाजरचना आजही खेडोपाडी आहे. ज्या ग्राम व्यवस्थेमुळे हिंदू समाज व्यवस्था अधोगतीला गेली तीच ग्राम व्यवस्था टिकवून धरण्याचे विचार व योजना

सरकार करीत आहे. जुनी ग्राम व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी म. गांधींचे एक वारस विनोबा भावे रात्रंदिवस प्रयत्न करीत असून, जयप्रकाश नारायणही त्यांच्याच पावलावर पाऊल टाकीत आहेत. या देशविधायक, विचार योजनाना सर्वोदयवादी, मूलोद्योगी शिक्षणवादी विचार प्रचारकांची साथ मिळत आहे याचा परिणाम राज्य कर्त्यावर होऊन, तेही त्याच चुकीच्या दिशेने पाऊल टाकीत आहेत. या सर्व गोष्टीचा परिणाम या देशातील विषम जातींची समाज पद्धती नष्ट न होता, नवीन पद्धतीची सामाजिक विषमता निर्माण होईल.

बौद्ध व भूमीहीनांचे नवे प्रश्न

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या पाच लाख अनुयायासह बौद्ध धर्म दीक्षा घेतल्यापासून या देशात बौद्ध धर्म क्रांतीला सुरुवात झालेली आहे. हिंदी संस्कृतीवरील कलंक बौद्ध धर्म स्वीकाराने नष्ट होत चालेला आहे. या क्रांतीच्या वाटेने भारतातील अस्पृश्य समाज चालला आहे. याच मार्गाने भारतात सामाजिक समता निर्माण होणार आहे. ही सत्य वस्तुस्थिती असता बौद्धांच्या या क्रांतीकार्याच्या मार्गात एका दिशेने सरकार व दुसऱ्या दिशेने सवर्ण लोक अडथळे आणीत आहेत. बौद्धांच्या प्रगतीला पोषक अशा ज्या सवलती त्या सरकार एका बाजूने बंद करीत आहे व तर सवर्ण हिंदू खेडोपाडी बौद्धांच्यावर सामाजिक अन्याय करीत आहेत. त्यामुळे खेडोपाडी बौद्धांचे जीवन संकटात आहे. त्या दृष्टीने बौद्धांचे जीवन स्वतंत्र करून त्यांना त्याची उन्नती करून घेण्यासाठी सरकारने अधिकच सवलती देण्याची अत्यावश्यकता आहे. पण या बाबतीत आज सरकारची उलटीच पाऊले दिसतात.

भूमीहीनांचा प्रश्नही या देशापुढे आला आहे. शेतीचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने कुळकायदे केले. आवडी येथे समाजवादी समाजरजनेचा ठरावही भारतीय काँग्रेसने केला. त्यानंतर यातून काहीच निर्माण झाले नाही. म्हणून नागपूर येथे काँग्रेसने सहकारी शेतीचा ठराव करून शेती सुधारणासाठी नवीन योजना पुढे आणली परंतु या सर्वच योजना ठरावापासून कसेल त्याची जमीन हे तत्त्व मान्य केले तरी नसेल त्याचें काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. त्यामुळे भूमीहीनांचा प्रश्न तसाच पडून रहात आहे म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या औरंगाबाद अधिवेशनात पक्षाने क्रांतीकारक ठराव पास करून सर्व जमिनी सरकारनेच ताब्यात घ्याव्यात असा ठराव केला; व त्या ठरावाने भूमीहीनांचा प्रश्न सुटणार आहे. सरकार या ठरावाप्रमाणे कसलेच पाऊल टाकावयास तयार दिसत

नाही आणि दुसऱ्या बाजूने भूमीहीनांचा आर्थिक प्रश्नही बिकट होत चालला म्हणून रिपब्लिकन पक्षाच्यावतीने भूमीहीनांचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारी जमिनी शेतीसाठी कब्जे घेण्याचा शांततामय लढा खानदेशात सुरु केला आहे. हा भूमीहीनांचा प्रश्न सुटणे देशहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

पंचवार्षिक योजनांनी मूलभूत प्रश्न सुटले नाहीत

पंचवार्षिक योजनेद्वारे देशाची प्रगती करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने दोन पंचवार्षिक योजना अंमलात आणल्या परंतु या योजनांच्या नऊ वर्षाच्या काळात व उधृत केलेले असे मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. हे प्रश्न सोडविण्यासाठी योजनेत योग्यार्थाने ज्या प्रमाणात तरतुदी असावयास पाहिजे होत्या त्या नाहीत, त्यामुळे हे मूलभूत प्रश्न तसेच पडून आहेत. आता तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची बोल-बाल चालू झाली आहे. निदान योजनेत बेकारी, अन्नधान्य, महागाई, दारिद्र्य बौद्ध व भूमीहीनांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने योग्य त्या तरतुदी असल्या पाहिजेत. म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पाच वर्षांच्या काळात जनतेचे मूलभूत प्रश्न सुटण्याची आशा निर्माण होईल. जर का तिसऱ्या पंचवार्षिक योजनेने या देशातील जनतेचे प्रश्न सुटले नाहीत तर मग डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्याकडे आम्ही अधिच सत्ताधिकारी सरकारचे लक्षवेधून सरकारला वेळी सावध करतो. नाहीतर या देशातील नव-लोकशाहीवर आपत्ती ओढवेल.

शंकरराव खरात
१५ ऑगस्ट १९५९

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. पी. मौर्य
घनश्याम तळवटकर



१५

प्रजासत्ताक दिन

(दि. २३ जानेवारी १९६०)

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्याला एक तप उलटून गेले. माणूस आपले इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी तपश्चर्येला बसला तर त्याचे इच्छित बारा वर्षात साध्य होते असे म्हणतात. पण भारताला स्वातंत्र्य मिळून बारा वर्षांचा कालावधी लोटला तरी भारताची घडी कोणत्याच दृष्टीने नीट बसली नाही. या उलट ती अधिकच विस्कटण्याच्या मार्गावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला लोकशाहीं पद्धतीची घटना तयार करून दिली. ही भारतीय घटना २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आली. या २६ जानेवारीला दहा वर्षांचा काल संपेल.

भारतीय घटनेचा ध्येयवाद

घटनेचा प्रस्ताव (प्रिअॅम्बल) मध्ये डॉ. बाबासाहेबांनी अमूल्य अशी तत्त्वप्रणाली नोंद केलेली आहे ती अशी –

"आम्ही भारतातील लोक प्रतिज्ञापूर्वक असे ठरवितो की भारत हे स्वतंत्र सार्वभौम लोकसत्ताक (प्रजासत्ताक) राष्ट्र राहील आणि त्यातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, भाषण, मत व धार्मिक स्वातंत्र्य संधी व सामाजिक प्रतिष्ठा व समता ; व्यक्ति स्वातंत्र्य व राष्ट्रैक्य साधणारा बंधुभाव ; या गोष्टी मिळवून देण्यासाठी झटू." याप्रमाणे भारतीय घटनेच्या उपोद्घातात (प्रिअॅम्बल मध्ये) भारतापुढील ध्येयवाद नोंद केलेला आहे. अर्थात हा ध्येयवाद उच्च आहे आणि त्या दिशेने भारतीयांची विशेषत: राज्य कर्त्यांची व सत्ताधारी पक्षाची पाऊले पडली पाहिजेत आणि त्याप्रमाणे सामान्य नागरिकांची आशा व श्रद्धा आहे. परंतु ही तत्त्वे अंमलात आणण्यासाठी सत्ताधारी

पक्षाने प्रयत्न केले का? हाच मोठा प्रश्न आपल्यापुढे आहे. निदान त्या दिशेने वाटचाल तरी चालू आहे का? असाही प्रश्न निर्माण होतो. घटनेच्या समारोपाचे भाषण करताना घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेवटी सर्व भारतीय जाणकारांना, राज्यकर्ते यांना व सर्व विचारवंत भारतीयांना स्पष्टपणे बजावून सांगितले आहे की, 'भारतात घटनेने राजकीय समानता निर्माण झाली आहे.' परंतु या देशात जो पर्यंत आर्थिक व सामाजिक समता निर्माण होणार नाही तो पर्यंत आपण उभा केलेला लोकशाहीचा हा इमला कधी कोसळून पडेल हे सांगता येणार नाही. त्याच प्रमाणे डॉ. बाबासाहेब आपल्या त्याच भाषणात म्हणाले आहेत की, 'कलावंताने त्यांच्या अंगाच्या कला-गुणांनी उत्तम मंदीर निर्माण केले व त्यात सुंदर मुर्ती बसविली पण त्या मुर्तीची पूजा करणाऱ्या पुजाऱ्याच्या गुणधर्मावरच त्या मंदीराचे काय ते पावित्र्य ठरणार आहे.'

यावरून पाहता डॉ. बाबासाहेबांनी तयार केलेली घटना कितीही श्रेष्ठ प्रतिची असली तरी ती घटना राबविणारे कोणत्या प्रतिचे, गुणधर्माचे आहेत, त्यावर त्या घटनेचे श्रेष्ठत्व व मोठेपणा अवलंबून असते. या दृष्टीने गेल्या दहा वर्षाच्या कालाचे आपण मूल्यमापन केले तर भारतीयांच्या पदरी निराशाच पडली आहे असे चित्र आपल्याला दिसेल.

ध्येयवाद कागदोपत्री मान्य पण प्रत्यक्षात काय?

'भारतीय सरकारला समाजवादी – समाजरचना स्थापन करावयाची आहे. लोककल्याणकारी राज्य निर्माण करावयाचे आहे. यासाठी पुनर्घटना केली पाहिजे.' याप्रमाणे ध्येयवाद कागदोपत्री मान्य केला पण प्रत्यक्षात काय? असा प्रश्न उभा राहतो. मुखात एक आणि पोटात दुसरे असाच प्रकार सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती सरकारचा आहे. देशाच्या पुनर्घटनेसाठी पंचवार्षिक योजनाच्या वावड्या उडत आहेत. नेत्रदीपक असा त्याचा प्रचारही सरकारी मुखातून चालू आहे. पण समाज कल्याण साधण्याच्या दृष्टीने त्यातून काय निष्पन्न झाले? याचाही आढावा घेणे भाग आहे. सरकारी प्रचारी अहवालात मात्र सरकारी योजनाचे नगारे वाजविले जातात. मोठी धरणे पूर्ण झाली. पाटबंधारे सुरू झाले, कारखाने उभारले, हजारो एकर जमीन पाण्याखाली आणली, विज निर्माण केली, शेती व्यापार यांचा विकास झाला, अशा प्रकारे सरकारी अहवालात बोलबाला केला जातो. पण आज दैनंदिन जीवनात वस्तुस्थिती वेगळीच दिसते. सालोसाल अन्नधान्याची तुट येते, ती भरून काढण्यासाठी कोट्यावधी रुपयांचे धान्य परदेशा-

तून आणावे लागते. सालोसाल आपल्याला परदेशाच्या तोंडाकडे अन्नधान्यासाठी पाहावे लागते. जे बाजारात आहे त्या अन्नधान्याचे व जीवनोपयोगी वस्तूंचे भरमसाठ भाव वाढले आहेत. भारतातील सामान्य जनतेला भाववाढीचे अन्नधान्य व जीवनातील गरजेच्या वस्तू घेणे अवघडच काय पण अशक्य होऊन बसले आहे. रोजच बाजारात चढत्या कमानीने भाव वाढतात. पण व्यक्तिगत उत्पन्न मात्र वाढत नाही. उलट बेकारीच्या भयंकर वाढीने चरितार्थासाठी उत्पादनाचे साधनच नाही. त्यामुळे दैनंदिन पोटापाण्यासाठी कोठून व कसे अन्नधान्य घेणार ? त्यामुळे कुटुंबेच्या कुटुंबे भूकबळी पडतात. भूकबळी पडण्याच्या दारात असतात. रोजच भूकबळी पडतात पण त्यांची भूकबळी म्हणून नोंद होत नाही. यासाठी सरकार काय करते का? तर नाईलाजाने 'नाही' म्हणावे लागते. कारण गेल्या दहा-बारा वर्षातील सरकारची जमेची बाजू पाहिली असता, आपल्याला काहीच समाधानकारक दिसत नाही. फक्त सरकारी अहवाल, त्यातील आकडेवारी व मंत्र्यांची तोंडची भाषणे हीच काय ती जमेची बाजू पण प्रत्यक्षात जनता कल्याणाचे कसलीच फल निष्पती दिसत नाही. मजूरांची-कामगारांची परिस्थिती बिकट आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती कंगाल झाली आहे. मध्यम वर्ग या भेसूर परिस्थितीमुळे हवालदील झाला आहे. त्यामुळे समाजातील शेकडा दहा टक्के धनिक भांडवलदार श्रीमंताचा वर्ग सोडल्यास शेकडा नव्वद टक्के वर्गाचे दैनंदिन जीवन सुखी समाधानी करण्याच्या दिशेने गेल्या दहा बारा वर्षात सरकारने काही केले का? त्याचे उत्तरही निराशाजनक आहे.

सरकारने जनतेला विश्वासात घेतले नाही –

देशाच्या पूनर्घटनेचा प्रश्न हाती घेतल्यावर सरकारने आपल्याच काँग्रेस पक्षाच्या सल्ल्याने योजना आखल्या व पाऊले टाकली परंतु या योजना आखतांना जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सर्व पक्षाचा या कामी सल्ला विचार घ्यावयास पाहिजे होता. त्याच बरोबर निदान जनतेला तरी विश्वासात घेऊन आपली पाऊले टाकावयास पाहिजे होती. परंतु काँग्रेसचे सरकार व काँग्रेस पक्ष हा इतर पक्षाला तरी विसारलाच पण ज्यांच्यासाठी सगळे करावयाचे त्या जनतेलाही विसरला. त्यामुळे जनतेचा सरकारी पूनर्घटनेला जो पाठिंबा मिळावयास पाहिजे होता तो मिळाला नाही. जनतेचे सहकार्य मिळाले नाही. ज्या ज्या देशात नेत्रदीपक अशा पूनर्घटना झाल्या त्या त्या देशातील जनतेने अशा कल्याणकारी व राष्ट्र उद्धारक योजनासाठी तन-मन-धन अर्पण केले आणि योजना यशस्वी करण्यासाठी सर्व-

स्वाचा त्याग करण्याची भूमिका घेतली पण नेमकी हीच गोष्ट आपल्या सरकारनें केली नाही.

धनिकांची संपत्ती वाढली –

योजनाच्या पूर्ततेसाठी जनतेचे श्रम व धनिकांची संपत्ती याचा उपयोग करावयाचा असतो. श्रीमंताच्या धनांचा उपयोग अशा कार्याला केल्याशिवाय समाजवादी रचना कशी काय अंमलात येणार? या दृष्टीने विचार करता गेल्या दहा बारा वर्षाच्या काळात काय घडले? सरकारने तर श्रीमंतीच्या धनांचा समाज कल्याण कार्यासाठी विचार केला नाहीच नाही पण उलट धनिक हे अधिकच धनिक बनले आणि त्यांच्या धनांचा उपयोग त्यांच्या माडया-हवेल्या उभारण्यासाठी व ऐषारामी जीवन सजविण्यासाठी झाला. मजूरांना, कामगारांना, श्रमिक आपल्या श्रमशक्तीचा उपयोग देशाच्या पूनर्घटनेसाठी केला पण त्यांच्या पदरात काय पटले? ते मुळचेच धनाने गरीब, ते अधिकच गरीब झाले आणि त्याना उपसमारीला तोंड द्यावे लागत आहे. असे हे उलट चित्र आपल्याला आपल्या देशात दिसते. यासाठी परिस्थितीत पालट करण्यासाठी सरकारने काही केले का? नाही, असेच उत्तर द्यावे लागणार आहे. त्याचे कारण सरळ आहे. काँग्रेस ही भांडवलदार, जमीनदार, कारखानदार यांचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था आहे. ती भांडवलाच्या पैशावर जगते व पोसते त्यामुळे ती धनिकांच्या पैशांचा निचरा कशी काय करणार? याशिवाय गेल्या दहा–बारा वर्षाच्या काळात देशात अनेक समस्या निर्माण झाल्या. बेकारी, भाववाढ, अन्नधान्याचा प्रश्न या प्रश्नातच वशिलेबाजी, लाचलुचपत, काळाबाजार, सट्टेबाजार यांचा भयंकर रोग भारताच्या दैनंदिन जीवनाला लागलेला आहे. उलट या रोगाचे भरघोस पीक भारत देशांत प्रांतोप्रांती, शहरी, खेडयात दिसते आणि त्याची वाढ झपाटयाने रोजच होत आहे. अशा या समाज घातकी व राष्ट्र घातकी रोगांचा जोर रोजच वाढत असतांना आपले सरकार काय करते? असा प्रश्न उभा राहतो. परंतु आपले सरकार अशा प्रश्नाकडे डोळस असून आंधळयाचे सोंग आणते व चांगले कानाळू असून बहिऱ्याचे रूप घेते. सर चिंतामणराव देशमुख यांचे आजचे म्हणणे व त्याच प्रमाणे श्री हणमंतय्या यांचा अधिकृत रिपोर्ट व त्याच प्रमाणे गोरवाला अशा तज्ञांची मते पाहिली असता. या समाज घातकी व राष्ट्र विनाशक रोगाची आग या देशाला लागली आहे. हे कोणासही नाकारून चालणार नाही. मग काँग्रेसचे सरकार गप्प का? सरकार या रोगाचे उच्चाटन करण्याच्या दिशेने का पाऊले टाकीत नाही याचा विचार केला असता सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्याकडून, प्रतिनिधीकडूनच या रोगाला प्रोत्साहन

दिले जाते. पक्षाचे कार्यकर्त्यांना, प्रवक्त्यांना संरक्षण द्यावे का? समाजकल्याण, राष्ट्र कल्याण करावे? असा प्रश्न त्याचे पुढे उभा राहतो. त्यावेळी मात्र सत्ताधारी पक्षाची वृत्ती आपल्या पक्ष कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याकडेच वळते व त्यावेळी समाजकल्याण, राष्ट्रकल्याण याचा त्यांना विसर पडतो. याचा विचार केला तर आजचे सरकार समाजवादी समाजरचना कशी काय निर्माण करणार? कल्याणकारी समाज कसा काय निर्माण करणार? हे प्रश्न पाहून व गेल्या दहा-बारा वर्षांचा, कालावधी पाहिल्यावर पदरी निराशाच पडते.

निदान पाकिस्तानपासून तरी काही बाबतीत धडा घ्या –

शेवटी आम्हाला नाईलाजाने असे सुचवावेसे वाटते की, निदान काही बाबतीत पाकिस्तानपासून तरी धडा घ्या! पाकिस्तानची आजची मिलिटरी हुकूमशाही सोडा. पाकिस्तानची इतर धोरणे विचारात घेऊ नका. पण आजच्या हुकुमशहा फिल्ड मार्शल आयुबखानापासून नक्कीच समाज कल्याण व देशकल्याणासाठी काही गोष्टीचे अनुकरण करता येईल. फि. मा. आयुबखानाने देशातील लाचलुचपतीला झपाट्याने आळा घातला. इन्कमटॅक्स चुकविणाऱ्यांना भयंकर 'फाशीची' धमकी देऊन कोट्यावधी रुपयांचा बुडीत इन्कमटॅक्स वसूल केला. कायमचीच या बड्या भांडवलदारांना दशहत बसविली, सर्वच निर्वासितांना उत्तम घरे बांधून देऊन त्यांचा प्रश्न सोडविला. त्याच प्रमाणे पाकिस्तानातील भूमिहिनांना सरकारी पडित जमिनी देऊन भूमिहिनांचा प्रश्न सोडविला. आज पाकिस्तानाला सामान्य जनता फि. मा. आयुबखानाला दुवा देत आहे जेव्हा काळाबाजार, लाचलुचपत इन्कमटॅक्सच्या बाबतीत त्याने 'फाशीच्या शिक्षेचे' फर्मान काढले तेव्हांच हे सर्व समाज कंटक नम्र होऊन ठिकाणावर आले आणि आयुबखानाचा पुढचा मार्ग त्याने सुकर केला. निदान आपल्या भारतीय सरकारने आयुबखानाने थोड्या कालावधीत ज्या ज्या समाजकल्याण व राष्ट्रकल्याणाच्या गोष्टी केल्या त्या तरी कराव्या आणि ही पाऊले टाकतांना आयुबखानाच्या निर्धाराने टाका म्हणजे समाजात एकदम नवे चैतन्य निर्माण होईल पण या साठी गुळमट भाषा बंद केली पाहिजे. असलेले कायदे कडक रीतीने अंमलात आले पाहिजेत तरच ठिक होईल.

भारतीय लोकशाहीला धोका

यामुळेच भारतात आज अतिशय बिकट परिस्थिती आहे. सर्वसामान्य

ऐंशी टक्के जनतेच्या आशा, आकांक्षा, श्रद्धा नष्ट झाल्या आहेत. जनतेच्या वैफल्याची लाट पसरली असून त्यातून अराजक निर्माण होण्याची वेळ आली आहे. अशा वेळी भारत सरकारने व राज्य सरकारने वेळीच जनतेच्या मनाची नाडी पासून ओळखून आपली पाऊले टाकली पाहिजेत व जनतेचे जीवन सुखी केले पाहिजे आणि जर का सरकार आपले आहे तेच धोरण चालू ठेवील, तर मात्र जनतेचे सर्व दृष्टीने मरण ओढवेल आणि त्यातूनच भारतीय लोकशाहीला धोका निर्माण होईल. म्हणून याच वेळी व याच क्षणी जनतेचे खरेखुरे कल्याण त्यांना सुखी–समाधानी करण्याच्या दृष्टीने पाऊले टाकावीत केवळ उद्यांच्या २६ जानेवारीला मोठमोठ्या सरकारी भांडवलदारांच्या इमल्यावर विजेच्या बत्त्यांची रोषणाई करून जनतेच्या दैनंदिन जीवनांचा प्रश्न सुटणार नाही. इमारतीवरील रोषणाईने जनतेच्या पोटातील भूकेची आग थांबणार नाही. या वर्षातून एकदा होणाऱ्या विजेच्या बत्त्यांच्या रोषणाई ऐवजी जनतेच्या दैनदिन जीवनात सुखा समाधानाची रोषणाई झाली पाहिजे. तरच खरेखुरे समाज कल्याणकारी राज्य निर्माण होईल व भारतीय नव लोकशाहीचा धोका टळेल. हाच विचार भारत सरकारने या प्रजासत्ताक दिनी करावा असे आमचे आग्रहाचे म्हणणे आहे. नाही तर प्रजासत्ताक दिन हा काँग्रेसत्ताक दिन असेच जनता म्हणेल व मानील.

संपादक मंडळ
वी. के. गायकवाड
चेअरमन
आर. डी. भंडारे
बी. पी. मौर्य
घनःशाम तळवटकर

१६

बौद्ध धर्म हिंदू धर्माची शाखा नाही ; बौद्ध धर्म स्वतंत्र धर्म आहे

(दिनांक ३० जानेवारी १९६०)

भारताच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी दिनांक २६ जानेवारी रोजी नवभारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण पुणे येथील ससून हॉस्पीटल समोरील उद्यानात केले. या बद्दल आम्ही न्यायमूर्ती यांचे आभार मानतो.

न्यायमूर्ती प्र बा. गजेंद्रगडकर यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनाचे मूल्यमापन आपल्या अधिकार युक्त व न्यायबुद्धीच्या वाणीतून प्रभावीपणे केले. या बद्दल न्यायमूर्तींना आम्ही धन्यवाद देतो.

डॉ. बाबासाहेब यांच्या श्रेष्ठ गुणांचे मूल्यमापन करताना ते म्हणाले, – 'निपुण विद्यार्थी, विख्यात अर्थशास्त्रज्ञ, कर्तबगार व चतुर वकील, उत्तम दर्जाच्या न्यायमीमांसक, घटना पंडित आणि आंतरराष्ट्रीय कायदे पंडित, देशाच्या स्वातंत्र्यासाठी तळमळणारा देशभक्त, भारतीय घटनेसारखे ऐतिहासिक दस्तऐवजाचा प्रमुख कर्ता – शिल्पकार आणि देशातील दलितांचा खरा मित्र, तत्त्वज्ञान आणि मार्गदर्शक' अशा शब्दात डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे न्यायमूर्तींनी मूल्यमापन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश

डॉ बाबासाहेबांनी आपल्याला काय संदेश दिला या बद्दल बोलतांना म्हणाले, 'भारतातील बहुजन समाज आर्थिक व सामाजिक समतेचा अभिनिवेशी बनला आहे. पण सामाजिक समतेची प्रस्थापना सुलभ नाही. सामाजिक समता ही आर्थिक पायावर उभी असते. सामाजिक समता व आर्थिक समता परस्परांशी निगडीत आहेत, हे ओळखून महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी एका व्यासपीठावरुन या कार्यासाठी आपली शक्ती सर्वस्वपणाला लावली पाहिजे. सामाजिक परिवर्तन शीघ्रगतीने झाले नाही तर लोकशाही जीवन पद्धतीला धोका आहे. म्हणून येत्या पांच वर्षासाठी महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी राज्यात सामाजिक समता व आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठी आम्ही एकत्र येऊ अशी प्रतिज्ञा घ्यावयास हवी. या प्रश्नावर मतभेदाला जागा नाही. हाच डॉ बाबासाहेब यांचा आपल्याला संदेश आहे.' असे त्यांनी सांगितले.

या शिवाय त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनातील इतर महत्त्वाच्या गोष्टी सांगून त्यांनी अशी घोषणाच करून भारताला व भारत सरकारला आवाहन केले की, 'आपल्या देशात दलित वर्गाची सेवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. तशीच अमेरिकेतील दलित वर्गाची सेवा श्री. बुकर टी. वॉशिंग्टन यांनी केली. या बुकर टी वॉशिंग्टनचे एक राष्ट्रीय स्मारक अमेरिकन सरकारने उभे केले आहे. तशा प्रकारचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे एकादे राष्ट्रीय स्मारक केल्याशिवाय भारत सरकार राहणार नाही, असा मला विश्वास वाटतो.'

या प्रमाणे न्यायमूर्ती प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या बद्दल आपल्या भाषणात गौरवपर उद्‌गार काढले.

बौध्द धर्म हा स्वतंत्र धर्म आहे

न्यायमूर्ती बोलण्याच्या ओघात आपले विचार मांडत असतांना असेही म्हणाले की, बौद्ध धर्म ही हिंदू धर्माची एक शाखा आहे.

वास्तविक न्यायमूर्तींनी आपले हे मत मांडले. परंतु बौद्ध धर्म ही हिंदू-धर्माची मुळीच शाखा नसून बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म आहे. असे डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी अनेकवेळा जगापुढ भारतीयांच्या पुढे मांडलेले आहे. न्यायमूर्ती म्हणाले तशी मुळीच मूलभूत परिस्थिती नाही. बौद्धधर्माची मूलभूत तात्त्विक बैठक हिंदूधर्माहून सर्वस्वी वेगळी आहे. हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान व मूलाधार वेगळा आहे व बौद्धधर्माचे तत्त्वज्ञान व मूलाधार वेगळा आहे. त्यामुळे बौद्धधर्म ही हिंदूधर्माची शाखा आहे असे म्हणता येणार नाही आणि ते दोन्ही धर्माच्या तात्त्विक बैठकीचा अभ्यास करताना स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येते.

बौध्द धर्म व हिंदू धर्मातील मूलभूत तात्त्विक फरक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वेळा आपले विचार मांडताना बौद्ध धर्म व हिंदूधर्मातील मूलभूत तत्त्वज्ञानातील फरक सांगितलेला आहे. त्यावरून बौद्धधर्म हा स्वतंत्र तत्त्वज्ञानावर आधारलेला स्वतंत्र धर्म आहे हे जगातील विचारवंतापुढे मांडलेले आहे. हिंदूधर्म व बौद्धधर्मातील महत्त्वाचा तात्त्विक फरक पुढील प्रमाणे आहे आणि हा फरक डॉ. बाबासाहेब यांनी आपले विचार मांडताना अनेक वेळा प्रामुख्याने मांडला आहे.

१) बौद्ध धर्म वेदाला मुळीच मानीत नाही. पण हिंदूधर्म हा वेदाला प्रमाण व पूज्य मानतो.
२) बौद्ध धर्म ईश्वराला मुळीच मानीत नाही. परंतु हिंदू धर्म हा ईश्वर मानतो.
३) बौद्ध धर्म हा जातीय पद्धतीला मुळीच मानीत नाही. परंतु हिंदूधर्मच जातीय पद्धतीवर आधारलेला असून, जातीय पद्धत ही हिंदू धर्माचा मूलभूत पाया आधार आहे.

हाच मूलभूत फरक बौद्ध धर्म व हिंदूधर्म यातील आहे आणि हाच फरक प्रसिद्ध तत्त्वनेते विद्वान प्रो. मॅक्समुलर व त्याच प्रमाणे बौद्ध धर्मातील अधिकारवाणी पू. धर्म किर्ती यांना मान्य होता व त्याप्रमाणे त्यानी आपली मते त्यांच्या ग्रंथात मांडली आहे. याशिवाय हिंदू धर्म व बौद्ध धर्म यातील मूलभूत फरक अनेक बौद्ध विद्वानानी प्रामुख्याने मांडलेले आहेत.

वास्तविक वेद, ईश्वर व जाती पद्धती व प्रायःश्चित याला मान्यता दिल्या शिवाय हिंदू माणूस खरा हिंदू धर्मीय होऊच शकत नाही आणि याचा मूलभूत गोष्टीस बौद्ध-धर्मात कठोर विरोध असून ते बौद्ध धर्माला मान्य नाही. बौध्द धर्माला समता मान्य आहे. हिंदू धर्माला समता मान्य नाही. बौध धर्माला

बंधुता मान्य आहे. हिंदू धर्माला बंधुता मान्य नाही. बौद्ध धर्माला व्यक्तिस्वातंत्र्य मान्य आहे. हिंदू धर्माला व्यक्तिस्वातंत्र्य मान्य नाही. त्याच प्रमाणे बौद्ध धर्मात प्रज्ञा–शील–करुणा–प्रेम–न्याय–सत्य–अहिंसा अशा मानवी विकास पोषक अशा पवित्र तत्त्वांना स्थान आहे आणि नेमके याच तत्त्वांना हिंदू धर्मात स्थान नाही. या प्रमाणेही महत्त्वाचा तात्विक फरक बौद्ध व हिंदू धर्मात आहे.

या मूलभूत तत्त्वाचा फरक सोडल्यास बौद्ध धर्म व हिंदू धर्मात दैनंदिन जीवनातील फरक प्रामुख्याने नजरेस येतो. बौद्ध धर्माची संस्कृति वेगळी व हिंदू धर्माची संस्कृति वेगळी आहे. याचा बारकाईने तपशील देण्याची आवश्यकता नाही. या सर्वच गोष्टीचे अभ्यासूपणाने परिशीलन केले असता बौद्ध धर्म हा हिंदू धर्मापासून पूर्णतः वेगळा आहे हे कोणाही विचारवंताला मान्य करावे लागले. याच कारणांनी बौद्ध धर्म हा हिंदू धर्माची शाखा आहे असे म्हणता येणार नाही.

आज-काल हिंदू विद्वानांची विचार मांडण्याची पद्धत –

आजच्या नवयुगात विसाव्या शतकात जगापुढे 'युद्ध का बुद्ध' असे दोनच मार्ग जगातील विचारवंतापुढे आहेत व या पैकी भगवान बुद्धांचा मार्ग जगातील सर्व विचारवंताना पसंत आहे, हे त्यांच्या आजच्या विचारावरून व हालचालीवरून दिसते. भगवान बुद्धाचा मार्ग जगाला मानवाला तारणारा असून तोच जगाने अवलंबिला पाहजे हे आज मान्य झाले आहे. त्या मुळेच बौद्ध धर्मातील तत्त्वांचा प्रचार झपाट्याने जगात होत आहे. बौद्ध धर्म तत्त्वांच्या उत्कर्षाच्या या काळातील हिंदू विद्वानांचे मन जागे झाले आहे. पण त्यांचे जागे झालेले मन भगवान बुद्ध व त्याच्या धर्मासंबंधी विकृत पद्धतीने मांडतात. ते असे की, 'भगवान बुद्ध हा विष्णुचाच अवतार असून, हिंदू धर्मामधील हा आकरावा अवतार आहे. त्याच प्रमाणे भगवान बुद्ध सुधारणावादी होता व त्यांनी बौद्ध धर्म ही हिंदू धर्मातील एक सुधारणावादी पंथ–शाखा काढली पण तो हिंदू धर्माचाच भाग आहे. या प्रमाणे हिंदू विद्वान आपले मत अलीकडे मांडून भगवान बुद्ध व बौद्ध धर्म यांच्या मोठेपणाचा फायदा आपल्या पदरी घेत आहेत. वास्तविक हिंदू विद्वानांची ही विचार पद्धती सदोष असून ती विकृत स्वरुपाची आहे.

हिंदू धर्म व बौद्ध धर्म यातील तत्त्वज्ञानाचा, वैचारिक मूलभूत फरक काय आहे हे थोडक्यात वर नमूद केले आहेच. त्यावरून कोणाही विचारवंताला हे

मान्य करावे लागेल की, बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म असून तो हिंदू धर्माचा मूळ पोट भाग किंवा शाखा किंवा पंथ नाही. हिंदू विद्वान जर अट्टाहासाने आपली मते त्यांना पटतील अशी मांडू लागले तरी ती त्यांची मते बौद्ध धर्मीयांना मुळीच पटणार नाहीत, हेच त्यानी ध्यानात ठेवावे, एवढेच सांगावेसे वाटते.

संपादक मंडळ
वी. के. गायकवाड
आर. डी. भंडारे
बी. पी मौर्य
घनःशाम तळवटकर

**

१७

नव-महाराष्ट्रातील बौद्धांचा प्रश्न

(शनिवार दिनांक २३ एप्रिल १९६०)

१ मे १९६० पासून नव-महाराष्ट्र स्थापन होऊन मराठी भाषिकांचे राज्य होणार आहे. ही गोष्ट मराठी माणसाला आज तरी अत्यानंद देणारी वाटत आहे. मराठी व गुजराथी भाषिकांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध द्विभाषिक राज्य लादून मोठा अन्याय केला होता. प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा अन्याय निवारण्यासाठी प्रतिज्ञाच केली होती की, 'द्विभाषिक मोडण्यासाठी मी प्राणपणाने लढेन' डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिज्ञेला जागून रिपब्लिकन पक्षाने द्विभाषिक मोडण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती बरोबर सहकार्याच्या भावनेनें राहून द्विभाषिक मोडले व डॉ. बाबासाहेबांची प्रतिज्ञा पूर्ण केली. आज भीमशक्ती व शिवशक्ती यांच्या सयुक्त लढ्यातून महाराष्ट्राचा जन्म झाला हे कोणाही विचारवंताला मान्य करावे लागेल त्या दृष्टीने महाराष्ट्राच्या स्थापनेनं डॉ बाबासाहेब यांच्या जनतेच्या प्रचंड अशा भीमशक्तीचा फारच मोठा वाटा आहे अर्थात रणांगणावर लढण्यासाठी एक व त्याचा फायदा घेण्यासाठी दुसराच, अशी अवस्था उद्याच्या महाराष्ट्रात निर्माण होणार नाही, अशी रिपब्लिकन पक्षाची दृष्टी आहे. प्रत्यक्षात ज्यांनी तन-मन-धनाने महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी आपली शक्ती खर्च केली त्याला योग्य ते मानाचे स्थान महाराष्ट्रात राहील अशी आमची आशा आहे. त्या दृष्टीने विचार करता नव्या महाराष्ट्रातील समस्यांचा विचार करणे योग्य होणार आहे

नव-महाराष्ट्रातील समस्या

मराठी भाषिकांचा महाराष्ट्र निर्माण झाला ही आनंद क्षणिक न ठरता

ह आनंद चिरंजीव चिरकाल करणाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील जनतेचे मूलभूत प्रेम उद्याच्या नव महाराष्ट्रात सुटले पाहिजेत आणि महाराष्ट्रीय जनतेचा दैनंदिन जीवन संसार सर्व दृष्टीनी सर्व बाजूनी सुखी-समाधानाचा झाला पाहिजे हीच कोणाही सर्वसामान्य माणसाची आशा राहणार आहे. या दृष्टीने नवमहाराष्ट्राच्या प्रगतीची वाटचाल व्हावी असे प्रत्येकाला वाटते.

नव-महाराष्ट्रातील समस्या काय आहेत? हे सांगताना मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण मुंबई येथील अमरहिंद मंडळातील वार्षिक व्याख्यान मालेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना आपल्या भाषणात महाराष्ट्रापुढील समस्या सांगताना म्हणाले की, 'नव-महाराष्ट्रापुढील पहिला महान प्रश्न "मुंबई शहराचे आता काय होणार? ही जी चिंता अन्य प्रांतीयांना लागली आहे ती दूर करणे हा होय. . . . महाराष्ट्रापुढील दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'सामाजिक समता' एखाद्या खेड्यातील मराठा व हरिजनांच्या हातात घालून चावडीपासून घरांपर्यंत खुल्या दिलाने जाईल त्या दिवशी महाराष्ट्रापुढील सामाजिक समस्या सुटली असे मी म्हणेन.

महाराष्ट्रापुढील तिसरा महत्त्वाचा प्रश्न राजकीय आहे लोकशाहीत विरोधी पक्ष हवा तो बलवान हवा. महाराष्ट्रापुढील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न शेतीचा होय. आपल्याला सुधारलेली शेती पाहिजे व शेवटी ते म्हणाले, समतेच्या तत्त्वावर आधारलेली एक-जिनसी भारताच्या जीवनाशी समरस होणारा महाराष्ट्र आपणास पहावयास मिळेल अशी इच्छा मी व्यक्त करतो.

या प्रमाणे यशवंतराव चव्हाण यांनी नव-महाराष्ट्रापुढील समस्या मांडल्या जाणार आहेत. ना यशवंतराव चव्हाण हे उद्याच्या नव-महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार असल्याने सदर समस्यांना सरकार दरबारी व सरकारी दप्तरी महत्त्व येऊन, त्या दिशेने सरकारची पाऊले पडतील असे वाटते.

अमरहिंद मंडळात दुसऱ्याच दिवशी बोलताना सं. म. समितीचे सरचिटणीस आ. एस. एम्. जोशी यांनी त्यांच्या दृष्टीकोणातून नव-महाराष्ट्रापुढील समस्या सांगताना ते म्हणाले की, 'माझ्या कल्पनेप्रमाणे आपल्या पुढील मुख्य-समस्या आपल्या समाजाच्या पुनर्रचनेची आहे. - - - - - आर्थिक विषमतेबरोबर सामाजिक विषमतेमुळे आमचा समाज पोखरून निघाला आहे. जातीभेद नष्ट करून समतेवर आधारलेला एकजिनसी समाज आपण निर्माण केला पाहिजे.

श्री. एम. एम. जोशी यांचे आज महाराष्ट्रातील विशिष्ट स्थान पहाता त्यांच्याही विचाराला सरकार विरोधी पक्षापुढे स्थान होईल.

महाराष्ट्रातील या दोन मान्यवर व्यक्तीशिवाय महाराष्ट्रातील सर्वच विचारवंत आपल्या दृष्टीकोनातून नव–महाराष्ट्रापुढील समस्या काय आहेत? हे आपल्या लेखातून व भाषणातून मराठी जनतेपुढे मांडीत आहेत, व महाराष्ट्र स्थापन दिनी जे वृत्तपत्रांचे महाराष्ट्र विशेषांक निघणार आहेत, त्यातही यादृष्टीने अनेक विचारवंताचे विचार आपल्यापुढे येतील.

पण महाराष्ट्रातील संख्येने प्रचंड असलेल्या नवदीक्षीत बौद्ध समाजाच्या समस्या काय आहेत? व त्या कशा सोडविल्या पाहिजेत याचाही विचार होणे नव–महाराष्ट्राच्या दृष्टीने फारच अगत्य आहे.

नव–महाराष्ट्रापुढील बौद्ध समाजाचा प्रश्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे ता ३१ मे १९३६ या दिवशी इलाखा दलित परिषद 'अस्पृश्यता आणि धर्मांतर या विषयावर मार्गदर्शन करतांना महत्त्वाचे विचार मांडले तर ते असे 'माणुसकी प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. सामर्थ्य संपादन करावयाचे असेल तर धर्मांतर करा. स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर धर्मांतर करा. संसार सुखाचा करावयाचा असेल तर धर्मांतर करा – – – '

या विचाराला मानून व याच मार्गाने आपला उद्धार होणार आहे याच श्रद्धेने महाराष्ट्रातील बहुसंख्य दलित वर्गाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे, त्यामुळे आज नव महाराष्ट्राच्या पुढे बौद्ध समाजाचा नवा प्रश्न निर्माण झालेला असून त्या दृष्टीनेही बौद्ध समाजाच्या समस्या काय आहेत? व त्या कशा सोडविल्या पाहिजेत याच ही विचार यांनी करणे अगत्याचे आहे.'

बौद्धांचे सामाजिक व आर्थिक व धार्मिक प्रश्न

महाराष्ट्रात दलित समाजातील बहुसंख्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे बौद्धांचा दृष्टीने नवीनच एक सामाजिक व धार्मिक स्वरूपाचा प्रश्न महाराष्ट्रापुढे निर्माण झालेला आहे. या प्रश्नाचें स्वरूप प्रामुख्याने

खेडोपाडी दिसते. खेडयात जात, रुढी व परंपरेचें राज्य आजही आहे. नवयुगातील नवविचार, नव्या प्रेरणा अद्यापही खेडयांत दिसत नाही.

'आपल्या पायरीने वागले पाहिजे' याच विचाराला धरून वागण्याचा रूढीबद्ध दंडक खेडयापाडयांत आजही दिसतो. त्यामुळे सनातनी, प्रतिगामी व अज्ञ विचाराच्या ग्रामीण स्पृश्य वर्गाला आपल्याच गावच्या एका दलित समाजाने 'गावचा धर्म' सोडून बौद्ध धर्माचा स्वीकार केला ही गोष्ट सारखी खटकल्यामुळे सगळा स्पृश्य समाजच नवदीक्षीत बौद्ध समाजावर उलटला आहे व त्यातून बौद्ध समाजावर खेडोपाडी सारखे अन्याय, छळ, मारपीट व सामाजिक बहिष्काराचे सत्र चालू आहे या अन्यायांचा परिणाम बौद्धांच्या दैनंदिन जीवनावर भयंकर स्वरूपाचे होऊन, बौद्धांचे जीवन त्यामुळे अस्थिर बनत चालले आहे. स्पृश्य हिंदूच्या मनात बौद्धजनांच्या बद्दल द्वेष, मत्सर व शत्रूत्वाची भावना वाढीस लागत असून दोन वर्गात अविश्वासाचे वातावरण अधिकच वाढत आहे. त्याचा परिणाम खेडयात बौद्ध विरुद्ध हिंदू असे उघड उघड स्वरुप निर्माण होऊन दोन समाजात संघर्ष निर्माण होण्याचे वारंवार प्रसंग निर्माण होत आहेत. या संघर्षामुळेच बौद्धावर सामाजिक स्वरूपाच्या अन्यायाचे सत्र चालू झाले आहे. बौद्ध समाजावर नव महाराष्ट्रात असेच अन्यायाचे सत्र राहणे नव महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने मुळीच चांगली गोष्ट नाही. यासाठी बौद्धावर होणाऱ्या अन्यायातून या वर्गाला सामाजिक व धार्मिक संरक्षण देण्याच्या दृष्टीनेच विचारवंत आणि सरकार यांनी विचार करून पुढची पाऊले टाकली पाहिजेत व बौद्ध समाजाला सामाजिक व धार्मिक अन्यायातून मुक्त करण्यासाठी कायद्याचे संरक्षण दिले पाहिजे व असा कायद्याची प्रत्यक्षात जारीने अंमलबजावणी झाली पाहिजे. म्हणजेच बौद्धांना रोजच्या जीवनात हायसे वाटेल.

बौद्धांचा आर्थिक प्रश्न

बौध्द समाज मूळ आर्थिकदृष्टया अत्यंत गरीब आहे. खेडोपाडी हा समाज भूमिहीन मजूरांचे जीवन जगतो व शहरातही कामगारांचे जीणे जगतो. थोडक्यात बौद्ध समाजाला आर्थिक जीवनात मुळीच स्थैर्य नाही. यासाठी बौद्ध समाजच मूळ आर्थिक प्रश्न सोडवून बौद्धांना दैनंदिन जीवनात आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे.

बौद्ध समाजाच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी प्रामुख्याने खालील गोष्टी केल्या पाहिजेत.

१) बौद्धांना सर्व शैक्षणिक सवलती दिल्या पाहिजेत.
२) बौद्धांना सरकारी नोकरीतील सर्व सवलती दिल्या पाहिजे.
३) खेड्यापाड्यातील बौद्ध समाजाचे दैनंदिन आर्थिक जीवन सुधारण्यासाठी सरकारी पीकाबू पडीक जमीनीचे तातडीने वाटप करून या समाजाला दिले पाहिजे.

शेडयुल्ड कास्ट व शेडयुल्ड ट्राईब्ज यांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी घटनेने व इतर कायदे कानुनने त्यांना ज्याज्या सवलती मिळाल्या आहेत त्या त्या सर्व सवलती बौद्धांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी त्यांना दिल्या पाहिजेत. या प्रमाणे बौद्धांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी बौद्ध समाजाला या सर्व सवलती कायद्याने दिल्याने या वर्गाचे आर्थिक जीवन काही अंशी सुधारेल व यांच्या जीवनात बऱ्याच अंशी आर्थिक स्थैर्य येईल.

नव-महाराष्ट्रात बौद्धांच्या प्रश्नाकडे या दृष्टीने सरकारने व समाजाने पाहिले पाहिजे व बौद्धांचा प्रश्न सोडविण्यासाठी कायद्याचेच संरक्षण बौद्धांना दिले पाहिजे तरच नव-महाराष्ट्रात बौद्धांना सामाजिक, धार्मिक व आर्थिकदृष्ट्या सुरक्षितता वाटेल व महाराष्ट्राचे प्रगतीचे पाऊल पुढे चालेल.

संपादक मंडळ

बी. के. गायकवाड (चेअरमन) शंकरराव खरात
आर. डी. भंडारे
बी. पी. मौर्य
घन.शाम तळवटकर

१८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थोरपण सूर्यासारखे स्वयंभू आहे.

दिनांक १४ मे १९६०

दिनांक १ मे १९६० रोजी नव- महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आणि मराठी भाषीकांच्या 'मराठी वाक्य स्थापण करण्याच्या आशा सफल झाल्या' ता. ५ मे१९६० रोजी सकाळी नव-महाराष्ट्र राज्याच्या मंत्रांचा शपथ विधी पार पडला. शपथ विधीचा कार्यक्रम संपताच मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आपले पहिलेच भाषण केले. आणि या भाषणात मुख्यमंत्र्यानी नव-महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्रा पुढील प्रश्नासंबंधीचे थोडक्यात धोरणच जाहीर केल्या सारखे आहे. आणि या भाषणात जे धोरण जाहीर झाले त्याच धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने पाऊले पडतील अशी आशा धरावयास मुळीच हरकत नाही.

नव—महाराष्ट्रातील बौद्धजनांचा दिलासा

मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण आपल्या भाषणात महाराष्ट्रातील नव-दिक्षीत बौध्दजनांना आश्वासनाचा दिलासा देताना म्हणाले, लोक कोणत्या भागात राहात आहेत, त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्याचा धर्म कोणता आहे अशा विचारास थारा न देता सर्व वर्गाच्या व सर्व जातीच्या लोकांना समान न्याय व समान संधी प्राप्त करून देणे असेच सरकारचे नेहमी धोरण राहील. केवळ ऐतिहासिक परंपरेमुळे म्हणा अगर परिस्थितीमुळे म्हणा सुसंस्कृत जीवन जगणे ज्यांना अराध्य झालेले आहे अशा दलीत वर्गाची स्थिती सुधारण्याचा सरकार सातत्याने प्रयत्न करील. बौद्धजनांना आश्वासनाचा दिलासा देताना मुख्यमंत्री आपल्या भाषणात म्हणाले,

'नव बौध्दांच्या सवलतीच्या प्रश्नाचा मी येथे खास उल्लेख करू इच्छितो. धर्मांतरामुळे त्याच्या काही अडचणी वाढलेल्या आहेत. याची जाणीव मला आहे.

सामाजिक व आर्थिक दृष्टचा जे दुर्बल आहेत त्यांना साहाय्य करण्याचा आपल्या धोरणानुसार सरकार नव बौध्दांना सर्व बाबतीत हरिजनांच्या बरोबरचे समजेल. अर्थात जेथे असे करणे घटनेबरोबर विसंगत होईल. त्या बाबी अपवाद असतील.

या प्रमाणे नवदिक्षित बौध्दजनांना सवलतीसंबंधीचे आश्वासन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या पहिल्याच भाषणात दिले.

याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. अर्थात बौध्दजनांनी आपल्याला पूर्ववत सवलती मिळाल्या पाहिजेत. यासाठी मुख्यमंत्री यांना भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, खा. दादासाहेब गायकवाड, आर. डी. भांडारे भेटून आपले तोंडी व लेखी म्हणणे खलित्याच्या स्वरुपातच दाखल केलेले होतेच. त्याच प्रमाणे रिपब्लिकन पक्षाच्या शाखा सभा सम्मेलनातही 'बौध्दजनांना, सवलतीसाठी लढा द्यावा लागेल अशाच स्वरुपाचे ठराव व भाषणेही झालेली होती. डॉ. बाबासाहेब यांनाही नागपूर येथील भाषनात 'बौध्दजनांच्या सवलती कोण बंद करणार आहे? असे आव्हानात्मक भाषण केले होते.

आपले प. पू. नेते डॉ. बाबासाहेब यांचे मार्गदर्शन, रिपब्लिकन पक्ष नेत्यांचे सारखे प्रयत्न व जनतेच्या आपल्या या मागणीचा उठाव या सर्व सामुदायिक परिणामामुळे नव महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी बौध्दजनांची ही सवलतीची मागणी मान्य करणे भाग पडले आहे. अर्थात बौध्दजनांची मागणी ही न्यायावर आधारलेली आहे. ही महत्त्वाची बाब मुख्यमंत्र्यानी मान्य केली व त्याप्रमाणे बौध्दजनांना सवलती देण्याचे जाहीर केले. याबद्दल पुन्हा मुख्यमंत्र्याचे आम्ही आभार मानतो.

बौध्दजनाच्या सवलतीचे जाहीर धोरण प्रत्यक्षात आणा.

मुख्यमंत्री महाराष्ट्र सरकार यांना आमची एवढी विनंती आहे की मुख्यमंत्र्यानी बौध्दजनांना सवलतीचे जे धोरण जाहीर केले आहे त्याला कायद्याचे

(अॅक्टचे) स्वरुप द्यावे; आणि त्याची प्रत्यक्षात महाराष्ट्र सरकारच्या सर्व खात्यानी जारीने अंमलबजावणी सुरु करावी म्हणजेच मिळालेल्या सवलतीचा फायदा बौध्दजनांना होईल. जर का बौध्दजनांना दिलेल्या सवलतीच्या आश्वासनाला कायद्यांचे स्वरुप दिले नाही तर मात्र प्रत्यक्ष व्यवहारात धोरण अधांतरी राहण्याची भिती वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राचेच काय पण भारताचे प्रातिनिधीक प्रतिक आहेत.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच आपल्या भाषणात महाराष्ट्राती ल प्रातिनिधिक प्रतिके म्हणून चार थोर पुरुषांचा उल्लेख केलेला आहे. त्यात महाराष्ट्राचे खरेखुरे मूर्तीमंत प्रातिनिधिक प्रतिक म्हणून ज्या महापुरुषांचा कोणीही विचारी माणूस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव करील. परंतु मुख्यमंत्र्याच्या या चार थोर पुरुषांच्या यादीत नेमके डॉ. बाबासाहेबांचेच नाव का वगळण्यात आले? हीच एक या भाषणातील गोष्ट महाराष्ट्रातील बौद्धजन व दलित–मागासलेल्या वर्गाच्या जिव्हारी लागलेली आहे. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आपल्या या संबंधीच्या भाषणात शेवटी शेवटी म्हणाले.

"महाराष्ट्राची ही भूमी अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाज सुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनित झालेली आहे.

संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रातिनिधीक प्रतीके आहेत. त्यानीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली, तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयात जपून ठेवणे व त्याचा विकास करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते.

या प्रमाणे मुख्यमंत्र्यानी संत ज्ञानेश्वर, छ. शिवाजी महाराज, म. ज्यो. फुले, यांनाच काय ते महाराष्ट्राची प्रतीके म्हटली आहेत. अर्थात आम्हाला थोर विभूतीबद्दल आदर आहे त्यांच्या मोठेपणाबद्दल आमच्या मनात दुमत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राचे प्रातिनिधीक प्रतीक का होऊ नये व त्यांच्या नावाचा या विभूती बरोबर का उल्लेख होऊ नये हीच गोष्ट आमच्या जिव्हारी लागून राहिली आहे. महाराष्ट्रातील बौद्धजन व दलित मागासलेले वर्ग

व इतर महाराष्ट्रीय विचारवंत यांच्या मनाला देखील डॉ. बाबासाहेबांचे नाव मुख्यमंत्र्यानी का घेतले नाही म्हणून मनाला रुखरुख लागलेली असून याच गोष्टीचा खल बौद्ध व दलित व मागासलेल्या वर्गाच्या वस्तीत आज चालू आहे.

महाराष्ट्राचे प्रातिनिधीक प्रतीक म्हणून त्यात थोर विभूतीची गणना करताना मुख्यमंत्र्यानी काय कसोट्या ठरविल्या होत्या त्या कळणे कठीण आहे. पण त्यांच्याच भाषणाचे आधार घेऊन सांगावयाचे झाल्यास 'संत, पराक्रमी वीर, त्यागी समाज सुधारक व विद्वान देशभक्त' याच कसोट्या आम्ही मानावयास तयार आहोत आणि त्या कसोटीला डॉ. बाबासाहेब उतरत नाहीत असे का मुख्यमंत्र्यांना म्हणावयाचे आहे? या उलट आम्ही आत्मविश्वासाने सांगतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरेखुरे संत, खरे पराक्रमी वीर, खरे त्यागी समाज सुधारक व खरे विद्वान देशभक्त होते. अन शेवट पर्यंत डॉ. बाबासाहेबांनी उभ्या आयुष्यातील क्षणन्‌क्षण शेवटपर्यंत भारतातील दलित, शेतकरी, कामकरी गोरगरीबाच्या उद्धारासाठी त्यागमय भावनेने खर्ची घातला ही गोष्ट त्यागी समाज सुधारकाची नाही काय?

डॉ. बाबासाहेबांनी विद्येचे आगर असलेल्या इंग्लंड, अमेरिका या देशातील उच्च पदव्या प्रथम श्रेणीत संपादन केल्या. आपल्या विद्वतेचे व बुद्धिमत्तेचे तेज आपल्या ग्रंथाने भारताला व जगाला दाखविले व स्वतंत्र भारताचे घटना शिल्पकार म्हणून भारतीयांनीच त्यांना 'आधुनिक मनु' म्हटले त्याला विद्वता व देशभक्ती म्हणता येणार नाही.?

अस्पृश्यतेच्या विरुद्ध अखंड प्राणपणाने डॉ बाबासाहेब एकाकी महा-पराक्रमी थोर वीरासारखे लढले, याला पराक्रमी वीर म्हणता येणार नाही का?.

आजच्या अणु युगात जगापुढे मोठा प्रश्न पडला असतांना मानवाला तारणारा भगवानबुद्धाचा मार्ग डॉ. बाबासाहेबांनी जगापुढे ठेवला व मानव व मानवी संस्कृतीला जीवदान देण्याचा आदर्श मार्ग जगाला दाखविला या पेक्षा तर 'संत' पणाचे महात्मेपण दुसरे कशात आहे? आणि त्याचबरोबर अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या कोट्यावधी दलितांना भगवान बुद्धाचा 'मुक्ती मार्ग' दाखविला त्यात संत पण नाही काय?.

या शिवाय डॉ. बाबासाहेबांचे थोर गुण महाराष्ट्रातच काय पण भारत

व जगाला माहित आहेत. अशी ज्याच्या अंगी सर्वांग परिपूर्ण गुणवत्ता भरली आहे असे थोर महापुरुष डॉ. बाबासाहेब या महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक प्रतीके यांच्या मालीकेत का बसू नयेत? असाच प्रश्न पुन्हा पुन्हा आमच्या मनाला खटकतो.

त्यामुळे मुख्यमंत्र्याच्या विधानामुळे डॉ. बाबासाहेब व त्यांच्या भारतातील व महाराष्ट्रातील कोट्यावधी अनुयायावर मोठाच अन्याय केलेला आहे. अजूनही आमची अशी अपेक्षा आहे की मुख्यमंत्री आपल्या विधानात पुन्हा दुरुस्ती करतील व डॉ. बाबासाहेबांचे नावही ते मोठ्या स्वाभिमानाने या मालीकेत घेतील.

डॉ. बाबासाहेब हे स्वयंभू थोर महापुरुष आहेत.

डॉ. बाबासाहेब यांचे थोरपण स्वयंभू आहे. जगाला प्रकाश देण्याऱ्या सूर्याचे नाव कोणी घेतले नाही म्हणून काय सूर्याचे मोठे पण कमी होणार नाही. तसेच डॉ. बाबासाहेबांचे नाव घेतले नाही म्हणून त्यांचे थोरपण मुळीच कमी होणार नाही. एवढेच आम्ही नम्रपणे विश्वासपूर्वक सांगतो.

संपादक मंडळ
वी. के. गायकवाड शंकरराव खरात
चेअरमन
आर. डी. भंडारे
जी. पी. मौर्य
घनःश्याम तळवटकर

१९

बौद्ध धर्माचा स्वीकार का?

दिनांक १ ऑक्टोबर १९६०

महानिर्वाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बौद्ध धर्म स्वीकार ही गोष्ट एकाएकी झालेली नसून तिला फार मोठी कारण परंपरा आहे. बाबासाहेबांनी उतारवयात बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळे त्यांच्यावर टीकाकार एकांगी टीका करतात व त्याच्या बौद्ध धर्म स्वीकारचा पूर्वग्रहदुषीत विकृत अर्थ लावतात.

धर्मांतराची कारणे -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लहानपणापासून हिंदू धर्मातील अस्पृश्य म्हणून लहानपणी न्हावी त्याचे केस कापत नसे ! केवळ महार म्हणून पैसे देऊनही त्यांना बंगलाडीत बसायला मिळाले नाही. हायस्कूलमध्ये 'संस्कृत' ही दुसरी भाषा शिकविण्याचे नाकारले गेले. त्यामुळे नाईलाजाने त्यांना पर्शियन शिकावे लागले. अशा अनेक घटनांचे त्यांच्या बालमनावर एकामागून एक आघात झाले. शेवटी परदेशांतून उच्च पदवी (एम. ए. पीएच. डी.) संपादन करून आल्यावर बडोदे सरकारच्या दरबारात मोठे अधिकारी म्हणून ते नोकरीस राहिले असता त्यांच्या हाता खालील शिपाई 'विटाळ' होईल या भावनेने त्यांच्यावर उंचावरून कागद टाकत असत. बडोद्यासारख्या शहरात केवळ अस्पृश्य म्हणून त्यांना राहण्यासाठी जागा मिळू शकली नाही. त्यातच कडक म्हणजे ज्या एका पारशी हॉटेलात डॉ. बाबासाहेब राहत होते त्या हॉटेलवर सवर्ण हिंदूनी दगड काठ्यानी हल्ला करून तेथे त्यांना राहणे अशक्य केले. हॉटेल मालकाने नुकसानीच्या भितीने बाबासाहेबांना बाहेर काढले. त्यांनी बडोद्याला रामराम ठोकला.

जातीचा पाया उखडावा -

हिंदू समाजरचना पद्धतीचा डॉ. बाबासाहेबांनी नंतर अभ्यास केला. त्यात त्यांना चित्र दिसले ते असे, ' आपल्या देशातील हिंदू समाजरचना जातीय पद्धतीत आधारलेली आहे. जात ही माणसाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवते. माणसाचे श्रेष्ठत्व गुणावर अवलंबून न राहता ते जातीवर व जन्मावर आधारलेले असते. जातीय पद्धतीमुळे कामाच्या विभागणीचे रूपांतर माणसा-माणसांत कायमचे मतभेद निर्माण करण्यात आले. म्हणजे प्रत्येक जातीचा धंदा वेगळा ठरविला गेला. जातीवरून धंदा व धंदावरून जात ओळखण्याचा प्रघात पडला. जाती जातीचे लहानलहान तटबंदी किल्ले निर्माण झाले. त्यामुळे एका जातीच्या विचाराचा व संस्कृतीचा संबंध दुसऱ्या जातीच्या विचाराशी होऊ शकला नाही. त्यामुळे जातीजातीमध्ये आपुलकी, बंधुभाव, प्रेम व सहानुभूती निर्माण होऊ शकली नाही. उच्च जातींनी कायमचे अधिकार व हक्क भोगावे व कनिष्ठ जातींनी कायमचा कामाचा बोजा उचलावा व गुलामी सेवा करणे हे ठरले. धंदा व जात पक्की झाली व जोपर्यंत हिंदु धर्म आहे तो पर्यंत 'जात' ही हिंदू समाज पद्धतीचा मूळ पाया राहणार या करिता हिंदू समाजरचना पद्धती मूळासकट बदलून समता बंधुत्व स्वतंत्रता व न्याय अशा नवीन श्रेष्ठ मूल्यावर आधारलेला नवसमाज निर्माण केला पाहिजे.' या निर्णयाप्रत डॉ. बाबासाहेब हे १९३५-३६ सालीच आले होते. १९३६ साली मे रोजी मुंबई येथे अखिल मुंबई महार परिषदेत केलेल्या भाषणात धर्मांतराबाबत त्यांनी आपले स्पष्ट मत दिले आहे. त्याच प्रमाणे पंजाब मधील जात - पात तोडक मंडळाच्या वार्षिक दिनानिमित्त तयार केलेले (पण न झालेले) भाषण Annihilations of castes त्यांचा विचार प्रकृतीची साक्ष देते. धर्मांतर करण्याकडे बाबासाहेबांचा १९३५ पासूनच कल होता. येवले (जि. नाशिक) येथे धर्मांतराच्या परिषदेत (१९३५ साली) त्यांनी जाहीर घोषणाच केली होती की, 'मी हिंदु म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही' या घोषणाला अनुसरुनच दि. ३१ मे १९३६ रोजी मुंबई येथे अखिल मुंबई महार परिषदेत जे भाषण केले त्यात धर्मांतर का ? याची मूलभूत कारण मीमांसा केलेली आहे. त्या भाषणात त्यांनी धर्मांतराची सर्व कारणे विचार पूर्वक सांगितलेली आहेत. 'मी तुम्हाला स्पष्ट सांगू इच्छितो की, माणूस धर्मा करीता नाही. धर्म माणसाकरीता आहे. माणूसकी प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. संघटना करावयाची असेल तर धर्मांतर करा. सामर्थ्य संपादन करावयाचे असेल तर धर्मांतर करा. समता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. जो धर्म तुमच्या माणूसकीला काही किंमत देत नाही. त्या धर्मात तुम्ही का राहता ? जो धर्म

तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला देवळात जाऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला पाणी मिळू देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुमची पदोपदी मानहानी करतो त्या धर्मात तुम्ही का राहता? ज्या धर्मात माणसाशी माणूसकीने वागण्याची रीतच नाही आहे, तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे.' या भाषणापूर्वी म्हणजेच १९२७ मार्च १९ व २० या दिवशी महाड (कुलाबा) येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्याचा व तसेच १९३० च्या मार्च महिन्यात नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेशाचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब यांच्या नेतृत्वाखाली झाला. अर्थात या सत्याग्रहात अस्पृश्यांसाठी मानवी हक्काची मागणी हीच मूलभूत होती. अस्पृश्यता निवारणाचे कायदे झाले पण ते प्रत्यक्षात अंमलात आलेच नाहीत. या अनुभवातून त्यांची मनोभूमिका तयार झाली होती. धर्मांतरासंबंधी डॉ. बाबासाहेब यांच्या वेळोवेळी झालेल्या भाषणातील खालील उतारे पाहील्यावर बौध्द धर्माकडे ते कसे आकर्षिले गेले होते याची कल्पना येते. दिल्ली येथे २० मे १९५१ ला बुध्द जयंतीनिमित्ताने बोलतांना डॉ बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणाले, "माझी अशी सदिच्छा आहे की भारतातील साऱ्या अस्पृश्यांनी बौध्द धर्म स्वीकारुन त्याप्रमाणे आपले आचरण ठेवावयास पाहीजे. खरोखरच कोणाला जातीभेद मोडावयाचा असेल तर त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार करावा हा एकच उपाय आहे." "मानवतेचे संपूर्ण संरक्षण होण्यासाठी साऱ्या जगाला बौध्द धर्माची कास धरावी लागेल. मी माझा प्रचार तुमच्या पुरताच मर्यादित न ठेवता साऱ्या हिंदू धर्माला या नव्या क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न करीन." नागपूर येथे दि. १४–१०–१९५६ रोजी बौध्द दीक्षा घेतल्यावर डॉ. बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणाले "धर्माची आवश्यकता गरीबांना आहे पिडीत लोकांना धर्माची आवश्यकता दुःखातून पीडलेल्या गरीब माणसाना मुक्त करणे हे बौध्द धर्माचे मुख्य कार्य आहे. ते पुढे आपल्या भाषणात म्हणतात. "मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी प्रतिज्ञा मी मागेच केली होती आणि ती खरी करुन दाखविली"

बौध्द धर्माचे आकर्षण

डॉ. बाबासाहेबांच्या भाषणांतील हे विचार पाहता त्यांचा बौध्द धर्म स्वीकार हा श्रध्देवर व विचारावर आधारलेला होता, ही गोष्ट स्पष्टपणे नजरेस येते. त्यामुळे वैफल्य, नैराश्य, यातून डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला हा टीकाकाराचा आरोप एकांगी कसा आहे हे स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेबांना

वयाच्या १४व्या वर्षीच त्यांचे गुरु श्री केळूसकर यांनी भगवान बुध्दाचे चरित्र अर्पण केले होते. त्या चरित्रापासून त्यांना स्फूर्ती मिळाली व बौध्द धर्माकडे ते आकर्षिले गेले. १९३२ साली त्यांनी बांधलेल्या स्वतःच्या बंगल्याचे नांव 'राजगृह' असे ठेवले आहे. त्यात प्रवेश करताच दर्शनी भ. बुध्दाचा भव्य धवल रंगाचा पुतळा बसविला होता. १९४६ साली त्यांनी मुंबईस नवीन कॉलेज काढले त्याचे नांव ही 'सिद्धार्थ कॉलेज' असे ठेवले आहे. तसेच औरंगाबाद येथील त्यांच्या कॉलेजचे नाव 'मिलींद महाविद्यालय' असे आहे. ज्यांनी डॉ बाबासाहेबांना जवळून पाहिले आहे त्यांना स्पष्ट कल्पना आली असेल की, डॉक्टर साहेबांचा पिंड धार्मिक विचारवंताचा आहे. राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट केली. अस्पृश्यता नष्ट करण्याचा देशव्यापी कायदा झाला आणि तत्त्वतःकागदोपत्री तरी कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली. पण गेल्या बार वर्षाच्या काळात अस्पृश्यता निवारण्याचा कायद्याला खेडेगावी वेशीच्या आत प्रवेश मिळाला असून खेडोपाडी अजूनही वेशीच्या आत रुढीचे साम्राज्य चालू आहे. त्यामुळे कायदा झाला तरी हा प्रश्न सोडविण्यास गती मिळाली नाही. या मंद गतीने अस्पृश्यता नष्ट होण्यास किती काळ लागेल हेही सांगणे अवघड आहे. हा ही अनुभव डॉ. बाबासाहेबांनी घेतला. या सर्व गोष्टीचे चिंतन केल्यास डॉ. बाबासाहेबांनी या देशातील जातीय पद्धती पूर्णतया मोडण्यासाठी व अस्पृश्यता नष्ट करून सर्व समाज एकाच पातळीवर आणण्यासाठी बौद्ध धर्माचा स्वीकार केला अर्थात हे धर्मांतर पूर्ण विचार करून या धर्माचा थोरपणावरील श्रद्धेमुळे केले आहे. ही गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट होईल.

महाराष्ट्रात धर्मांतराची प्रचंड लाट-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. १४ आक्टोंबर १९५६ रोजी नागपूर येथे पूज्य महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धर्म स्वीकारला. तेथेच बौद्धधर्म दिक्षा घेण्याच्या हेतूने जमलेल्या आपल्या पांच लाख अनुयायांना स्वत: डॉ. बाबासाहेबांनी दिक्षा दिली आणि भारतात बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या क्रांती कार्याचे पहिले पाऊल टाकले. नागपूर येथील डॉ. बाबासाहेबांचा बौद्धधर्म स्वीकार व सामुदायिक दिक्षा समारंभ यामुळे भारतात व बौद्धजगात फारच औत्सुक्य निर्माण झाले. महाराष्ट्रात तर बौद्धधर्म स्वीकाराची प्रचंड लाटच सुरु झाली. ती प्रथम मोठ्या शहरात व नंतर तालुक्याच्या शहरी व ग्रामीण भागात पसरली.

चांगले परिणाम

शहरात जेथे जेथे नवदिक्षित बौद्धांच्या वस्त्या आहेत तेथे मराठी

महिन्याच्या प्रत्येक पोर्णिमेला नियमित पणे रात्री जेवण वेळेला सामुदायिक प्रार्थना होते. प्रार्थनेस येताना घरातील गडी, महिला व लहान मुले शुभ्र कपडे अंगावर धारण करतात. प्रार्थनेच्या जागी टेबलावर व उंचवटयाच्या जागी भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा ठेवलेल्या असतात. त्यापुढे मेणबत्त्या, उदबत्त्या लावलेल्या असतात. 'त्रिशरण व पंचशील' अशा प्रार्थना म्हटल्या जातात. कमी खर्चात व थोडचा वेळात अतिशय गंभीर वातावरणात बौद्ध पद्धती प्रमाणे लग्न समारंभ होतात. नामकरण, प्रेत सत्कार अशाही स्वरूपाचे विधीही बौद्ध धर्माच्या पद्धतीने पार पाडल्या जातात. बौद्ध धर्मातील तत्वाला धरून दारूपीणे व नशापाणी करणे या गोष्टी वर्ज्य आहेत. त्यामुळे या समाजांतील दारू पिणारा वर्ग दारूपासून अलिप्त झाला आहे. जे कायद्याने होऊ शकले नाही. ते नेमके बौद्ध धर्म स्वीकारल्यामूळे झाले. याचा अर्थ असा नव्हे की, आर्थिक परिस्थिती फार सुधारत चालली. सांगण्याचा हेतू एवढाच की, अनाठायी खर्च होत नाही व 'ऋण काढून त्रण' होत नाही.

खेडेगावात झालेला परिणाम

महाराष्ट्रात खेडोपाडी बौद्ध धर्म स्वीकाराची लाट पसरली आणि दीक्षा समारंभ झाल्यावर दुसऱ्याच दिवसापासून नवदीक्षित बौद्धांनी गावातील स्पृश्य समाजाची गुलामी पद्धतीची सर्व कामे करावयाची बंद केली. शेकडो वर्षापासून पिढ्यान्पिढ्या भाकरीच्या तुकडयासाठी हीन प्रतिची कामे अस्पृश्यास करावी लागत होती. गावची झाडलोट करणे व त्याच बरोबर गावचे देशमुख-देशपांडे, पाटील-कुलकर्णी यांच्या वाड्यात, घरी-दारी झाडलोट करणे हे त्यांनी बंद केले. लहान मोठी मेलेली जनावरे ओढणे व त्यातील मोठ्या जनावराची कातडी सोलून मालका घरी आणून टाकणे बंद केले. स्मशान भूमीत मेलेल्या मढ्यांची लाकडे टाकण्याचेही बंद केले. गावकाम केल्याबद्दल घरोघर भाकरी मागून खाण्याची जी वहिवाट होती. तीही बंद केली. त्याच प्रमाणे सणा-सुदाला, लग्नकार्य व इतर समारंभाच्या प्रसंगी पिढ्यान्पिढ्या लाकडे फोडावयाचे जे काम होते ते बंद केले. स्वतःच्या चरितार्थासाठी नवदीक्षीत बौद्धांना स्वतंत्र धंदा करणे भाग पडले. ते हल्ली मजूरी, गंवडीकाम व शेतमजूर म्हणून कामे करू लागली आहेत. प्रश्न दोन प्रकारचा आहे.

नवीन प्रश्न

नवदीक्षीत बौद्धाच्या १) सामाजिक व धार्मिक आणि २) आर्थिक. नवदीक्षीत

बौद्धाच्या सामाजिक व धार्मिक प्रश्नांचे स्वरुप प्रामुख्याने खेडयात दिसते व प्रखरपणे जाणवते खेडोपाडी. जात, रूढी व परंपरा यांचे साम्राज्य आहे. नवे विचार, नव्या प्रेरणा यांना अजूनही खेडेगावच्या वेशीच्या आत प्रवेश मिळालेला दिसत नाही. त्यामुळे काही वोटावर मोजण्या इतके अपवाद वगळले तर बाहेरच्या जगात काहीही उत्पात होवो, उलटा पालट होवो, पण खेडेगावात आपआपल्या पायरीने वागलेच पाहिजे. याच जुन्या चाकोरीचा दंडक असतो. रूढीच्या चाकोरीतून आपले जीवन कंठणाऱ्या अज्ञ जनतेला आपल्या गावच्या महार समाजाने परंपरागत हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारला ही गोष्ट कशी पटणार ! गावचे सनातनी, प्रतिगामी व रूढीबद्ध विचाराचे लोक नवदीक्षीत बौद्धांवर तुटून पडले आहेत. अस्पृश्यतेला पोषक अशी गुलामी पद्धतीची सर्व गावकामे बंद केली व स्वतंत्र मोलमजूरीची कामे करावयास सुरुवात केली. याचा परिणाम दुहेरी झाला. पहिला परिणाम असा की, पूर्वी गाव समाजाचे एक अविभाज्य अंग असलेला गावचा महारसमाज बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळे गावापासून सर्वस्वी अलग झाला आहे. " ते आपल्याला कायमचे तुटले व आपण त्यांना कायमचे तुटलो " अशी तुटकपणाची भावना गावच्या स्पृश्य वर्गात अधिक वाढीस लागलेली आहे. बौद्धाविषयी गावकऱ्यांच्या दृष्टीकोनांत द्वेष व शत्रुत्व निर्माण होत आहे. दुसरा परिणाम असा की, हीन घाणेरडी व ओंगळ अशी दैनंदिन कामे करावयास गावात दुसरा कामकरी वर्ग मिळेना. त्यामुळे गावच्या प्रत्येक स्पृश्य माणसावर ही कामे करण्याचा प्रसंग आला. आपला अपमान झाला, गावचा अपमान झाला, गावाला कमीपणा आला. बौद्ध हे गावापुढे शिरजोर होऊ लागले. त्यांना ठिकाणावर आणले पाहिजे असा अविचार गावाच्या डोक्यात शिरला. त्यातूनच बौद्धांना मारपीट करणे, छळणे, त्यांच्यावर संपूर्ण बहिष्कार टाकून दैनंदिन जीवनात त्यांची सामाजिक, आर्थिक कोंडी करणे असले प्रकार सुरु झाले. आज बहुतेक खेडेगावात बौद्ध समाजाविरूद्ध गावचा समाज असे शत्रुभावनेचे स्वरूप निर्माण झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संख्येने मोठ्या अशा बौद्ध समाजाचे सामाजिक व आर्थिक जीवन अस्थिर झाले असून नव्या महाराष्ट्रापुढील ती एक मोठी समस्या बनली आहे. खेडेगावात या प्रकारच्या सामाजिक समस्यांतून धार्मिक समस्या निर्माण होत असून बौद्ध धर्म विरूद्ध हिंदू धर्म असे स्वरुप येऊ लागलेले आहे. अर्थात या दोन्ही धर्माच्या व धर्माभिमानाच्या दृष्टीने एकमेकांबद्दल अशी भावना निर्माण होणे समाजाच्या व राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने इष्ट नाही.

समस्येवर उपाय

नव दीक्षीत बौद्धावर गांवातून जे सामाजिक बहिष्काराचे अन्याय स

चालू आहे. त्याला वेळीच पायबंद घातला पाहिजे. एकाच खेड्यांतील एका समाज-विभागात दुसऱ्या मोठ्या समाज विभागाबद्दल कायम अविश्वास, द्वेष व शत्रुत्व या भावना निर्माण होणे समाजसंस्थेच्या व देशहीतांच्या दृष्टीने घातक ठरेल. या करिता सरकार, समाजसेवक, विचारवंत, गावांचे स्पृश्य प्रतिनिधी व बौद्धांचे प्रतिनिधी यांनी एकत्र बसून बंधुभावनेने विचार करून यातून योग्य असा मार्ग काढला पाहिजे. यासाठी अशा प्रतिनिधीची गाववार, तालुकावार व जिल्हावार प्रतिनिधित्व मंडळे नेमली पाहिजेत. खेडेगावातील वरच्या वर्गाच्या अंतःकरणात बौद्ध समाजाबद्दल प्रेम सहानुभूती व बंधुभावना निर्माण केली पाहिजे त्या दृष्टीने उच्च-वर्गीयांच्या प्रवृत्तीत बदल करण्याचे सतत प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या कायद्यांची जनतेला समग्र माहिती देऊन या कायद्याची जारीने अंमलबजावणी केली पाहिजे. सरकारी अधिकारी व सरकार यांनी कडक धोरण ठेऊनच पुढचे पाऊल टाकले पाहिजे, यामुळे बौनद्धां सामाजिक बहिष्कार, अन्याय व मारपीट यापासून योग्य ते संरक्षण मिळेल. खेड्यात बौद्धांच्याविरुद्ध काही बेकायदा कारवाई करावयाची असेल तर गांवातील सर्व पक्षातील लोक झटकन एकत्रित येतात आणि गावाविरुद्ध बौद्ध असा झगडा सुरू करतात. सामाजिक समता मान्य असणाऱ्या राजकीय पक्षानी खेड्यातील आपापल्या कार्यकर्त्यांनी सामजिक समतेच्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी मदत करण्याचे आदेश द्यावेत. तसेच बौद्ध बांधवाना समभावनेची वागणूक मिळावी म्हणून वरील समितीने प्रयत्न करावेत बौद्धाविरुद्ध गाव ही समाजघातकी समस्या सोडविण्यासाठी कर्तव्य बुद्धीने काम करणाऱ्या स्वतंत्र अशा समाजसेवक संघटनाची आवश्यकता आहे. कारण राजकीय पक्ष हा गावांचे मत मागणाऱ्या त्याच्या अंतिम सत्तास्पर्धेच्या हेतू मुळे सामाजिक समता निर्माण करण्यास असमर्थ ठरतो. सामाजिक समता निर्माण करणाऱ्या कायद्यानी जी संरक्षणे अस्पृश्य वर्गाला दिली आहेत तीच संरक्षणे बौद्धसमाजाला देण्याच्या दृष्टीने सरकारने कायद्यात दुरूस्ती करावी. या दृष्टीने पावले पडली तर महाराष्ट्रात बौद्धांच्या निर्माण झालेल्या सामाजिक व धार्मिक समस्या सुटण्यास मोठी मदत होईल.

आर्थिक समस्या

नवदीक्षीत बौद्धांची मूळ आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे. त्यांना स्वतंत्र धंदा नाही. खेड्यात ते भूमिहीन मजूर म्हणून काम करतात. शहरातही कामगारांचे जीवन जगतात. शहरांत बेकारीच्या खाईत इतर वर्गाबरोबर हा वर्ग होरपळून निघत असला तरी जगण्यासाठी काही तरी मोलमजूरी करून

अर्धपोटी राहून आला दिवस तो काढतो. चौथ्या श्रेणीतील नोकऱ्यात काही थोडयांना प्रवेश मिळाल्याने त्यांचा संसार कसा का असेना पण चालू शकतो. खेडो-पाडी मात्र परिस्थिती यापेक्षा कठीण आहे. खेडयांत त्यांचे सर्व आर्थिक जीवन गांवावर अवलंबून असते. मजूरांस काम हमखास मिळेल असे नसते. या अनिश्चित-पणामुळे खेडयातील बौद्धांचे आर्थिक जीवन अत्यंत हीन झाले आहे. त्यातच लोकसंख्येची होणारी झपाटयाने वाढ ! यामुळे कुटुंबातील कर्त्या गडयाचे उत्पन्न व कुटुंबात खाणारी माणसे याला मेळ बसणे अतिशय अवघड झाले आहे. जातीय पद्धतीची समाजरचना स्वतंत्र असते. आर्थिक जीवन जगण्याची या वर्गाला आज-वर कधी संधीच मिळाली नाही. त्यातच या समाजाने बौद्ध धर्माचो दीक्षा घेतल्या-मुळे व गावांचे काम बंद केल्याने गावाने समाजावर बहिष्कार टाकला, त्यामुळे या वर्गाने आर्थिक जीवन एकदम अस्थिर होऊ लागलेले आहे. या परिस्थितीचा विचार करता बौद्धांच्या आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने पुढील उपायांचा विचार केला पाहिजे. १) बौद्धांना सर्व शैक्षणिक सवलती दिल्या पाहिजे २) बौद्धांना नोकरीत राखीव जागांच्या सर्व सवलती दिल्या पाहिजेत. ३) खेडोपाडी नवदीक्षीत बौद्धांचे दैनंदिन आर्थिक जीवन सुधारण्यासाठी सरकारी पिकाऊ व पडिक जमिनी बौद्धांना वाटणी करून दिल्या पाहिजेत. ४) स्वतंत्र उद्योग धंद्यासाठी सरकारने भांडवल द्यावे. या मागण्याचा अर्थ असा की भारतीय राज्यघटनेत शेडचूल्ड कास्टस व शेडचूल्ड ट्राईब्ज यांना ज्या ज्या आर्थिक, शैक्ष-णिक व नौकऱ्या संबंधी सवलती दिल्या आहेत त्या त्या सर्व सवलती बौध्दांना मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या सवलती अस्पृश्यांना मिळतात त्या सवलती बौध्दाना पूर्ववत दिल्या पाहिजेत हा दृष्टीकोन तत्त्वतः तरी महाराष्ट्रात मान्यता पावला आहे. व या दृष्टीकोणातून मुख्यमत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी नव-राज्यांच्या स्थापना दिनी पहिल्याच भाषणात बौध्दांना सवलती देण्याचे जाहीर केले आहे ही समाधानाची गोष्ट आहे. अर्थात या धोरणाची अंमलबजावणी स्वतंत्र कायदा करुनच होणें अगत्याचे आहे. तरच नवमहाराष्ट्रात बौध्दांना सामाजिक, धार्मिक व आर्थिक दृष्टया सुरक्षितता वाटेल. महाराष्ट्राचे प्रगतिचे पाऊल पुढे पडेल व सहकार सहजीवन या तत्वांनी बौध्दांना जगता येईल.

१ ऑक्टोबर १९६०

* *

२०

डॉ. बाबासाहेबांचे पुण्यस्मरण

दि. २ डिसेंबर १९६१

दि. ६ डिसेंबर १९५६ चा दिवस, त्या दिवसाची आठवण झाली की अंतःकरण गहिवरून येते, डोळे अश्रूंनी भरून येतात, मन खिन्न होते, आणि सर्वत्र अंधार दिसू लागतो. 'बाबासाहेब' असे शब्द कंठातून हुंदक्यांनी अस्पष्ट उमटू लागतात. त्या काळदिनाला आज पाच वर्षे होऊन गेली. त्यावेळच्या आठवणीने अजुनही मनाची वेड्यासारखी अवस्था होते, मती बधीर होते. तरी पण 'बाबासाहेब' अजून आपल्यात हवे होते, असे आशावादी उद्‌गार आपल्या मुखातून उमटतात पण ते आता शक्य आहे का? आज आपण त्यांच्या पुण्यस्मरणाशिवाय काय करणार?

आज हया दुःखद घटनेच्या काळाला हा हा म्हणता पाच वर्षांचा काळ लोटला आहे. काळ नि वेळ कोणासाठी थांबू शकत नाही. तो आपले अविरत कार्य करीत असतो. तरी पण डॉ बाबासाहेबांची आठवण झाली की, पुढे काय? हाही प्रश्न आपल्या दृष्टी समोर चटकन उभा राहतो. मन निराशेने गांगरून जाते. मनाला आपण धीरदेण्याचा प्रयत्न करतो. आपणाला त्यांच्या अंतीम आदेशानुसार विधायक स्वरुपाचे कार्य करावयाचे आहे याची जाणीव होते. तोच त्यांचे धीरगंभीर हृदयस्पर्शी उद्‌गार आपल्या कामी पडतात की,

'-----परंतू आपण अजून शिखरावर पोहचलो नाही. मध्यावर आलो आहोत. कठडा चढत आहोत. कधी पाय घसरेल ते सांगता येत नाही. अजूनही आपली संकटस्थिती निभावली नाही.' मी पुढारी की तो पुढारी हे भांडण आता मिटविले पाहिजे, ----'माझी चळवळ जिवंत ठेवा. संघटीत व्हा त्यातच तुमच्या उद्धाराचा सन्मार्ग सापडेल'. पुरंदरे स्टेडियम, मुंबई, दि. २८। १०। ५४

प. पुज्य. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या हयातीत केलेल्या कष्टमय चळवळीचे सार्थक करावयाचे असेल तर त्यांच्यावरील उद्‌गाराचा आपण प्रत्यक्षरित्या विचार करून त्याप्रमाणे आचरण केलें पाहिजे. त्या कामगिरीची आणि आदेशाची आठवण करीत व्यर्थकाळ घालविण्याची ही वेळ नाही. त्याच्या जिवन चरित्राचें आपण अभ्यासूवृत्तीने सद्‌भावनेनें मनन करायला पाहिजे. त्याच्या ध्येयनिष्ठ कार्याची पुर्तता करण्यासाठी अभेद्य एकजूटीची पहिली पायरी आपण सर्वांनी मजबूत करणे अत्यावश्यक आहे.

प्रामाणिकपणा हा कार्याचा गाभा असावा.

कोणत्याही प्रकारची ध्येयनिष्ट चळवळ करण्यासाठी प्रामाणिकपणाची गरज असते. आपण डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचे व तिच्या कार्यपद्धतीचे सूक्ष्म रीतीने अवलोकन केले तर त्यात प्रामाणिकपणाची तळमळ होती. कार्यापेक्षा मानापानाला त्यांनी कधीच प्रमूख असे स्थान दिले नव्हते. त्याना पुढारीपणापेक्षा प्रत्यक्ष कार्याविषयी विशेष कळकळ वाटत होती. म्हणून त्यांनी आपल्या सर्वांगीन चळवळीचे विशाल आणि भरीव स्वरूपाचे कार्य केले. त्याचीच आज मधुर फळे आपण चाखत आहोत ही गोष्ट त्यांच्या पुण्यस्मरण्याच्या दिवशी विसरून चालता कामा नये.

त्यांनी ज्या ज्या चळवळी सुरू केल्या, ज्या ज्या मुत्सदेगिरीच्या कामगीऱ्या त्यांनी एक निष्ठेने पार पाडल्या त्यात खरा प्रामानिकपणा होता. स्वतःचा गौरव बुद्धीमत्ता किंवा लौकिक यादृष्टीने त्यांनी कोणतेही कार्य केले नाही. ते आपले सहकारी मित्र व कार्यकर्त्यांना नेहमी म्हणत की घाण्याच्या बैलाप्रमाणे काम करू नका. बुद्दीमत्तेला तसेच प्रामाणिक पणाला प्राधान्य द्या गेली पाच वर्ष त्यांच्या या उज्ज्वल तत्वप्रणाली प्रमाणे आपण त्यांचे सर्व एकनिष्ट अनुयायी नि कार्यकर्ते कार्य करीत आहोत त्यांच्या ध्येयनिष्ठेप्रमाणे वागून आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या वतीने बरीच महत्वाची कार्येहि पार पाडलेली आहेत. आम्ही त्यांच्या आदेशाप्रमाने वागून त्यांची प्रामाणिकपणाची शिकवण शब्दशः अंमलांत आणीत आहोत यात शंका नाही. वरिल प्रमाणे कार्य करीत असतांना काँग्रेसआदि भांडवलशाही पक्षाकडुन आपणास विरोध होत गेला. त्यांच्या विरोधाची भावना आपण जाणू शकतो. पण आपलेच मित्र, कार्यकर्ते आणि डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणविणारे आज प.पू. बाबासाहेबाच्या प्रामाणिकपणाच्या कार्याला जाणून बुजुन विरोध करण्यासाठी अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण करीत असताना दिसतात ही खरोखर

उद्वेगाची तशीच खेदाची गोष्ट होय. बाबासाहेबांच्या प्रामाणिकपणाच्या शिकवणीला हे जे कुटीरवृत्ती गालबोट लागत आहे त्याचीही जाणीव सर्वांना करून देणे भाग पडत आहे. अहंमपणा, अहंकार व संधिसाधूपणा हे आपल्या चळवळीला असणारे अवगुणच या आपल्या विरोधकांमध्ये दिसुन येत आहेत. त्यामूळे बाबासाहेबांच्या प्रामाणिक आणि ध्येयनिष्ठ चळवळीला निष्कारण अडथळे निर्माण होत आहेत ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाही. आमच्या ह्या कार्यकर्त्या मित्राना कळकळीची विनंती आहे की, अशा प्रकारच्या विघ्नसंतोषी मार्गाचे अवलंब न करता अंतःकरणात जर बाबाच्या ध्येयनिष्ठेविषयी खरा खुरा प्रामाणिकपणा असेल तर त्यांच्या पूण्यतिथी दिवशी त्यांच्या समाधीस अभिवादन करुन त्यांच्या कार्याला खरे सहकारी म्हणून साथ देण्याची श थ घ्या. प. पु. डॉ. बाबासाहेबांच्या ह्यातीमध्ये जी अभेद्य एकजूट होती ती अधिक बळकट करण्याचा प्रत्यक्ष कृतीने प्रामाणिकपणा दाखवा. आज आपण जो मार्ग आक्रमण करीत आहोत तो खात्रीने बाबांच्या ध्येयनिष्ठेला पोषक नसून, त्यांच्या कार्याला जाणूनबुजून खिळ घालणारी वृत्तीच आपण स्विकारीत आहोत असे स्पष्टपणे म्हणणे आम्हाला भाग आहे. आज बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी आपापसातले सारे मतभेद विसरून, खुल्या दिलाने कळवळोने नि प्रामाणिकपणाने संघटनेचे सहकारी व्हावे असे आग्रहाचे आवाहन करीत आहोत. असो.

डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा

१९३०ते१९३६ साल प. पु. डॉ. बाबासाहेबांना अतिशय तापदायक तसेच कष्टाचे गेले. आपल्या राजकीय हक्कासाठी, आणि अस्पृश्य बांधवावरील अस्पृश्यतेचा कलंक कायमचा नष्ट करण्याचा त्यानी कायद्याच्या दृष्टीने कसोशीने प्रयत्न केला आणि त्यात यश मिळवून दिले होते, याच काळात भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. राजकीय हक्कासाठी त्यावेळी विलायतेमध्ये त्यांनी तिन्ही गोलमेज परिषदेमध्ये केलेली कामगीरी म्हणजे आज आपण जे हक्क व स्वातंत्र्य उपभोगीत आहोत त्याचे फळ होय! या शिवाय त्यांनी १९४७ते१९४९ या दोन वर्षात भारत देशाच्या स्वातंत्र्याच्या काळात मोठी जबाबदारीची कामगिरी केली ती आपल्या देशाच्या इतिहासात अजरामर होऊन राहील. तो बहूमोलाची कामगीरी म्हणजे स्वतंत्र भारताची राज्यघटना होय. अशाप्रकारचे अपूर्व तसेच अलौकिक कार्य करणारा महापुरूष आपल्या समाजात जन्माला आला. खऱ्या कळकळीने, प्रामाणिकपणाने आणि बुद्धिमत्तेने कार्य करून आपणाला तसे आपल्या देशाला ऋणी करून ठेविले आहे. या साऱ्या भूतकाळाच्या घटना आठवल्या की,

बाबासाहेबांचे पुण्यस्मरण होते. त्यांच्या विषयी अंतःकरणात आदर उत्पन्न होऊन स्मृती समाधीपुढे मस्तक नमले जातेच.

बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया व अखिल भारतीय रिप. पक्ष या दोन अधिकृत संस्था त्यांच्या आदेशाची मुर्तीमंत स्मारके आहेत. या दोन संस्थांची संघटना अभेद्य ठेवून धार्मीक आणि राजकीय क्षेत्रात आपणास त्यांच्या तत्वप्रणालीला स्मरून कार्य करायचे आहे. या दोन्ही संघटनेने गेल्या पाच वर्षात मोठी जबाबदारीचे कार्य शिस्त, संघटनेच्या बळावर केलेली आहेत रिपब्लिकन पक्षाने केलेल्या कार्याची सर्व साधारण माहिती 'प्रबुद्ध भारत' च्या गेल्या अंकी आम्ही वाचकाना सादर केलेली आहे ती त्यांनी पुन्हा एकदा अवलोकन करून पहावी. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (अखिल भारतीय बौद्ध महासभा) या संस्थेने अनेक विरोधी प्रसंगाना संकटाना तोंड देऊन आपले कार्य प्रभावी करण्याचा कसून प्रयत्न केला आहे. या सोसायटीच्या अढळ प्रयत्नांचे फळ म्हणजेच नागपुरची दिक्षा भूमी, प. पु. डॉ. बाबासाहेबांच्या चिरकालीन स्मारकासाठी सरकारकडून मिळविलेले हे यश होय! अशा रितीने राजकीय व धार्मिक क्षेत्रात आपण प. पु डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार प्रामाणिकपणे कार्य करीत आहोत आणि पुढेही करीत राहण्याचा दृढ संकल्प केलेला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी पुन्हा एकवार त्यांच्या स्मृतीसमाधीला अभिवादन करून, त्यांच्या आदेशाची पुर्तता करण्याची शपथ वाहू या.

२ डिसेंबर १९६१

* * *

२१

अमर स्मृति

दिनांक ९ डिसेंबर १९६१

आज पाच वर्षांचा काळ लोटला. आपण प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अंतिम आदेशानुसार त्यांच्या ध्येयनिष्ट कार्याची जोपासना जीवाच्या गोलान करीत आहोत त्यांची आठवण आपल्या अंत करणाला चटका लावून जाते व त्या अमर स्मृतीने मन खिन्न होते. तरीपण त्यांच्या कार्यासिद्धीची कळकळ ाने तळमळ आपल्या अंत करणात प्रकाश ज्योत निर्माण केल्याशिवाय रहात नाही. गेली पांच वर्षे आपण अनेक अंतःस्थ आपत्ती व इतर संकटानाही धैर्याने तोंड देत कर्तव्य परायण होऊन, आपल्या कार्याच्या पाऊल वाटेने पुढे जात आहोत. त्याच्या आदेशा प्रमाणे आपणास उज्ज्वल ध्येय गाठायचे आहे त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरच्या अपुऱ्या कार्याची पूर्तता करायची आहे. त्यासाठी आपली संघटना प्रथम एकजूटीच्या बळकटीने अभेद्य ठेवण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे.

आपल्या भारत देशावर आज आणीबाणीची वेळ आलेली आहे. आपले प. पू. डॉ.बाबासाहेब यावेळी आपल्यामध्ये नाहीत तरी पण त्यांनी राज्यघटनेच्या द्वारे आपणास लोकशाही तत्वानुसार जो आदेश दिला आहे, त्याप्रमाणे देशावर कितीही गडांतरे आली तरी आपल्या एकजूटीच्या प्रयत्नाने देशाचे स्वातंत्र्य अबाधितपणे टिकविण्यासाठी नेहमी आघाडीवर राहण्याची इर्षा अंतःकरणात बाळगू या. तत्वाप्रमाणे आपल्या कोटयावधी बौद्धजनांच्या, पददलितातही मागासलेल्या बांधवाच्या अंतःकरणात त्यांची स्मृती त्याच्या प्रभावी तत्वज्ञानाने जागृत ठेवू या. त्याच्या अमर स्मृतीच्या आत्मबळावर आपण आपला स्वावलंबनाचा लढा अवीरतपणे लढत राहू या. आपण कोणताही संकल्प किंवा ध्येय साधतांना नुसती बोलघेवडेपणाची प्रवृत्ती ठेवून चालणार नाही. यासाठी गेल्या पाच वर्षांच्या कार्याचा आढावा

काढून भावी प्रगतीच्या दृष्टीने आपल्या प्रगतीची वाटचाल झपाट्याने करण्याची पराकाष्टा करणे भाग आहे.

प. पू. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणास प्रकाश दाखविला आहे त्याच वेळी आपणास आपले ध्येय साधण्यासाठी कशा प्रकारचे व कोणकोणती संकटे येतील यांची ही जाणीव करून दिलेली आहे. अशा परिस्थितीत त्यांनी दाखविलेला प्रकाश व दिलेला आदेश याची योग्यरित्या सांगड घालून आपल्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग, आपापसातील सारे भेद भाव, गैरसमज विसरून पुढील कार्याची प्रगती झपाट्याने करण्याचा दृढ निश्चय केला पाहिजे.

यंदाच्या त्यांच्या पुण्यस्मृति दिनानिमित्त आपण निश्चित असा निर्धार करावयास पाहिजे की, त्याची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय स्वरूपाची चळवळ अखंड अभेद संघटनेच्या बळावर जिवंत ठेवू या. त्याच्या नावलौकिकाला, त्यांच्या अलौकिक कामगिरीला कोणत्याही प्रकारचा कलंक लागेल असे कृत्य करण्यास कोणीही प्रवृत्त होऊ नये, ही बाबांच्या पुण्यस्मृती दिनाच्या निमित्ताने कळकळीची विनंती करीत आहोत.

प. पू. बाबासाहेबांनी आपणास भगवान गौतम बुद्धाचा मानतावादी धर्म दिला आहे त्या धर्माची विजयी पताका भारतामध्येच नव्हे तर सर्व जगात फडकविण्याचा प्रयत्न करावयाला पाहिजे.

'मी सारा भारत बौद्धमय करीन' उद्धाराची पूर्तता आपण जरी केली तरी एक महान कार्य केल्याचे अपूर्व यश आपल्या पदरी पडेल यात शंका नाही. आपणाला डॉ. बाबासाहेबांनी निर्भयपणाचे जीवन जगण्याचा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे त्यांच्या पाचव्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांच्या अपुऱ्या राहिलेल्या कार्याची पूर्तता करण्यासाठी आपल्या अंगी उत्साह, चिकाटी, प्रेम, बंधुभाव आणि आत्मविश्वास निर्माण करा.

प. पू. बाबासाहेबांची स्मृती अमर आहे. या म्हणण्यातच आपल्या कर्तव्य परायणतेची खरी परीक्षा आहे. त्यांनी आपल्या ध्येयनिष्ठ कार्यात भारतातील विषम जातीजमातीची समाजरचना नाहीसी करून त्याऐवजी समता, बंधुता, प्रेम, न्याय यांच्यावर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याचा निश्चय केला होता. त्यांच्या या उज्ज्वल तत्वप्रणालीच्या मार्गाने जाण्याचा आपण संकल्प करून, थोडे

बहुत कार्य करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या पुण्यस्मरणाची खात्रीने सार्थकता होईल.

त्यांनी केलेले प्रत्येक कार्य मानवी जीवनाच्या उत्क्रांतीसाठी केलेले होते. त्यात स्वार्थ नव्हता. उच्चभावना आणि मानवी समाजाची सर्वांगीण अशी उत्क्रांती व्हावी हाच त्यांच्या चळवळीचा, तत्वप्रणालीचा आणि कार्याचा उद्देश होता.


त्यांचे ध्येय सामान्य वृत्तीच्या जनतेच्या शक्ती बाहेरचे होते. तरी पण त्या ध्येयनिष्ठेने प्रेरीत होऊन एक दिलाने, एक विचाराने, एक जुटीने जर आपण कार्य करीत राहीलो तर त्यांच्या पुण्यस्मरणा बरोबरच त्यांचे कार्य अमर करण्याचे सामार्थ्य खात्रीने आपल्या मध्ये निर्माण होईल.

दि. ९ डिसेंबर १९६१
भा. र. कद्रेकर.

संपादक मंडळ
बी. के. गायकवाड, चेअरमन
आ. डी. भंडारे
बी. पी. मौर्य
घनःश्याम तळवटकर

REFBK-0024807

**



आमची दर्जेदार प्रकाशने

बौद्ध व दलित साहीत्याचे ग्रंथ

- ☐ **मूकनायक** : प्रा. गंगाधर पानतावणे
- ☐ **दलितांचे प्रबोधन** : प्रा. गंगाधर पानतावणे
- ☐ **दलितांचा जाहीरनामा** : प्रा. रामचंद्र क्षीरसागर
- ☐ **भारतीय रिपब्लीकन पक्ष** : प्रा. रामचंद्र क्षीरसागर
- ☐ **सामाजिक विचार मंथन** : भाई माधवराव बागल
- ☐ **दलित साहित्याची-प्रकाश यात्रा** : भालचंद्र फडके
- ☐ **प्रबुद्ध भारतातील अग्रलेख** : प्रा. क्षीरसागर/प्रा. पवार
- ☐ **बौद्ध संस्कार दर्शन** : भिक्षु संघरत्न
- ☐ **धम्मचक्र गिते** : बनसोड/नाईक
- ☐ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्पित मानपत्रे** : संपा. शंकरराव हातोले
- ☐ **ऐतिहासिक सत्याग्रह** : शंकरराव हातोले
- ☐ **सचित्र, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र** : शंकरराव हातोले
- ☐ **रसिक रंजन (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर गाण्य.चासंच)** : रोहम दिवेकर

• • • •

बौद्ध व दलीत साहित्याचे प्रकाशक

आनंद प्रकाशन

जयसिंगपुरा, औरंगाबाद ४३१००४

किंमत अठरा रु. पन्नास पैसे